# धर्म, जात, वर्ग आणि
# परिवर्तनाच्या दिशा

गोविंद पानसरे

MR
200
P 191 D

MR
200
P191D

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा

गोविंद पानसरे

लोकवाङ्मय गृह

धर्म, जात, वर्ग आणि परिवर्तनाच्या दिशा / गोविंद पानसरे
Dharma, Jat, Varga Aani Parivartanachya Disha /
Govind Panasare

म / १२४

© गोविंद पानसरे

पहिली आवृत्ती ⊙ : जून २००६
दुसरी आवृत्ती ⊙ : जानेवारी २००८

Library IIAS, Shimla
MR 200 P 191 D
00124264

मूल्य : ७५ रुपये

ISBN 81-88284-73-4

124264
31.3.08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
Prakash Vishwasrao
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५
Mumbai

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्तावना | सात |
| धर्माविषयी मार्क्सवादाची भूमिका | १ |
| साहित्याचे प्रयोजन काय? | १८ |
| जातिअंत की जातिउद्धार? | ३० |
| शत्रू कोण? ब्राह्मण की ब्राह्मण्य? | ३७ |
| बहुजनवादी राजकारण : शक्यता आणि मर्यादा | ४५ |
| बहुजनवादाच्या विविध संकल्पना | ५४ |
| भूमिहीनांचे आंदोलन | ६२ |
| सामाजिक न्याय आणि सामाजिक क्रांती : मार्क्सवादी दृष्टिकोन | ७८ |

मी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. या लेखांत कुठे कुठे तात्कालिकता आढळेल. जिथे लिहिले किंवा ज्यांच्यासाठी लिहिले त्याच्या मर्यादा दिसतील. समजून घ्या.

धर्म, जात, सामाजिक न्याय या बाबींसंबंधी सखोल व सर्वंकष आकलन अत्यावश्यक आहे. ते काम हे लेख पूर्ण करू शकणार नाहीत, हे स्पष्टच आहे. त्या दिशेने विचार करायला कदाचित हे लेख मदतकारक ठरतील.

धर्म, जात आणि सामाजिक न्याय हे महत्त्वाचे विषय आहेत. केवळ ज्ञानसाधनेसाठीच महत्त्वाचे नाहीत, तर परिवर्तनाच्या चळवळीसाठी महत्त्वाचे आहेत.

चळवळीसाठी विषयाचे यथायोग्य आकलन जसे लागते, तसेच योग्य रणनीती असावी लागते. या दोन्ही बाबी लक्षात घेऊन हे लेख लिहिले आहेत. कार्यकर्ता म्हणून लिहिले आहेत. केवळ विचारवंत म्हणून नाही.

विचारवंत कार्यकर्ता असतोच असे नाही. कार्यकर्ता मात्र विचार करणारा असावाच लागतो. समाज बदलायला निघालेल्या कार्यकर्त्याला विचारही करावा लागतो आणि कार्यही करावे लागते. विचारांतून कार्यास प्रेरणा मिळते. कार्यातून विचार परिपूर्ण होतो. नुसता विचार पुरेसा नसतो: नुसते कार्य पुरेसे नसते. दोन्ही असावे लागते.

ही गरज पूर्ण करण्याच्या कार्यात या लिखाणाचे अल्पस्वल्प योगदान व्हावे, ही अपेक्षा.

कोल्हापूर

**गोविंद पानसरे**

# समंजस पुरोगामित्वाचा ओनामा

राजकारणाच्या धकाधकीत सतत वावरत असूनही ज्यांनी आपली अभ्यासू वृत्ती कायम ठेवली आहे अशा विरळा व्यक्तींपैकी कॉ. गोविंदराव पानसरे हे एक आहेत. विशिष्ट पक्षाचे ते पदाधिकारी असले तरी त्यांच्या मित्रपरिवारात पक्षवर्तुळाबाहेरची मंडळीही मोठ्या संख्येने आहेत. कोणत्याही प्रश्नाचे सम्यक आकलन करून घ्यायचे तर त्याचे सर्व पैलू तपासणे अगत्याचे असते, या धारणेतून ते नेहमीच आपल्या गोतावळ्यातील पुरोगामी विचारांच्या भिन्न प्रवाहांतील सुहृदांशी खुल्या मनाने चर्चा करत असतात. पुरोगाम्यांनी आपापसातील मतभेदांचे कंगोरे घासून सहमतीची क्षेत्रे विस्तारत न्यावीत आणि संघटितपणे आपले लढे लढवावेत अशीच त्यांची भूमिका सदैव असते. पुरोगाम्यांमधील फाटाफुटींमुळे आरोपप्रत्यारोपांतच त्यांचा शक्तिपात आणि बुद्धिनाश होतो, समाजविघातक शक्तींच्या ते पथ्यावर पडते व त्या फोफावतात आणि मुख्य म्हणजे जनसामान्यांचे जीवनमरणाचे प्रश्न बाजूला पडून बिनमहत्त्वाच्या भावनिक व तात्कालिक प्रश्नांना अवाजवी महत्त्व प्राप्त होते. हे समाजवास्तव जर बदलायचे असेल तर पुरोगामी प्रवाहातील कार्यकर्त्यांनी कोणती दक्षता घ्यायला पाहिजे याची दिशा दाखवणारे कॉ. गोविंदरावांचे काही लेख प्रस्तुत पुस्तिकेत एकत्र केले आहेत. हे संकलन छोटेखानी असले आणि त्यातील लेखन प्रसंगोपात्त घडलेले असले तरी त्याची एकसूत्रता अबाधित असून कार्यकर्त्यांच्या दृष्टीने असलेले महत्त्वही वादातीत आहे.

डाव्या चळवळींच्या कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रश्नावरची आपली भूमिका निश्चित करताना सर्वप्रथम आपल्या उद्दिष्टांचे स्पष्ट भान ठेवणे गरजेचे आहे; त्यानंतर त्या प्रश्नांशी संबंधित असलेल्या भिन्न पातळ्या आणि टप्पे लक्षात ठेवून आपली व्यूहरचना ठरवणे उपयुक्त ठरू शकते, असे एक सूत्र समोर ठेवून चर्चेसाठी काही

तातडीचे विषय लेखकाने येथे निवडले आहेत. जमातवादाचे आव्हान, जात्यंताचा प्रश्न, नवब्राह्मण्याचे स्वरूप, बहुजनवादाच्या शक्यता व मर्यादा आणि भूमिहीनांचा लढा असे हे विषय आहेत. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींच्या दृष्टीने महत्त्वाचे व आस्थेचे असे हे सर्व विषय असून त्यासंबंधी आपल्या भूमिका कोणत्या निकषांवरून निर्धारित कराव्यात, आपल्या संघर्षांच्या रणनीती कशा आखाव्यात आणि त्या कामी आपले शत्रू व मित्र कोण आहेत हे कसे ओळखावे असे प्रश्न त्या सर्वच चळवळीतील कार्यकर्त्यांना स्वाभाविकच पडत असतात. त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याच्या दृष्टीने प्रस्तुत पुस्तिकेतील प्रतिपादन निश्चितपणे उपयुक्त ठरणार आहे.

जमातवादाचे आव्हान आणि हिंदुत्वाच्या राजकारणातून संभवणारा फॅसिझमचा धोका हे नव्वदोत्तर भारतीय लोकशाहीसमोरचे नक्कीच सर्वांत गंभीर गंडांतर आहे. लोकांच्या धर्मभावनांचा सत्तास्वार्थासाठी वापर करणाऱ्या भारतीय जनता पक्षाची राजकीय सरशी राममंदिराच्या अयोध्याकांडानंतर झपाट्याने झाली. राष्ट्रासमोरच्या सर्व जटिल प्रश्नांचे अतिसुलभीकरण करून जमातवादी अंगाने त्यांची मांडणी व उकल या पक्षाने केली. सर्व प्रश्नांसाठी अल्पसंख्याक जमातीच कारणीभूत असल्याचे त्याने प्रचाराद्वारे जनमानसावर ठसवले. मुस्लीम समाजाची विकृत व भयानक अशी शत्रुप्रतिमा हिंदूंच्या मनात निर्माण करून त्याच्याबद्दल द्वेष, तुच्छताभाव, संशय आणि दुरावा वाढविण्यात त्या पक्षाला यश मिळाले. कथित उज्ज्वल भूतकाळाचे स्मरण, परंपरांचा अभिमान, स्वधर्माचा अहंकार, धार्मिक प्रतीके व सणवार यांचे स्तोम इत्यादींचा कौशल्यपूर्वक वापर करूनही जे हिंदू संघटन साधले नाही ते साधण्यासाठी परधर्मीयांचा द्वेष हे साधन उपयुक्त ठरले. स्वभावत: जमातवादी नसलेले कोट्यवधी हिंदू हिकमती राजकारण्यांच्या या जमातवादी क्लृप्त्यांना बळी पडले. या पक्षाचे तात्कालिक निवडणूक यश हा जमातवादाच्या संकटाच्या हिमनगाचा दृष्टीत भरणारा एक छोटासा भाग होता. खरे संकट त्याहून फार मोठे व भयंकर आहे. संपूर्ण समाजजीवन सांप्रदायिक तेढींनी विषाक्त होणे, सामाजिक संबंधातील सहिष्णुतेला ग्रहण लागणे, धार्मिक कार्यासाठी प्रसंगी हिंसाही समर्थनीय समजली जाणे, कृतिप्रवण प्रक्षोभातून सर्वच सामाजिक व्यवहार तणावपूर्ण होत जाणे, लोकशाही मूल्ये पायाखाली तुडवण्याच्या प्रवृत्ती वाढीस लागणे, धर्मांध व बेजबाबदार शक्तींना धर्मरक्षकांची प्रतिष्ठा प्राप्त होणे अशी एकापेक्षा एक वरचढ खतरनाक अरिष्टांची मालिका जमातवादी राजकारणाने आज आपल्या समाजात निर्माण केली आहे. नव्या आर्थिक धोरणांमुळे त्या अरिष्टांना पोषक वातावरण आयतेच तयार झाले आहे.

पुरोगाम्यांनी धर्माविषयी व तत्संबंधित घडामोडींविषयी एकूणच जी अनास्थेची किंवा कुत्सितपणाची भूमिका घेतली तिच्यामुळे एकतर सश्रध्द समाज त्यांच्यापासून

दुरावला आणि दुसरे असे की ते क्षेत्र सर्वस्वी जमातवाद्यांना बहाल झाले. अयोध्या प्रकरणी जे घडले त्यामुळे पुरोगाम्यांच्या लक्षात आपली चूक आली. त्यांनी आपली धर्मविषयक भूमिका फेरतपासणीला लावली. मूठभर जमातवादी सत्तास्वार्थासाठी धर्माचा वापर करतात आणि तेवढेच बोके संन्यासी आक्रमक पवित्रे घेऊन मुसंडी मारतात याची कारणमीमांसा करता येत असली तरी लाखो प्रामाणिक धर्मश्रद्ध माणसे त्यांच्या प्रचाराला बळी का पडतात आणि धर्मनिरपेक्षतेच्या त्यांच्या हिताच्या भूमिकेपासून का दूर जातात याचे कोडे मात्र पुरोगाम्यांना सोडवता येत नव्हते. जमातवादी पक्षांना शह देण्यासाठी केवळ सर्व धर्मनिरपेक्ष पक्षांची मोळी बांधणे पुरेसे होणार नाही, तर आपल्या धर्मनिरपेक्ष धारणांचीही खोलात जाऊन चिकित्सा करावी लागेल याची जाणीव त्यांना झाली. मार्क्स यांनी धर्माला अफूची गोळी म्हटले एवढेच ध्यानात घेऊन जे धर्माशी संबंधित प्रत्येक गोष्टीवर टीकेची कुऱ्हाड चालवत सुटले होते, त्यांनाही मार्क्स कोणत्या संदर्भात तसे म्हणाले होते हे तपासून पाहण्याची सद्बुद्धी या निमित्तान झाली. त्यांच्यासाठी प्रस्तुत पुस्तिकेत मार्क्स यांच्या धर्मविषयक भूमिकेचे संक्षिप्त पण मार्मिक विवरण कॉ. पानसरे यांनी केले आहे. धर्माची स्थलकालपरिस्थितीसापेक्षता जशी ते त्यातून अधोरेखित करतात त्याचप्रमाणे केवळ टीका करून धर्मभावना नष्ट होत नसते तर तिला जन्म देणाऱ्या परिस्थितीत त्यासाठी बदल घडवून आणणे गरजेचे असते, हे ते विशद करून सांगतात. माणसाला हवे असलेले सुख लाभत नाही म्हणून तो धर्माच्या आभासमय सुखात रमतो, त्याला स्व-सामर्थ्याचे भान नसते म्हणून तो धर्माचा आधार शोधतो, आपल्या दु:खांचे कारण न समजल्यामुळे त्यांच्या निराकरणाचा उपाय त्याला दिसत नाही, अशा वेळी धर्मातून मिळणारा दिलासा त्याला हवासा वाटतो हे लक्षात घेतल्यास धर्मश्रद्ध माणसांबद्दल दुरावा न वाटता जवळीकच वाटली पाहिजे, हा मार्क्सप्रणीत प्रतिपादनाचा इत्यर्थ लेखकाने सांगितला आहे. जमातवाद्यांविरुद्ध लढताना प्रामाणिक धर्मश्रद्धांचा व धर्मभावनांचा अधिक्षेप करून चालणार नाही हा त्यांचा इशारा महत्त्वाचा आहे.

जे सामान्य जनतेच्या धर्मविषयक भावनांचा स्वार्थासाठी गैरवापर करतात तेच या लढ्यात पुरोगाम्यांच्या हल्ल्यांचे मुख्य लक्ष्य असले पाहिजेत. धर्मावर किंवा श्रद्धांवर प्रहार करण्याऐवजी धर्माचा वापर साधन म्हणून करणाऱ्यांच्या जनविरोधी आर्थिक धोरणांचा, भ्रष्ट व अनैतिक व्यवहारांचा तसेच इतिहासातील दुष्कृत्यांचा व नाकर्तेपणाचा पर्दाफाश केला पाहिजे. त्यांच्या संघटनांचे बदलते स्वरूप व डावपेच तसेच लाभान्वित होणारे मर्यादित स्तर यांवर प्रकाश टाकला पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लढाईचे मैदान त्यांनी नव्हे तर आपण निश्चित केले पाहिजे. आज ते रामजन्मभूमीचा मुद्दा उकरून काढतात आणि ती रामजन्माची जागा कशी

नाही यावर आपण पुरावे शोधत बसतो. असे न होता सामाजिक- आर्थिक विषमतेत नवभांडवलशाहीने घातलेली भर, कारखाने बंद होण्यातून कोसळलेली बेकारीची कुऱ्हाड, मूलभूत सुविधांची वानवा, विकासाचे विकृत अग्रक्रम आणि भीषण दुष्परिणाम, कुपोषणमृत्यू अशा जनतेच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांवर आंदोलने करून जर आपण मैदानात उतरलो तर जमातवादी शक्ती आपल्या पासंगालाही पुरणार नाहीत. तसेच त्यांना या प्रश्नांचे जमातवादीकरण करण्याची संधीही मिळणार नाही.

पण मानवी जीवनातील धर्माचे स्थान कोणते आणि ते कोणकोणत्या कारणांनी असते याचा अगदी सोपपत्तिक ऊहापोह करून जरी आपण आपली धर्मनिरपेक्षतेची व्याख्या तयार केली, तरीही तिच्याद्वारे अन्यद्वेषमूलक जमातवादाला शह देणे कितपत साध्य होईल हे तपासावे लागेल. धर्मनिरपेक्ष शक्तींची व्यापक एकजूट करून धर्मांधतेचा मुकाबला यशस्वी करता येईल काय हाही प्रश्नच आहे. खरा मुद्दा धर्म व धार्मिकता हा नसून धर्माचा राजकीय वापर करण्याचा आहे याकडे आपले दुर्लक्ष होता कामा नये. मार्क्सप्रणीत पाया-इमला सिद्धान्ताचाही जो विपर्यास डाव्यांकडून झाला आहे तो या संदर्भात दुरुस्त करून घेण्याची नक्कीच गरज आहे. सार्वजनिक जीवनाचे संगठन केवळ आर्थिक आधारांवर व्हावे कारण तेच फक्त पायाभूत असतात, बाकीच्या धार्मिक, राजकीय, तात्त्विक वगैरे बाबी आनुषंगिक असतात किंवा दुय्यम असतात ही भूमिका तपासून पाहिल्यास तिचे वैयर्थ्य स्पष्ट होऊ शकेल. आर्थिक बदलांपाठोपाठ इतर सर्व क्षेत्रांत आपसूक बदल घडून येतील ही अपेक्षा पाया-इमला सिध्दान्ताच्या अनाकलनातूनच बळावलेली आहे. कॉ. पानसरे यांचे या संदर्भातील विवेचन मूलगामी आहे.

जातवादाचे हत्यार जमातवादाचा पाडाव करण्यास उपयोगी पडू शकेल असा समज अनेक पुरोगामी वर्तुळांत काही काळ पसरला होता. अडवाणींची रथयात्रा बिहारात लालूप्रसाद यादवांनी अडवली किंवा मुलायमसिंह यादवांनी उत्तर प्रदेशात भाजपाला वेसण घातली अशा प्रसंगांमधून तो समज बळावला होता. पण पुरोगाम्यांनी हे लक्षात घ्यायला हवे की जातीय राजकारणाचे स्वरूप मूलत: व निरपवादपणे जमातवादविरोधी नसते. प्रत्येक जातीतील सत्ताकांक्षी अभिजन वाटाघाटींचे राजकारण करताना जमातवादी पक्षांशीही खुशाल शय्यासोबत करतात. जाती-आधारित राजकारण कधीच त्या संपूर्ण जातिसमूहाच्या हिताचे नसते, तर ते त्या जातीच्या वरचढ स्तराच्या व मूठभर व्यक्तींच्या स्वार्थाचेच असते. सत्तेखातर कोणाशीही तडजोड करण्याची त्यांची तयारी असते. त्यातही जे जातिसमूह जातीय उतरंडीत कनिष्ठ मानलेले असतात त्यांना तर हिंदुत्वाची पताका खांद्यावर मिरवणे ही आपला कनिष्ठपणा घालवण्याची सुवर्णसंधी वाटते. त्यामुळे जातवादी शक्तींशी

हातमिळवणी करताना पुरोगामी चळवळींनी काही गोष्टींची स्पष्टता आधी करून घेणे आवश्यक होऊन बसते. मागासलेल्या जातींचे राजकारण निखालसपणे पुरोगामीच असेल असे गृहीत धरून चालू नये. मागास जातींपैकी आर्थिकदृष्ट्या लाभान्वित झालेल्या जातींचा व स्तरांचा तर कल जमातवादी राजकारण करणाऱ्या भाजपाकडे असतो हे उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातही दिसून आलेले आहे. पुरोगाम्यांनी यावरून धडा घेतला पाहिजे. जातीय उतरंडीच्या नियमाला आणि जात्यंतर्गत आर्थिक स्तरीकरणाला मागास म्हणवल्या जाणाऱ्या जातींचाही अपवाद नसतो, हे लक्षात घेऊन जातवर्गीय राजकारणाचा पाठपुरावा त्यांनी केला पाहिजे.

जमातवादाचा मुकाबला करत असताना जमातवादी शक्तींच्या तात्कालिक यशाने किंवा विविध क्षेत्रांत वेगाने घडून आलेल्या विस्तारामुळे पुरोगामी चळवळींनी हवालदिल होण्याचे कारण नाही. परिस्थिती अजूनही फार हाताबाहेर गेलेली नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे. तथाकथित हिंदुत्वाची उभारणी अन्यधर्मीयद्वेषाच्या नकारात्मक आधारावर झालेली आहे, तिला अंतर्गत समुदायभावनेचा व ऐक्याचा सकारात्मक आधार सपशेल मिळालेला नाही. हिंदूंची प्रादेशिक खंडितता, जातीय उच्चनीचता, विविध संप्रदाय, पंथ व दर्शने, परस्परविरोधी प्रथा, रूढी व दैवते वगैरेंबाबतची भिन्नता ध्यानात घेतल्यास हिंदुत्वाला सकारात्मक अधिष्ठान मिळवून देणे तसे दुरापास्तच म्हणावे लागेल. आणि नकारात्मक अधिष्ठानांवर आधारित असलेले कोणतेही आत्मभान दीर्घायुषी ठरणे केवळ असंभवनीय असते. अस्तित्वाच्या प्रश्नांना जमातवाद्यांनी अस्मितेच्या आवाहनांमधून दिलेल्या भ्रामक उत्तरांनी जनतेची काही काळ दिशाभूल होऊ शकते. पण त्याचबरोबर जनतेला नीट सावध केल्यास जनता तिच्या हितशत्रूंपासून परावृत्त झाल्यावाचून राहत नाही. मुळातच जनतेचा जमातवाद्यांना दिसतो तेवढा पाठिंबा प्रत्यक्षात नसतो हे मतदानांच्या आकड्यांवरून स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्रातील एक नामवंत निवडणूक अभ्यासक सुहास पळशीकर यांचा अभ्यासांती निष्कर्ष असा आहे की हिंदुहिताची भाषा करणाऱ्या भाजपाला हिंदूंचा म्हणावा तेवढा पाठिंबा मिळवता आलेला नाही. द्वेषाचे व भावनोद्रेकाचे राजकारण करूनही हिंदू मतांना निर्णायक कलाटणी देण्यात भाजपाला अपयशच आले आहे. बहुसंख्य हिंदू मतदार अजूनही हिंदुत्वाच्या मायाजालाला वश झालेले नाहीत. उच्च जाती, शहरी व सुशिक्षित या घटकांनाच काही प्रमाणात हा पक्ष जवळचा वाटतो. आर्थिक सुधारणांच्या आकर्षक पाठपुराव्यामुळे मध्यम व उच्च मध्यमवर्गीयांना हा पक्ष भावतो. ज्या विविध संघटनांच्या द्वारे संघपरिवाराने समाजाच्या नवनव्या घटकांत पाय पसरले आहेत त्यांच्या कार्याचे राजकीय यशात रूपांतर करणे भाजपाला जमलेले नाही. (*समकालीन भारतीय राजकारण,* पृ. २३७-९). भाजपाच्या

या सर्व मर्यादा म्हणजे आपल्या जमेच्या बाजू समजून पुरोगामी चळवळींनी जमातवादाविरुद्धची आपली व्यूहरचना राबवली पाहिजे.

आपली भूमिका जात्यंताची असावी की जात्युद्धारापुरती मर्यादित असावी? जन्मजात ब्राह्मण्याखेरीज ब्राह्मण्याचे आणखी काही आविष्कार अस्तित्वात असू शकतात की नाही? मागास जातींनी जातीच्या आधारे केलेले राजकारण स्वभावत:च पुरोगामी आणि परिवर्तनाग्रही असते काय? मागासलेपणाच्या आधारावर अखिल भारतीय ओबीसी आत्मभानाची उभारणी करणे शक्य होईल काय? राज्याराज्यात सुरू असलेले एकजातीय राजकारण आणि तमाम ओबीसींना सामावून घेऊ पाहणारा बहुजनवादाचा तत्त्वविचार, यात अंगभूत अंतर्विरोध नाही काय? बहुजनसंज्ञेची कोणती व्याख्या ग्राह्य ठरवता येईल? बहुजनवादाच्या शक्यता आणि मर्यादा कोणत्या आहेत? असे जातिप्रश्नाच्या अनुषंगाने जे अनेक प्रश्न परिवर्तनवादी चळवळींच्या कार्यकर्त्यांना प्रत्यही पडत असतात त्यांची उत्तरे शोधण्याच्या कामी त्यांना उपयुक्त ठरू शकेल असे महत्त्वपूर्ण विवेचन कॉ. पानसरे यांनी प्रस्तुत पुस्तिकेत केले आहे.

विषमता व उच्चनीचता हाच जिचा पाया आहे ती जातिव्यवस्था लोकशाहीच्या तत्त्वव्यवहारांशी मूलत: विसंगत आहे. जे स्तर तिच्यामुळे लाभान्वित होतात ते तर तिचे स्वाभाविकच समर्थक असतात, पण तिचा असह्य जाच पिढ्यान्‌पिढ्या ज्यांना सोसावा लागला तेही तिच्या मायावी स्वरूपाला भुलून तिचे गुण गात राहतात. त्यामुळे जात्यंताचा लढा अधिक बिकट होऊन बसतो. पण त्याला पर्याय नाही. मागास जातींना प्रगत जातींच्या बरोबरीने येता यावे म्हणून सवलती व आरक्षणे गरजेची आहेत हे मान्य करूनही आमूलाग्र सामाजिक-आर्थिक परिवर्तनाच्या दृष्टीने त्यांचा एका मर्यादेबाहेर उपयोग होणार नाही याचे भानही पुरोगामी चळवळींच्या कार्यकर्त्यांनी ठेवलेच पाहिजे. जात्यंताऐवजी जात्युद्धाराचीच जर कास धरली गेली तर त्यातून जातवार संघटना व जातजाणिवाच बळकट होणे अपरिहार्य होते. दुसरे असे की संपूर्ण जातिसमूहाचे हित त्यातून असाध्यच राहते. जातीतील तुलनेने साधनसमृद्ध असलेल्या स्तरांतील व्यक्तीच सवलतींचे व विकाससंधींचे लाभ उपटतात आणि स्वत:ची सत्ता, प्रतिष्ठा व मालमत्ता वाढवतात. जातिसमूह होता तसाच राहतो. वरिष्ठ जातींपुढे लाचार होणारे जातिसमूह त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या जातींवर श्रेष्ठत्व मिरवण्यातच धन्यता मानत राहतात. ही परिस्थिती बदलायची तर 'मी स्वत: गुलाम असणार नाही, आणि कोणालाही गुलाम करणार नाही आणि सर्वच विषमतांच्या विरोधात लढेन' अशा संकल्पानिशी संघर्षात उतरण्याची तयारी परिवर्तनवादी कार्यकर्त्यांची असली पाहिजे.

ब्राह्मण आणि ब्राह्मण्य यांच्यावर टीकास्त्र सोडणे फुले-आंबेडकरी चळवळीत नवीन नाही. आजही जन्माधिष्ठित ब्राह्मण्याला धारेवर धरून आणि तमाम ब्राह्मणांना आपल्या चळवळीच्या वेशीबाहेर ठेवण्याची जाहीर भूमिका घेऊन काही ब्राह्मणेतर मराठा चळवळी महाराष्ट्रात गाजत आहेत. या संदर्भात कॉ. पानसरे डॉ. आंबेडकरांचा हवाला देऊन अशी रास्त भूमिका घेतात की जन्मसिद्ध जातीवरून चळवळींनी आपले शत्रू व मित्र कधीच निर्धारित करू नयेत. ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मणेतरांपेक्षा ब्राह्मण्यमुक्त ब्राह्मणच आपले मानावेत ही महाडच्या रणसंग्रामप्रसंगी डॉ. आंबेडकरांनी स्वीकारलेली भूमिका त्यांना तर्कसंगत वाटते. स्वातंत्र्योत्तर सोयी-सुविधा-सवलतींनी लाभान्वित झालेला जो सुशिक्षित-सुस्थित स्तर सर्वच मागास जातींमध्ये निर्माण झाला आहे, त्याच्या ठिकाणी ब्राह्मण्याच्या अनेक दोषांची लागण मोठ्या प्रमाणावर झाली आहे असा सार्वत्रिक अनुभव आहे. त्याचप्रमाणे क्षात्राभिमान सांभाळून शूद्रातिशूद्रांना व स्त्रियांना हीन लेखणारे जे कोणी असतात ते वर्णविध्वंसक जोतीरावांचे खरे वारसदार नसून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे वर्णव्यवस्थेचे कैवारीच असतात. ब्राह्मण्याविरुद्धचा लढा अशांना सोबत घेऊन लढताच येणार नाही. सर्वच जातींतील आत्मकेंद्री अभिजनांचा प्रयत्न बहुधा स्वत:ची 'दुय्यम दर्जाचे ब्राह्मण' ही प्रतिष्ठा जपण्याचाच असल्यामुळे ते ब्राह्मण्याचा मुकाबला कसा करू शकणार?

स्वतंत्र भारताचे राजकारण लोकशाही मार्गाने वाटचाल करू लागल्यानंतर प्रत्येक राज्यात संख्येने लक्षणीय व तुलनेने प्रगत असलेल्या एक वा दोन वरचढ जातींच्या वरिष्ठवर्गीय श्रेष्ठींच्या हाती सत्तासूत्रे आली होती. नव्वदीच्या दशकात प्रथमच वरचढ जातींच्या या वर्चस्वाला अन्य मागास जातींनी राज्यराज्यांत आव्हानित केले. मंडल आयोगाच्या शिफारशी या नव्या लाटेला कारणीभूत ठरल्यामुळे 'मंडलीकरणाचे राजकारण' असे नवे संबोधन भारतीय राजकारणात प्रचलित झाले. मागास जातींची देशभरातील लोकसंख्या सर्वांत मोठी असल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेले राजकीय चैतन्य भारतीय लोकशाहीला पोषक ठरेल अशा विचाराने या मंडलीकरणाचे स्वागतही झाले. प्रत्येक राज्यात तेथील ओबीसींचा राजकीय पक्ष इतरांवर मात करून सत्तेवर येईल, आणि त्याचे अन्य राज्यांतील मागासांच्या पक्षांशी सख्य होऊन मागासवर्गीयांची राष्ट्रव्यापी शक्ती निर्माण होईल असा आशावादही व्यक्त करण्यात आला. पण तो बराचसा भाबडा होता हे नंतरच्या घडामोडींनी स्पष्ट केले. एकतर फक्त मागासलेपणाचे सूत्र अठरापगड जातींना एकत्र आणण्याच्या दृष्टीने फार कच्चे होते, शिवाय प्रत्येक जातीची मागसलेपणाची पातळी, जातीय उतरंडीतील स्थान आणि अन्य जातीयांबद्दलच्या धारणा पराकोटीच्या भिन्न होत्या. एवढेच नव्हे तर प्रत्येक जातीच्या आतल्याआत आर्थिक पातळ्या वेगवेगळया होत्या. त्यातच

प्रादेशिक विभिन्नता व शहरी ग्रामीण तफावतीही प्रचंड होत्या. आकाराने मोठ्या असलेल्या जातीय समूहांतर्गत तर हे अंतर्विरोध अधिकच तीव्र होते. दलित समाजाबद्दलच्या मागास जातींच्या धारणाही सर्वत्र सारख्या नव्हत्या. परिणामी ओबीसींची राजकीय जूट बांधली जाण्यापूर्वीच मोडून पडली. बिहार, उत्तर प्रदेश वगैरे ज्या राज्यांत ती थोडीफार यशस्वी झाली तिचाही लाभ मागासलेल्यांमधील वरच्या स्तरांनाच झाला. सत्तास्पर्धेने त्यांच्यातही फाटाफूट निर्माण झाली. मागासलेल्या जनतेच्या दृष्टीने मुक्तिदायी म्हणता येईल असे राजकारण मात्र त्यातून पुढे आले नाही. आरोपप्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन अभ्यासू कार्यकर्त्यांनी या अपयशाची वस्तुनिष्ठ कारणमीमांसा केलीच पाहिजे.

मग त्यांच्या लक्षात येईल की केवळ जातींची मोट बांधून नव्हे तर जातींना छेद देऊनच आजच्या राजकारणाची कोंडी फोडणाऱ्या शक्ती उभ्या केल्या जाऊ शकतील. आहे त्या व्यवस्थेत सत्तास्थाने पदरात पाडून घेणे ज्यांना पुरेसे वाटत नाही, त्यांना परिवर्तनाचे तत्त्वज्ञान आणि हेतुसापेक्ष रणनीती या दोन गोष्टी टाळून पुढे जाताच येणार नाही. चौकट न मोडता तडजोडींचे राजकारण करून फक्त काही व्यक्तींचा स्वार्थ साधतो. नव्या निकोप व न्यायपूर्ण समाजाची निर्मिती करता येत नसते. या संदर्भात बहुजनवादाची तत्त्वप्रणाली आपल्या कितपत कामाची ठरू शकेल? महात्मा फुल्यांपासून यशवंतराव चव्हाणांपर्यंत आणि थेट कांशीराम-प्रकाश आंबेडकर-कांचा इलय्यापर्यंत बहुजनवादाच्या अनेक मांडण्या आजवर केल्या गेल्या आहेत, पण आजही वाद (ईझम्) या प्रकारात त्या विचाराला समाविष्ट करता येईल काय हा प्रश्नच आहे. कॉ. पानसरे म्हणतात त्याप्रमाणे बहुजनवाद ही अद्याप तरी केवळ एक रणनीती किंवा व्यूहरचनाच आहे. त्या आधारे सुरू असलेल्या राजकारणाला सर्वंकष जीवनव्यापी तत्त्वविचार या अर्थाने वाद म्हणता येणार नाही, कारण या राजकारणाचे तत्त्वज्ञान, ध्येयधोरण, कार्यक्रम किंवा अंतिम साध्य यांपैकी कशाचीच अजून तरी स्पष्टता दिसून येत नाही. एवढेच नव्हते तर बहुजन या संज्ञेखाली कोणाचा समावेश करायचा आणि कोणाला वगळायचे यावरही एकमत आढळत नाही. त्यामुळे जातिविशिष्ट अस्मितांचे भान ओलांडून बहुजनवादी भान निर्माण होण्याची तर शक्यताही दृष्टिक्षेपात आलेली नाही. उलटपक्षी बहुजन बॅनरखाली एकत्र येण्याची घोषणा करणाऱ्या गटांचे एकजातीय राजकारण मात्र सर्रास सुरू असल्याचे दिसते.

फुले-आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या बहुजन संकल्पनेचा आशय जातीय नव्हता. शेटजी-भटजी किंवा भांडवलशाही व ब्राह्मणशाही यांच्या विरोधात ज्यांनी लढा पुकारायचा त्यांचा मनसुबा होता, ते जातींच्या नव्हे तर हितसंबंधांच्या आधारे

एकत्र येणेच त्यांना अपेक्षित होते. ब्राह्मण परभू व शेणवी सोडून इतर सर्वांना बहुजन मानणारे शाहूमहाराज त्यांच्या काळानुरूप जातीय परिभाषेत मांडणी करत असले तरी तिचाही आशय वर्गीयच होता. विठ्ठल रामजी शिंदे यांनी तर बहुजनवादाची स्पष्टच जातवर्गीय संकल्पना मांडली असून सर्व जातींमधील बलविद्यासत्तावंचित समस्तांचा समावेश बहुजन या संज्ञेखाली केला आहे. या पूर्वसुरींनी आपापल्या काळानुरूप वापरलेल्या संज्ञांचा आशय आज स्वीकारताना, आपण त्यांच्यासाठी अलीकडील भाषेतील समानार्थी शब्द वापरून विचार करायला हवा असे कॉ. पानसरे कार्यकर्त्यांना सांगतात. त्यातल्या त्यात पूर्वसूरींपैकी महर्षी शिंद्यांची बहुजनसंकल्पना त्यांना बहुजनवादाची आज मांडणी करण्याच्या कामी सर्वांत उपयुक्त वाटते.

जातीच्या पोकळ भावनेपेक्षा भरीव हितसंबंधांवर आधारित जातींना छेदून जाणारा बहुजनवादच त्यांच्या मते आज मार्गदर्शक ठरू शकतो. आजच्या तमाम बहुजनवादी म्हणवणाऱ्यांकडून शिंद्यांच्या या मांडणीची होणारी उपेक्षा त्यांना आत्मघातक ठरू शकते, हा कॉ. गोविंदरावांचा इशारा योग्यच आहे. वस्तुस्थिती ही आहे की शिंद्यांच्या जातवर्गीय भूमिकेचा संदर्भ सुटल्यामुळेच बहुजन संज्ञेच्या आजच्या सर्व व्याख्या अपुऱ्या, सोयिस्कर आणि तकलादू ठरत आहेत. दलित, ओबीसी, सर्व ब्राह्मणेतर, दलित-बहुजन, ब्राह्मण-बनिया-ठाकूर वगळता बाकीचे सगळे, यांचा बहुजनांत सोयीनुसार जोडण्या करून अंतर्भाव केला जातो. ज्या जातींना त्यातून वगळले जाते त्यांच्यातील शोषितांना जसे बहुजन म्हटले जात नाही, त्याचप्रमाणे ज्या जातींचा समावेश होतो त्यांच्यातील शोषकांनाही बहुजनांतून वगळले जात नाही. आदिवासी, भटक्या-विमुक्तांचा तर विचारही कथित बहुजनवाद्यांना करावासा वाटत नाही. तात्पर्य असे की शोषित-वंचित बहुजनांच्या नावाने केल्या जाणाऱ्या सत्तेच्या राजकारणाचा मलिदा बहुजन समाजाचे स्वयंघोषित तारणहारच गिळंकृत करतात. बहुजनवादाच्या सामाजिक फलश्रुतीशी त्यांना मुळीसुद्धा घेणेदेणे नसते.

समाजाच्या तळपातळीवर नवी जागृती प्रत्ययास येत असून परंपरेने सत्तेच्या परिघाबाहेर ठेवलेले नवनवे सामाजिक स्तर राजकारणात क्रियाशील होत आहेत, ही घटना तशी आश्वासक असून स्वागतार्हही आहेच. त्या स्तरांच्या नवजागृत जाणिवा आज जातीय परिभाषेत वंचिततेची व मागासलेपणाची गाऱ्हाणी घेऊन व्यक्त होत असतील तर तेही समजून घेता येईल. पण त्याच वेळी शोषितांचे हे जात्यधिष्ठित एकत्र येणे जर टिकाऊ आणि परिणामकारक व्हायचे असेल तर त्यांच्या संघर्षाची स्पष्ट रणनीती आखावीच लागेल. फुल्यांच्या भाषेत आपला हा लढा समस्त शोषित स्त्रीशूद्रादी-अतिशूद्रांचा व शेतकरीवर्गाचा व्हावा लागेल. तो जगण्यामरण्याच्या ठोस प्रश्नांवर उभारावा लागेल आणि त्यात आपले हितशत्रू कोण हे नीट पारखून घ्यावे

लागेल. तसेच हितमित्र अप्रस्तुत कारणांनी दुरावणार नाहीत याचीही दक्षता घ्यावी लागेल. वर्ग-वर्ण-जात-लिंग अशा कोणत्याही आधारावर विषमता माजवणाऱ्यांची मुळीच गय करून चालणार नाही.

वंचितांच्या लढ्याचे एक प्रतिमान म्हणता येईल त्या दादासाहेब गायकवाडांच्या भूमिहीनांच्या आंदोलनावर या पुस्तिकेत एक स्वतंत्र लेख आहे. एका परीने पुस्तिकेतील तात्त्विक मांडणीचे प्रात्यक्षिक रूप वाचकांपुढे ठेवण्याचा विचार त्यामागे लेखकाचा असावा. 'दादासाहेब नसते तर डॉ. आंबेडकरांचे अनेक विचार ग्रंथांतच अडकून पडले असते,' ही वि. द. घाटे यांची प्रतिक्रिया उद्धृत करून भूमिहीनांचा लढा हे दलित चळवळीचे नैसर्गिक क्रमाने उचलले गेलेले पुढचे पाऊल कसे होते यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. उच्चशिक्षित दलितांच्या नोकऱ्यांमधून नव्हे तर जमिनीच्या फेरवितरणाचा प्रश्न सोडवण्यातूनच मोठ्या प्रमाणावर भूमिहीन शेतमजूर असलेल्या दलितांचे हित साधणार आहे, हे तर कॉ. पानसरे सांगतातच पण या लढ्यात दलितांच्या खांद्याला खांदा भिडवून कम्युनिस्टही उतरले होते हे ऐतिहासिक तथ्यही ते आवर्जून नमूद करतात. त्या निमित्ताने डॉ. आंबेडकरांची साम्यवादासंबंधीची भूमिका, बुद्ध आणि मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानांमधील सहमतीचे मुद्दे आणि आजच्या परिस्थितीत आंबेडकरवादी व मार्क्सवादी यांनी परस्परांना समजून घेऊन एकजूट करण्याची गरज या गोष्टीही कॉ. पानसरे यांनी अधोरेखित केल्या आहेत.

तातडीच्या प्रश्नांवर, सद्हेतुमूलक भूमिकेतून आणि अगदी योग्य वेळी प्रकाशित होत असलेल्या या पुस्तिकेचे मी स्वागत करतो आणि कार्यकर्त्यांनी त्यातील प्रतिपादनावर गंभीर चिंतन मनन करावे असे आवाहन करतो.

**भास्कर लक्ष्मण भोळे**

# धर्माविषयी मार्क्सवादाची भूमिका

*सर्वांत महत्त्वाचा मुद्दा जग बदलण्याचाच आहे यात शंकाच नाही. परंतु जगासंबंधीचा समजच जर चुकीचा असेल तर जग बदलण्याचा बरोबर मार्गही सापडणार नाही. हाही मुद्दा महत्त्वाचा आहे.*

## चळवळ आणि प्रबोधन

धर्म काय, धर्मनिरपेक्षता काय, इकतेच नव्हे तर समाजजीवनातील कोणत्याही प्रश्नाची चर्चा कृतीपासून फारकत घेतलेल्या 'शुद्ध', 'सैद्धान्तिक' प्रबोधनाची नसावी हे गृहीत, अपेक्षित आहे. शिवाय खरे म्हणजे कृतीपासून फारकत असलेले प्रबोधन हे प्रबोधनच असत नाही, हेही लक्षात असावे.

कृतीस मदत करणाऱ्या प्रबोधनास स्थळ-काळाचे भान ठेवावे लागते. स्थळ-काळनिरपेक्ष सैद्धान्तिक चर्चा कृतीस साहाय्यभूत न ठरता प्रसंगी मारक ठरण्याची शक्यता असते.

## प्रश्नाचे महत्त्व

सध्या आपल्या देशात आणि आपल्या राज्यात ज्या प्रश्नांची नीट चर्चा करण्याची आवश्यकता आहे, त्यात धर्मविषयक भूमिका हा एक महत्त्वाचा — कदाचित अतिमहत्त्वाचा — प्रश्न आहे. धर्मभावनेआधारे समाजाला चेतवून राजकारण करणाऱ्या पक्षांची, संघटनांची आणि चळवळींची भारतात आणि महाराष्ट्रात सध्या मोठ्या प्रमाणात चलती आहे, हा एक संदर्भ आहेच.

जगातील अनेक समाजांप्रमाणे भारतीय समाजास धर्मभावनेआधारे भलेबुरे व्यवहार करायला सहज भाग पाडता येते. या बाबतीत विचारांऐवजी भावनांचा आधार घेतला

जातो. अर्थात धर्मभावनेआधारे समाजाला फसवणारे स्वत: मात्र भावनेआधारे व्यवहार करीत नसतात आणि करीत नाहीत. ते अगदी तपशीलवार, योजनापूर्वक, व्यूहरचना आणि डावपेचांची नीट आखणी करून आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विचारपूर्वक व्यवहार करीत असतात. फसलेले फक्त भावनेआधारे वागतात. फसवणारे 'धार्मिक' नसतात, फसलेले 'धर्मभोळे' असतात.

एका बाजूला धर्मभावना पेटवून मुडद्यांची रास पाडणारे आणि त्याआधारे मते मिळवून सत्ता बळकावणारे 'मोदीवादी' नजरेसमोर असावेत आणि त्याच वेळी धर्मभावनेआधारे फसवल्या गेलेल्या धर्मभोळ्या समाजास नजरेसमोर ठेवून आपण आपल्या भूमिका निश्चित करायला हव्यात. या धर्मभोळ्या गरीब समाज विभागास बरोबर घेतल्याखेरीज आपल्या देशातील पुरोगामी चळवळ बळ प्राप्त करू शकणार नाही. एका बाजूला सर्व शक्तीनिशी आणि सर्व प्रकारच्या हत्यारांनी 'मोदीवाद' उखडून टाकण्याचीसुद्धा नीती अवलंबावी लागेल आणि त्याच वेळी नरेंद्र मोदीचे 'मोदीत्व' आणि संत तुकाराम, गाडगेबाबा, तुकडोजी इत्यादी संतांचा धर्म व विवेकानंद, म. गांधी यांचे 'हिंदुत्व' यांतील प्रचंड अंतर मांडीत रहावे लागेल.

हुकूमशाहीचा मुकाबला करताना केवळ प्रबोधन पुरेसे ठरत नाही. मोदीचे आणि तोगडीयाचे प्रबोधन करता येत नाही. त्यांनी फसवलेल्या धर्मभोळ्या समाजाला योग्य, परिणामकारक आणि सातत्याच्या प्रबोधनाखेरीज हुकूमशाही शक्तीपासून दूर करता येत नाही.

## भिन्न पातळीवरील भूमिकांची गरज

पुरोगामी चळवळीचा भक्कम आधार बनू शकणारे समाज विभाग जेव्हा प्रतिगामी शक्तींभोवती संघटित होतात तेव्हा या समाज विभागांना तिथून बाहेर कसे आणावयाचे हा प्रश्न कळीचा असतो. हे समाज विभाग ज्या भावनांच्या आणि काही विचारांच्या आधारे फसविले जातात तेव्हा त्या भावना आणि त्या विचारासंबंधी पुरोगाम्यांनी आपल्या भूमिका ठरविताना उद्दिष्टांचे भान ठेवून भूमिका ठरविल्या पाहिजेत.

फसविले गेलेले समाज विभाग नजरेसमोर ठेवून प्रबोधनाच्या भूमिका ठरवाव्यात.

## अंतिम उद्दिष्ट

धर्म किंवा समाजमनावर प्रभाव असणाऱ्या बाबींबाबत भूमिका निश्चित करताना भिन्न पातळ्यांचे आणि भिन्न भिन्न टप्प्यांचे भान ठेवले पाहिजे.

एक अंतिम टप्पा आणि सैद्धान्तिक पातळी असते. अंतिमत: समाज कसा असावा, या समाजात काय असावे, काय नसावे इत्यादी विचार असतो. याला अंतिम उद्दिष्ट म्हणता येईल. या अंतिम उद्दिष्टाकडे एकदम एका उडीत जाता येत नाही हे स्पष्टच आहे. तो एक क्रम असतो. त्या क्रमात अनेक टप्पे असू शकतात. असतातच.

पुरोगाम्यांना अभिप्रेत असलेल्या अंतिम समाजरचनेत धर्माचे स्थान काय असावे किंवा काहीतरी असावे काय? असेल काय? इत्यादी प्रश्नांची चर्चा आणि त्यासंबंधीच्या भूमिकांची एक पातळी असू शकते. याच पातळीवर धर्म म्हणजे काय? धर्म निर्माण कसा झाला? त्याचे शेवटी काय होणार? देव म्हणजे काय? तो आहे काय? नाही काय? त्याचे शेवटी काय होणार? इत्यादी प्रश्नांची चर्चा होऊ शकते.

पण ती एका वेगळ्या पातळीवरील आणि वेगळ्या टप्प्यावरील चर्चा होऊ शकेल.

## व्यूहरचना किंवा रणनीती

धर्मासंबंधीच्या पुरोगामी चळवळीच्या भूमिकेची चर्चा दुसऱ्या एका 'व्यूहरचने'च्या पातळीवर होऊ शकते आणि व्हायला हवी. या व्यूहरचनेत आपण कोण आहोत? आपले अंतिम उद्दिष्ट काय? आपले एकट्याचे सामर्थ्य किती? आपण एकटे आपले उद्दिष्ट गाठू शकू काय? शत्रूचे सामर्थ्य आणि आपले एकट्याचे सामर्थ्य किती? आपण एकटे शत्रूला पराभूत करू शकू काय? करू शकणार नसू तर काय करावे? मित्र शोधावेत की नको? मित्रांना बरोबर घेण्यासाठी आपली भूमिका ताठर ठेवावी की लवचीक असावी? या व्यूहरचनेत समाजातील कोणता विभाग आणि कोणता विचार हा शत्रुस्थानी आहे? कोणता विभाग आणि कोणता विचार मित्र आहे? संभाव्य मित्र कोण आहेत? सच्चे आणि पक्के मित्र कोण? कच्चे आणि डळमळीत कोण? याचा विचार व्हायला हवा. शत्रुपक्षात काही मतभिन्नता, व्यवहारभेद, हितसंबंध भेद आहेत काय? त्याचा उपयोग करून घेता येणे शक्य आहे काय? असल्यास त्यासाठी काय करावे? सच्च्या आणि पक्क्या मित्र विभागांची जूट भक्कम कशी करावी? संभाव्य मित्रांना आपल्या बाजूस कसे आणावे आणि कसे ठेवावे? कच्च्या आणि डळमळीत मित्रांच्या बाबतीत कोणती जागरूकता ठेवावी? कसे दक्ष रहावे? ते शत्रुपक्षास मिळणार नाहीत आणि आपल्यात सामील झाले नाहीत तरी निदान तटस्थ राहावेत म्हणून काय करावे? इत्यादी आणि अशा सर्व प्रश्नांची चर्चा करायला हवी.

## 'पुरोगाम्यांची शकले'

आपल्या देशातील पुरोगामी चळवळीची अक्षरश: अनंत शकले झालेली आहेत. यांना एक कसे करावे हाही एक संदर्भ आपण लक्षात ठेवायला हवा. पुरोगामी

चळवळीची जितकी शकले आहेत तेवढी शकले मात्र या चळवळींच्या भूमिकांच्या बाबतीत नाहीत. निदान नसावीत. तशी असायला वाव नाही. चळवळीच्या शकलांच्या संख्येपेक्षा भूमिकांची शकले कमी आहेत. आणि ही संख्या आणखी कमी करणे शक्य आहे. कमी करण्याची गरज तर आहेच.

पुरोगामी चळवळीत सर्वात हानिकारक अशी एक अपप्रवृत्ती आहे. इतर पुरोगाम्यांपेक्षा आपण जास्त पुरोगामी आहोत असे जाहीरपणे, ठामपणे, पुनःपुन्हा तीव्रतेने आणि अनेकदां कटुतेने सांगण्यात इतका वेळ, इतकी शक्ती आणि इतकी बुद्धी खर्च पडते की, 'प्रतिगाम्यांवर' टीका करायला उसंतच मिळत नाही.

स्वतःचा संप्रदाय टिकविण्यासाठीच फक्त हे आवश्यक असते. हे संप्रदाय पुरोगामी चळवळीची हानी करीत आहेत. प्रतिगाम्यांचे सामर्थ्य ही आजची खरी वस्तुस्थिती नसून पुरोगाम्यांचे दौर्बल्य ही खरी वस्तुस्थिती आहे.

आजच्या काळी आपण ज्या स्थळी आहोत तेथे धर्मविषयक भूमिका आणि विचार या बाबतीत एक रेषा आखली गेलेली आहे. रेषेच्या पलीकडे कोण कोण आहेत? ते तिथे का आहेत? याचा विचार व्हावा. रेषेपलीकडले काही विभाग रेषेच्या अलीकडे आणणे शक्य आहे काय? असल्यास ते कसे साध्य करावे? रेषेच्या अलीकडे कोण कोण आहेत? त्यांची वैचारिक आणि व्यावहारिक भूमिका एक कशी करावी? त्यांना कार्यप्रवृत्त कसे करावे? इत्यादीचा विचार व्हायला हवा.

## मार्क्सवाद आणि धर्म

पुरोगाम्यांच्या धर्मविषयक भूमिकेची चर्चा मार्क्सच्या विचाराखेरीज होऊ शकत नाही, हे स्पष्टच आहे. कुणाला धाडसी किंवा उद्धटपणाचे वाटेल, तरीसुद्धा एक विधान करावेसे वाटते की, मार्क्स-एंगल्स-लेनिन यांच्या धर्मविषयक विचारांचे यथायोग्य आकलन समाजात आणि अगदी अनेक विचारवंतांतसुद्धा नीटपणे झालेले दिसत नाही. मार्क्स-एंगल्स-लेनिन यांच्या अनुयायांत आणि विचारवंतांतही या बाबतीत बऱ्याच प्रमाणात गोंधळ आहे. या गोंधळाची अनेक कारणे आहेत. "धर्म ही अफूची गोळी आहे", हे मार्क्सच्या धर्मविषयक विचारांचे लोकप्रसिद्ध विधान घ्या. वास्तवात या विधानाला चिकटूनच, त्याच्या लगत मार्क्सने इतर काही विधाने केलेली आहेत. योग्य आकलनासाठी ती सर्व एकत्र वाचली पाहिजेत. संदर्भ लक्षात घेतला पाहिजे. त्या लिखाणाचा हेतू लक्षात घेतला पाहिजे. तसे न करता एवढे एकच विधान ओरबाडून बाजूस काढून मांडले जाते. त्यानेही भरपूर गोंधळ केलेला आहे. मार्क्सचे हे विधान त्याच्या 'काँट्रीब्युशन टु द क्रिटिक ऑफ हेगेल्स फिलॉसॉफी ऑफ

लॉ' या लिखाणामधून घेतलेले आहे. या संपूर्ण परिच्छेदाचे मला करता आलेले भाषांतर पुढीलप्रमाणे आहे. कुणी तरी भाषातज्ज्ञ कार्यकर्त्याने हे भाषांतर अधिक चांगले केले पाहिजे.

"धर्माच्या रूपाने व्यक्त होणारे दु:ख हे एकाच वेळी खऱ्या दु:खाचे प्रकट रूप असते आणि त्याच वेळी तो खऱ्या दु:खाचा निषेधही असतो. धर्म हा दबलेल्या दीनदुबळ्यांचा उसासा असतो. धर्म हृदयशून्य जगाचे हृदय असते. निरुत्साही परिस्थितीतला उत्साह असतो. तो लोकांची अफू असतो." ... "सुखाचा केवळ आभास असणारा धर्म नाहीसा करण्याची मागणी करणे म्हणजेच लोकांच्या खऱ्या सुखाची मागणी करणे होय. आभास सोडून देण्याची मागणी करणे म्हणजेच ज्या परिस्थितीमुळे अशा आभासाची (भ्रामक सुखाची) गरज भासते, ती परिस्थितीच नाहीशी करण्याची मागणी असते."

या आणि मार्क्स, एंगल्स, लेनिन यांच्या वेगवेगळ्या लिखाणांमधून काही वाक्ये घेतली आहेत. ती एकत्रित विचारात घेतली पाहिजेत.

"...भोवतालच्या जगाच्या अस्तित्वाचे माणसाच्या कल्पनाशक्तीवर जे परिणाम होतात त्यातूनच धर्मकल्पनांचा उगम होतो..."

"...माणसाने धर्म तयार केला आहे. धर्माने माणूस तयार केलेला नाही..."

"...स्वत:च्या सामर्थ्याची जाणीव नसलेल्या किंवा अशी जाणीव गमावलेल्या माणसाची जाणीव म्हणजे धर्म..."

"... मर्यादित साधनसामग्रीनिशी व शोषणावर आधारलेली जीवनपद्धती ही दुर्गंधीयुक्त असते. आणि ही दुर्गंधी माणसाला जाणवू नये असा प्रयत्न धर्म करीत असतो..."

"... धर्म म्हणजे दुर्गंधीयुक्त जगाचा आध्यात्मिक सुगंध आहे..."

"...धर्म म्हणजे दु:खितांना दिलासा आणि शोषितांचा विश्वास असतो. निष्प्राण बनलेल्या जीवनात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य धर्म करतो, धर्म म्हणजे दु:खितांचा नि:श्वास आहे. धर्म म्हणजे निष्प्राण जगाचा प्राण आहे. धर्म म्हणजे निरुत्साही परिस्थितीतला उत्साह आहे. धर्म म्हणजे दु:खी जगातले दु:ख विसरायला मदत करणारी अफूची गोळी आहे..."

"धर्माच्या रूपाने मिळणाऱ्या काल्पनिक सुखातून पीडितांना बाहेर काढल्याखेरीज त्यांना खरे सुख मिळणार नाही. ज्या दुर्गंधीयुक्त दु:खी परिस्थितीमुळे धर्माची

आवश्यकता निर्माण झाली ती दुर्गंधीयुक्त, क्लेशकारक आणि हताश वास्तव परिस्थिती नाहीशी करणे हाच धर्माचे काल्पनिक सुख नाहीसे करण्याचा खरा मार्ग आहे...''

''...केवळ टीका करून धर्मभावना नाहीशा करता येणार नाहीत. त्यासाठी ज्या परिस्थितीमुळे या धर्मभावना उद्‌भवल्या व टिकवल्या ती परिस्थितीच नाहीशी करावी लागेल.

''...केवळ टीकेने बदल घडविता येत नाहीत, क्रांती हीच इतिहासाला कलाटणी देणारी खरी शक्ती आहे...''

वरील अवतरणातून काही बाबी स्पष्ट होतात.

१) मानवी समाजाच्या विशिष्ट परिस्थितीतून धर्मकल्पना जन्मास आली आहे. धर्मकल्पना केवळ कुणा दुष्टाच्या सुपीक मेंदूतून समाजाला फसविण्यासाठी मुद्दाम अस्तित्वात आणलेली कल्पना नाही.

२) जोपर्यंत ती विशिष्ट परिस्थिती अस्तित्वात आहे, तोपर्यंत धर्मकल्पना पूर्णतया नाहीशी करता येणार नाही. धर्म नाहीसा करायचा असेल तर ज्या परिस्थितीमुळे त्याची आवश्यकता निर्माण झाली ती परिस्थितीच नाहीशी केली पाहिजे.

३) जोवर ती विशिष्ट परिस्थिती बदलली जात नाही तोपर्यंत धर्मकल्पना शोषितांना/पीडितांना दिलासा आणि उत्साह देत राहते. हा दिलासा आणि हा उत्साह भ्रमावर आधारलेला आहे. पण हा उत्साह आणि हा दिलासा वास्तवात अस्तित्वात आहे, ही वस्तुस्थिती आहे. जे अस्तित्वात नाही ते आहे असे वाटते. हा भ्रम असतो. भ्रमामुळे वाटणारा उत्साह आणि मिळणारा दिलासा हा मात्र भ्रम नाही. ते सत्य आहे.

४) धर्म केवळ धर्मावर टीका करून किंवा धर्माचे सत्य स्वरूप विशद करून नाहीसा होणार नाही.

## आर्थिक पाया आणि इमल्याचा भाग असलेला धर्म

समाजजीवनातील आर्थिक घटकाचे महत्त्व किती आणि धर्म, तत्त्वज्ञान, कायदा, राजकीय रचना, कला, संस्कृती, साहित्य इत्यादींचे महत्त्व काय या संबंधीच्या मार्क्सवादी सिद्धान्ताबद्दल आणि विचारांबाबतही बरीचशी अस्पष्टता, काहीशी विकृती आणि बरेच अपसमज दिसतात. या दोन्ही घटकांचे तुलनात्मक महत्त्व सांगण्यासाठी मार्क्सने 'पाया आणि इमला' यांची उपमा वापरली. उपमा

म्हणजे मूळ विचार नव्हे. मूळ विचार सोप्या भाषेत समजावून देण्याचे ते एक साधन आहे. आर्थिक घटक म्हणजे पाया आणि इतर घटक म्हणजे इमला. 'अंतिमत: निर्णायक घटक पाया असतो' असे मार्क्सचे अनेक ठिकाणी प्रतिपादन दिसते. आर्थिक घटक हा 'एकमेव' घटक आहे अशी मात्र मार्क्सवादाची भूमिका दिसत नाही.

"पाया बदलला की 'आपसूक' इमला बदलेल. तो बदलण्यासाठी आणखी वेगळे काही करायची गरज नाही. फक्त पाया बदला म्हणजे 'इमला' म्हणून उपमेने सांगितलेले घटक आपोआप बदलतील," असा मार्क्सवादी विचारांसंबंधी व्यापक समज आहे. माझ्या मते हा समज बरोबर नाही. विशेषत: यातला 'आपसूकवाद' किंवा 'आपोआपवाद' बरोबर नाही. आर्थिक घटकांची एकमेवता मानणे हेही बरोबर नाही.

पुन्हा एकवार मार्क्स-एंगल्स यांची अवतरणे दिल्याखेरीज भागणार नाही. म्हणून काही अवतरणे देतो.

"...नीती, धर्म, अध्यात्मज्ञान आणि विचारसरणीचे इतर सगळे प्रकार... यांना स्वतंत्र आणि वेगळा इतिहासही नसतो आणि त्यांचा वेगळा असा विकासही होत नाही. माणसे आपल्या भौतिक उत्पादनाचा विकास साधत साधत आणि आपले भौतिक व्यवहार साधत साधत... आपले विचार करणेदेखील बदलतात... जाणीव जीवनाची निश्चिती करीत नसते तर जीवनच जाणिवेची निश्चिती करते."

मार्क्स आणि एंगल्स यांच्या हयातीतच त्यांच्या 'पाया आणि इमला' किंवा आर्थिक घटक आणि कला, संस्कृती, धर्म इत्यादी घटक यांच्या संबंधाबाबत चुकीचे आकलन करून टीका करण्यात आली होती आणि त्यामुळे त्यांना या विषयासंबंधीचे आपले प्रतिपादन या टीकेच्या संदर्भात करता आले होते. खालील अवतरणावरून हे स्पष्ट होते.

"... इतिहासाच्या भौतिकवादी संकल्पनेनुसार, इतिहासातील अंतिमदृष्ट्या निर्णायक घटक म्हणजे वास्तव जीवनाची निर्मिती व पुनर्निर्मिती हा असतो. याहून अधिक मार्क्सनेही कधी सांगितले नाही आणि मीदेखील कधी सांगितले नाही. कुणी जर या विधानाला विकृत वळण देऊन असे सांगायला लागला की, आर्थिक घटक हा एकमेव निर्णायक घटक असतो तर तो आमच्या विधानाचे रूपांतर एका हास्यापद आणि अर्थशून्य विधानात करतो. ...आर्थिक परिस्थिती हा आधार असतो परंतु वरच्या इमल्याचे घटक.... राजकीय, कायदेविषयक, तत्त्वज्ञानविषयक, धार्मिक मते आणि धार्मिक स्मृतींच्या पद्धतीमध्ये त्यांचा झालेला विकास... या सगळ्या गोष्टीदेखील ऐतिहासिक लढ्याच्या ओघावर आपला प्रभाव पाडतात आणि अनेक बाबतीत

विशेषकरून त्याचा प्रकार निश्चित करतात..." (एंगल्स यांचे ब्लॉख यांस पत्र, २१,२२ सप्टेंबर १८९०)

"राजकीय, कायदेविषयक, तात्त्विक, धार्मिक, साहित्यविषयक, कलात्मक इत्यादी विकास हा आर्थिक विकासावर आधारलेला असतो. परंतु या सगळ्यांची एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया होत असते. आर्थिक परिस्थिती हे एकमेव क्रियाशील असे कारण असते आणि बाकीचे सगळे मात्र केवळ अप्रत्यक्ष प्रभाव पाडणारे असतात, अशातला प्रकार मुळीच नाही... लोक इकडून तिकडून सोयिस्करपणे अशी कल्पना करून घेण्याचा प्रयत्न करतात की, आर्थिक परिस्थिती आपोआप प्रभाव निर्माण करते, तशातला प्रकार नसतो. तसे मुळीच नसते." (एंगल्स यांचे बोगीयस यांस पत्र, २५ जानेवारी १८८४)

या पुढील उतारा तर आणखी पुढे जातो.

"...अधिक तरुण लोक कधी कधी आर्थिक बाजूवर तिच्या योग्यतेपेक्षा अधिक भर देतात. या वस्तुस्थितीचा दोष खुद्द मार्क्स व मी अशा आम्हा दोघांकडे अंशत: येतो. आमचे प्रतिस्पर्धी आर्थिक बाजूचा प्रभाव नाकारत होते आणि म्हणून त्यांना अनुलक्षून मुख्य तत्त्वावर आम्हाला भर देणे भाग पडले. आणि परस्पर क्रिया-प्रतिक्रियांमध्ये गुंतलेल्या इतर घटकांची योग्य ती संभावना करायला आम्हाला नेहमीच वेळ, स्थळ किंवा संधी मिळाली नाही..."

याच ठिकाणी स्वत:ला मार्क्सवादी समजणाऱ्यांच्या बाबतीत एंगल्स म्हणतात,

"...दुर्दैवाची गोष्ट म्हणजे फार फार वेळा असे घडते की, एक नवा तत्त्वविचार आपल्याला पूर्णपणे समजला आहे, असे लोकांना वाटते आणि आपण तो तत्त्वविचार लागू करू शकतो असे त्यांना वाटते. आणि या ठपक्यातून मी अधिक अलीकडच्या 'मार्क्सवाद्यांपैकी' अनेकांना वगळू शकत नाही, कारण त्या क्षेत्रातूनदेखील अत्यंत आश्चर्यकारक कचरा पैदा करण्यात आलेला आहे..." (एंगल्स यांचे ब्लॉख यांना पत्र, २१-२२ सप्टेंबर, १८९०)

वरील अवतरणांमधून काही बाबी स्पष्ट होतात.

१) आर्थिक घटक हा जीवनाचा मुख्य आधार असतो.

२) जीवन जाणिवेची निश्चिती करते. जाणीव जीवनाची निश्चिती करीत नाही.

३) धर्म, तत्त्वज्ञान, नीती, कायदे, संस्कृती यांचा विकास भौतिक-आर्थिक जीवनाच्या विकासावर आधारित असतो.

४) आर्थिक घटक हा जीवनाचा एकमेव निर्णायक घटक नसतो. आर्थिक घटक हा एकमेव क्रियाशील घटक नसतो.

५) धर्म, तत्त्वज्ञान, नीती, कायदे, संस्कृती इत्यादी घटकसुद्धा आर्थिक घटकांवर प्रभाव पाडीत असतात.

६) मार्क्स-एंगल्स यांच्या तत्त्वज्ञानाचे विरोधक जीवनातील आर्थिक घटकाचे महत्त्व नाकारत होते. त्यांचा प्रतिवाद करताना मार्क्स-एंगल्स यांनी आर्थिक बाजूवर भर दिला. त्यामुळे आर्थिक बाजूवर तिच्या योग्यतेपेक्षा जास्त भर देण्याची चूक घडू शकेल असे काही विचार त्यांच्या प्रतिपादनात आले.

७) मार्क्सवादी म्हणविणाऱ्यांकडूनसुद्धा मार्क्सवादाचे नीट आकलन मांडले गेले नाही.

वरील विचारांवरून 'मार्क्सवादा'ची सैद्धान्तिक भूमिका स्पष्ट होते

धर्म विशिष्ट परिस्थितीत निर्माण झाला आणि त्याचा जीवनावर काही परिणाम निश्चितच असतो. ज्या विशिष्ट परिस्थितीमुळे धर्म निर्माण झाला, ती परिस्थिती नष्ट केल्याशिवाय नुसती टीका करून धर्म नाहीसा होणार नाही.

## धर्मविषयक भूमिकेची व्यूहरचना कशी असावी?

धर्माविषयीच्या भूमिकेची 'सैद्धान्तिक चर्चा' आणि 'चळवळीची' भूमिका यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. सैद्धान्तिक भूमिका आणि 'चळवळीची' भूमिका या दोन टप्प्यांवरच्या दोन वेगवेगळ्या भूमिका असतात. पण अर्थातच त्या एकमेकांविरुद्ध असता कामा नयेत. सैद्धान्तिक भूमिका आणि तात्कालिक स्थलकालसापेक्ष रणनीती या दोन वेगवेगळ्या भूमिका आहेत. परंतु त्या एकमेकांविरुद्ध असता कामा नयेत. एका भूमिकेचा छेद दुसऱ्या भूमिकेला जाता कामा नये. उलट एका भूमिकेतून दुसऱ्या भूमिकेत जाण्याची गरज लक्षत ठेवूनच या वेगवेगळ्या भूमिका निश्चित केल्या गेल्या पाहिजेत. या दृष्टीनेच 'पुरोगामी चळवळीची धर्मविषयक भूमिके'ची चर्चा करावी.

धर्माच्या आधारे राजकारण करू इच्छिणाऱ्या शक्ती आपल्या देशात संघटित व आक्रमक होत आहेत. या धर्मांध शक्तींची मजल त्यांचा स्वत:चा सेक्युलरिझमच खरा असून पुरोगामी शक्तींचा सेक्युलरिझम नकली आहे अशा मतलबी आरोपापर्यंत गेली आहे. आणि सामान्य नागरिक सेक्युलरिझमचे तत्त्व व व्यवहार या बाबतीत भ्रमचित्त झाले आहेत व केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर आपणास विचार करावयाचा आहे.

## धर्मविषयक भिन्न भूमिका

वेगवेगळे समाज विभाग आणि व्यक्ती धर्माच्या बाबतीत ज्या भूमिका घेतात त्यात अनेक प्रकार आहेत. त्यांच्या या भूमिका सतत एकच असतात असेही नसते. त्यात बदलही होतात व होत राहतात, असे बदल घडविणे शक्य असते. असे प्रकार स्थूलमानाने पुढीलप्रमाणे सांगता येतील: धर्मविरोधक म्हणजे धर्माला संपूर्णतया विरोध करणारे / धर्मासंबंधी उदासीन असलेले—ज्यांना धर्मासंबंधी काही भूमिकाच नाहीत असे / धर्म न मानणारे निधर्मी / धर्मनिरपेक्ष इहवादी / धर्मसुधारक / धर्मातील निरर्थक कर्मकांडास विरोध करणारे परंतु धर्मातील नीती मान्य करून ती स्वीकारणारे / जुनाट धर्म नाकारून नवाच धर्म स्थापणारे व तो स्वीकारणारे / जुन्या धर्मात नवा पंथ स्थापणारे व तो स्वीकारणारे / सर्व धर्मांबद्दल सहिष्णू असणारे / सर्वधर्मसहिष्णू / स्वत:च्या धर्माबद्दल अभिमान बाळगणारे परंतु दुसऱ्याच्या धर्माबद्दल सहिष्णू असणारे परधर्म-सहिष्णू / सर्वच धर्मासंबंधी समान भूमिका ठेवणारे सर्वधर्म-समभावी / सर्व धर्मांचा मूळ गाभा एकच आहे असे मानून व्यवहार करणारे सर्वधर्म-समन्वयक / आपल्या धर्माप्रमाणे जाणतेपणाने व्यवहार करणारे धार्मिक / धर्मचिकित्सेत न पडता परंपरेने चालत आलेले धर्मविधी करीत राहणारे धर्मभोळे / धर्माच्या पकडीत अडकलेले, धर्मावर अडाणीपणाने पण प्रामाणिकपणाने विश्वास ठेवणारे धर्मश्रद्ध / धर्माधर्मातील सत्यांश शोधत शोधत व्यवहार करणारे सत्यशोधक / स्वत:च्या धर्मावर आंधळेपणाने प्रेम करणारे परंतु त्याच वेळी परधर्माचा द्वेष करणारे परधर्मद्वेष्टे / स्वत:चा आणि कोणताच धर्म न आचरणारे पण परधर्माचा द्वेष पसरवणारे अधार्मिक परधर्मद्वेष्टे / धर्मातील कर्मकांडावर ज्यांची उपजीविका अवलंबून आहे असे हितसंबंधी धर्मपूजा सांगणारे / स्वत: धर्म न पाळणारे परंतु इतरांना धर्म पाळायचा उपदेश करून तसे करायला लावून स्वहित साधणारे / स्वत:ची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी व स्वार्थ साधण्यासाठी धर्माचा उपयोग करून घेणारे / स्वत:च्या धर्माआधारे मते मिळविणारे / परधर्म द्वेष पसरविणारे / धर्माचा राजकारणासाठी वापर करणारे / धार्मिक उन्माद पसरवून समाजात दंगे माजवून स्वत:चे आर्थिक-सामाजिक-राजकीय स्वार्थ साधणारे / इत्यादी इत्यादी.

ही कंटाळवाणी यादी आणखी वाढवता येईल. यातले प्रकार एकमेकांत मिसळणारे आहेत. एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात सतत किंवा अधूनमधून जाणारे समाज विभागही आहेत.

या भिन्न प्रकारांत मोडणाऱ्या काही प्रकारांतील समाज विभागांना एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात नेणे शक्य असते. तसे करायला हवे. कुठपर्यंत नेता येईल हा प्रश्न वेगळा. तो अनेकदा परिस्थितीवरही अवलंबून असतो.

पुरोगामी चळवळीने या भिन्न प्रकारांचे भान ठेवून प्रत्येक प्रकारच्या जनसमूहासंबंधी आणि व्यक्तीसंबंधी आपली भूमिका ठरविली पाहिजे.

रणनीती ठरविताना, व्यूहरचना करताना या प्रकारातील कोणते पक्के मित्र, कोणते कच्चे मित्र, कोणते डळमळीत मित्र, कोणते पक्के शत्रू, कोणते तात्कालिक शत्रू, कोणते चुकून शत्रुगोटात गेलेले, कोणते कायमचे व पक्के शत्रू हे ठरविले पाहिजे.

सर्व प्रकारच्या जनसमूहांबद्दल सरसकट, सरधोपट, एकच भूमिका पुरोगामी चळवळीने घेऊ नये. वरील प्रकारांत शत्रू, मित्र, कच्चे, पक्के हे ओळखायला अडचण पडू नये.

## मुख्य रोख क़ोणावर?

सामान्य माणसांच्या धर्मविषयक भावनांचा गैरवापर करून स्वत:चे सर्व प्रकारचे स्वार्थ साधू पाहणारा धर्मद्वेष्टा भारतीय जनता पक्ष आणि संघ परिवारातील सर्व संघटना—मग त्या कितीही चांगले रूप धारण करून आणि सकृत दर्शनी जनसेवेचे, विधायक, चांगले दिसणारे कार्य करणाऱ्या असोत—हे या रणनीतीचे किंवा व्यूहरचनेतील मुख्य लक्ष्य असले पाहिजे. या विविध संघटनाच नवी रूपे धारण करून येतात, नवी कार्ये करतात, त्याद्वारे लोकसंग्रह करतात आणि त्यांच्या राजकीय शाखेला बळ प्राप्त करून देतात. मोठ्या हुशारीने आणि परंपरागत शिताफीने ते हे कार्य करतात. त्यांची शिताफी एवढी बेमालूम असते की अनेक पुरोगामी त्याला फसतात आणि त्यांच्या व्यासपीठावर जाऊन त्यांची विश्‍वासार्हता वाढवतात. मुख्य शत्रूविरुद्धचे लक्ष्य विचलित होऊ देऊ नये. त्यांच्या मायावी स्वरूपास भुलू नये.

नरेंद्र मोदी यांनी गुजराथ राज्यात अत्यंत भयानक असा नवा प्रकार अमलात आणला आहे आणि आता मोदी पॅटर्न महाराष्ट्रात व संपूर्ण देशात राबविण्याचे संघपरिवाराने पुन्हा पुन्हा घोषित केले आहे. संघपरिवाराचे हिंदुत्व हे हिंदुत्व नसून मोदीत्व आहे.

भारतीय राज्य घटनेआधारे मिळालेल्या सत्तेचा वापर त्यांनी अल्पसंख्याक मुसलमानांच्या मुडद्यांचा ढीग रचण्यासाठी केला आणि अशा मुडद्यांच्या ढिगाआधारे त्यांनी पुन्हा सत्ता मिळविली. मोदीत्व हा केवळ धर्माचा गैरवापर नाही. तो तर आहेच. परंतु त्याच वेळेला तो भारतीय राज्यघटनेचा गैरवापर आहे आणि भारतीय लोकशाहीला धोका आहे. लोकशाही गुंडाळून ठेवून त्यांना या देशात 'ठोकशाही' म्हणजेच हुकूमशाही आणावयाची आहे. मोदीत्वाचा धोका धर्मातील मूलतत्त्वांना आहे, भारतीय राज्यघटनेला आहे आणि लोकशाहीला आहे.

मोदीत्वाचे हे स्वरूप हे आपले हल्ल्याचे लक्ष्य असले पाहिजे.

## कुणास बरोबर घ्यावे?

कार्ल मार्क्स, लोहिया, आचार्य जावडेकर, म. फुले, आंबेडकर, शाहू, तुकाराम, गाडगेबाबा, तुकडोजी, साने गुरुजी तसेच सुफी संत या सर्वांचे अनुयायी हे या कार्यात बरोबर घ्यायला हवेत. कुणी कुणाला बरोबर घ्यायचे या वादात न पडता सर्वांनी एकत्र यायला हवे. या सर्वांच्या भूमिका एक असणार नाहीत हे स्पष्टच आहे. पण तशा त्या एकच असण्याची आज गरज नाही. धर्मद्वेष्ट्या राजकारणास/समाजकारणास/संस्कृतीस विरोध आणि बहुजनांच्या सर्व प्रकारच्या हिताची बांधिलकी एवढा पाया तूर्त पुरेसा आहे. या शक्तीत जास्त पुरोगामी आणि खरा पुरोगामी कोण याचा विचार काही वर्षे केला नाही, तरी चालेल. नव्हे तूर्त करूच नये. डावे कोण? पुरोगामी कोण? लोकशाहीवादी कोण? धर्मनिरपेक्ष कोण? या आघाडीचे स्वरूप काय? याचे नाव काय? या चर्चा मागाहून केल्या तरी चालतील. नंतर कराव्याच लागतील. पण नंतरचे नंतर पहावे. तूर्त 'संयुक्त' पुरे ठरेल. आपल्या मनातले, विचारातले पूर्वनिश्चित 'शिक्के' मारण्याचे कार्य नंतर हवे तर करू.

## चळवळ कशी व कशासाठी करावी?

पुरोगाम्यांच्या चळवळीचे मुख्य टोक कुणाविरुद्ध असावे आणि कुणाकुणास आणि कसे बरोबर घ्यावे हे जसे महत्त्वाचे आहे, तसेच ती चळवळ कशी करावी व कोणत्या प्रश्नांवर किंवा मुद्द्यांवर करावी हेसुद्धा महत्त्वाचेच प्रश्न आहेत.

## धर्मद्वेष्ट्यांची आर्थिक भूमिका

भाजपा आणि संघपरिवारातील इतर संघटनांचे सत्य स्वरूप जनतेसमोर मांडताना एक चूक होत आली आहे. ते धर्मद्वेष पसरवितात आणि धर्माचा राजकारणासाठी वापर करतात हे आपण मांडतो. (रथयात्रा नव्हे मतयात्रा). परंतु त्यांचे आर्थिक धोरण पुरेशा प्रमाणात मांडले जात नाही. आजच्या खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण म्हणजे खाउजा या नव्या आर्थिक धोरणाचे खरे पुरस्कर्ते भाजपा आणि संघपरिवार आहेत. त्यांचे आर्थिक धोरण गरीबविरोधी आहे. श्रीमंतांना अनुकूल आहे, देशविरोधी आहे आणि परदेशधार्जिणे आहे. स्वावलंबनविरोधी असून परावलंबी आहे. स्व-तंत्रास विरोधी असून परतंत्रास अनुकूल आहे. जागतिक राजकारणात ते अमेरिकेचे लांगूलचालन करणारे आहेत. ते युद्धखोर बुश यांच्या बाजूचे आहेत. सामान्य जनांच्या भाषेत ते अमेरिकेची चमचेगिरी करीत आहेत. त्यांची आर्थिक भूमिका सामाजिक न्यायाच्या विरोधी आहे हे सारे जास्त भर देऊन खुलासेवार पद्धतीने मांडले गेले पाहिजे. त्यांच्याभोवती फसवून गोळा केलेले जनसमूह गरीब आहेत. या भूमिका मांडल्यामुळे त्यांना त्यांच्यापासून दूर करणे शक्य आहे. सामान्य जनता

देशप्रेमी असते. अमेरिकाधार्जिणी नसते. भाजपा व संघपरिवार हे देशविरोधी आहेत. अमेरिकेच्या हितासाठी देशाचा कारभार चालवतात. त्यांनी चुकूनही स्वातंत्र्य चळवळीत भागीदारी केली नाही. आजही संघ कार्यालयावर राष्ट्रध्वज लावला जात नाही. संघपरिवाराने १५ ऑगस्ट हा दिवस 'काळा' दिवस म्हणून पाळला आहे. त्यांच्या विचारातून त्यांच्या विचाराच्या अनुयायाने—नथुराम गोडसे याने—महात्मा गांधींचा खून केला आहे. हे सारे सारे मांडले पाहिजे. केवळ ते धर्माचा गैरवापर करतात एवढे पुरेसें नाही.

## भ्रष्टाचारी धर्मद्वेष्टे

धर्माच्या नावाने राजकारण करणारे आणि हिंदुहृदयसम्राट म्हणवून घेणाऱ्यांचे भ्रष्टाचारी आणि अनैतिक व्यवहार खुलासेवार, तपशीलवार आणि पुन्हा पुन्हा सतत मांडले पाहिजेत. त्यातूनच ते स्वत: धर्माने सांगितलेली कोणतीच नीती पाळत नाहीत हे स्पष्ट होईल. ते स्वत: धार्मिक नाहीत हे स्पष्ट होईल आणि त्यांच्याभोवती फसवून गोळा केलेले जनसमूह त्यांच्यापासून दूर होतील.

## धर्मद्वेष्ट्यांचा इतिहास

त्यांचा इतिहास लोकांसमोर मांडला पाहिजे. पुन्हा पुन्हा मांडला पाहिजे. (महात्मा गांधींचा खून, अटलबिहारी वाजपेयींची माफी, स्वातंत्र्य चळवळीला त्यांचा असलेला विरोध, ४२च्या आंदोलनविरोधातली शामा प्रसाद मुखर्जी आणि बॅरिस्टर सावरकरांची भूमिका, ४२च्या आंदोलनासंबंधी गोळवलकरांची भूमिका, १५ ऑगस्ट १९४७ रोजी त्यांनी पाळलेला काळा दिन इत्यादी व तत्सम.) त्यांचे घाणेरडे रूप जनतेसमोर आले पाहिजे. त्यामुळेच त्यांच्या बाह्य अंगाला आणि भुलविणाऱ्या भाषेला भाळून त्यांच्याभोवती फसवून गोळा केलेले जनसमूह त्यांच्यापासून दूर होतील.

त्यांची आपापसातली अनेक लफडी व कुलंगडी आहेत. तीसुद्धा पुन्हा पुन्हा जनतेसमोर मांडली पाहिजेत.

## प्रतिमाभंजन

पुरोगाम्यांना स्फूर्तिप्रद आणि आदर्श असलेल्या प्रतिमा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न ते करीत असतात. (अरुण शौरींचे डॉ. बाबासाहेबांवरील पुस्तक, बाळ गांगलचे महात्मा फुलेंसंबंधीचे लिखाण इत्यादी.) पुरोगामी मात्र त्यांच्या प्रतिमांना हात लावताना दिसत नाहीत. ते खोटे जितक्या शिताफीने, जितक्या नेटाने, वेगवेगळ्या रीतीने आणि पुन्हा पुन्हा मांडत असतात तसे आपण सत्यसुद्धा मांडत नाही. मग त्यांच्याभोवती फसवून गोळा केलेले जनसमूह त्यांच्यापासून दूर कसे होतील?

## धर्मद्वेष्ट्यांचे बदलते रूप

भाजपा-सेना आणि त्यांच्या परिवारातील त्यांच्या संघटनांचे बदलते बाह्य रूप आणि बदलते डावपेच लक्षात न घेता पुरोगामी चळवळ व्यवहार करताना दिसते. 'हे ब्राह्मणांचे (बामणांचे) पक्ष आहेत, उच्चवर्णीयांचे पक्ष आहेत, शहरी पक्ष आहेत', ही पंचवीस वर्षांपूर्वीची विधाने आपण आजही करत राहतो. त्यांनी नवा मुखवटा धारण केला आहे. दलित, शोषित, मागास, अल्पसंख्य यांच्यातील चार-दोन पुढाऱ्यांना हाताशी धरून त्यांना प्रतिष्ठेची आणि जुजबी सत्तेची स्थाने देऊन त्यांच्या जातिधर्माचे जनसमूह ते आकर्षित करतात. ग्रामीण आणि अगदी दूरवरच्या आदिवासी विभागातही त्यांनी त्यांचे जनाधार उभे केले आहेत. काही व्यक्तींचा लाभ झाला परंतु त्या व्यक्ती ज्या जातिधर्मांच्या आहेत त्या जनसमूहांना लाभ झाले नाहीत आणि होणारही नाहीत, हे जितक्या स्पष्टपणे आणि जितक्या ठोसपणे आपण मांडावयास हवे तसे मांडत नाही. परिणामी त्यांच्या भोवतीचे फसवून नेलेले जनसमूह त्यांच्यापासून दूर होत नाहीत.

## धर्मद्वेष्ट्यांशी कशावर लढावे?

मुख्य म्हणजे केवळ त्यांच्यावर टीका करून किंवा त्यांच्या धर्मविषयक भूमिकांवर हल्ला करून त्यांचा मुकाबला करता येणार नाही. नुसत्या टीकेने फार काही साधत नाही. गेल्या दशकातील भारतीय आणि महाराष्ट्रातील राजकारणाची मुख्य गोची ही आहे की धर्मद्वेष्टे हे राजकारणातील मुद्दे किंवा कार्यक्रमपत्रिका ठरवितात आणि पुरोगामी त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करतात किंवा त्यासंबंधीचा व्यवहार करतात. अजेंडा ते ठरवितात आणि त्यांनी ठरविलेल्या अजेंड्यावर पुरोगामी चर्चा व व्यवहार करतात. लढाईचे मैदान ते ठरवितात, लढाईची वेळ ते ठरवितात, लढाईचे कारणही तेच ठरवितात. आणि पुरोगामी त्यांच्या मैदानात, त्यांनी ठरविलेल्या वेळी आणि त्यांच्या कारणावर लढाई करीत राहतात. पुरोगाम्यांच्या पीछेहाटीची ही खात्रीशीर पद्धत आहे.

## पुरोगाम्यांनी काय करावे हे प्रतिगामी ठरवितात

सामान्य जनतेसमोरील खऱ्या प्रश्नांची मांडणी पुरोगामी शक्ती पुरेशा प्रमाणात करत नाहीत. मंदिर-मशीद या विषयावर, धर्म या विषयावर आणि तत्सम विषयावर जितके परिसंवाद, जितक्या परिचर्चा, जितके खास अंक, जितकी खास व्याख्याने इत्यादी झाली, तितकी देशातल्या सामान्य जनतेसमोरच्या आर्थिक प्रश्नांवर झाली नाहीत. होत नाहीत.

## आपले कार्यक्रम

तथाकथित नव्या आर्थिक धोरणांचे प्रत्येक क्षेत्रावर भयानक विपरीत परिणाम होत आहेत. देशाचे आर्थिक स्वावलंबन धोक्यात आहे. आर्थिक आणि मागोमाग राजकीय निर्णय घेण्याचे देशाचे स्वातंत्र्य संकुचित होत आहे. बेकारी अधिक वाढत आहे. विषमता वाढत आहे. चंगळवाद येतो आहे. परकीय भांडवलाबरोबर परकीय चंगळवादी, हिंसा आणि गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारी भ्रष्ट संस्कृती झपाट्याने येते आहे. मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा अंगभूत गुणधर्म असलेला भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीकरण वाढते आहे. वाढणार आहे. व्यसनाधीनता वाढते आहे. तथाकथित नवीन आर्थिक धोरणाने भारतीय उद्योग धोक्यात येत आहेत. छोटे उद्योग मरत आहेत. सुरुवातीला ज्यांनी या नव्या आर्थिक धोरणाचे समर्थन केले, त्यांनासुद्धा त्यांनी जाहीरपणे बोलण्याइतके या परिणामांचे भान आले आहे. शेतीक्षेत्र अधिकच अडचणीत येत आहे, पर्यावरण उद्ध्वस्त होत आहे. विकासातील क्षेत्रीय विषमता वाढत आहे.

हे आणि तत्सम प्रश्न हे खरे प्रश्न आहेत. या प्रश्नावरच्या संघर्षामधूनच धर्मद्वेष्ट्यांभोवती गोळा झालेले जनसमूह त्यांच्यापासून दूर करता येणार आहेत. या प्रश्नांवरच धर्मद्वेष्ट्यांना बचावात्मक पवित्रा घ्यावा लागणार आहे. या प्रश्नावरच्या संघर्षातूनच पुरोगामी शक्ती बळकट होऊ शकणार आहे.

लढाईचे मैदान बदलले पाहिजे. लढाईचे कारण बदलले पाहिजे. लढाईची वेळ आपण ठरविली पाहिजे.

## पर्यायांचा प्रश्न

धर्मद्वेष्ट्यांविरुद्ध लढताना धर्मविषयक जी भूमिका घ्यावी लागते त्यातही पर्यायांचा प्रश्न उद्भवतो. जुने उत्सव, जुनी प्रतीके, टाकाऊ परंपरा यांना विरोध करताना नवे उत्सव, नवी प्रतीके, नव्या परंपरा निर्माण कराव्या लागतील. आर्थिक विकासाच्या धनिकधार्जिण्या धोरणांना विरोध करताना पर्यायी विकास-नीती आणि पर्यायी आर्थिक धोरण मांडावे लागेल.

## पुरोगाम्यांची परंपरागत टिकाऊ फाटाफूट

पुरोगाम्यांची फाटाफूट हा आजचा सर्वांत भयानक महारोग आहे. या भयानकपणात भरीस भर म्हणून सर्व पुरोगामी फाटाफूट नको असे म्हणत राहतात, जूट हवी असे म्हणत राहतात आणि परंपरागत फाटाफूट चालू ठेवतात. मधून मधून आणखी एखादी फूट करतात.

कधी कधी असे वाटते की महाराष्ट्रातील आणि देशातील पुरोगामी जरुरीपेक्षा जास्त चर्चा करतात. ही सारी चर्चा 'खरी पुरोगामी' भूमिका कोणती यावर केंद्रित करतात. ही चर्चा कधीही न संपणारी असते. चर्चा चालू राहते आणि कृतीला उसंत मिळत नाही. उसंत मिळाली तर बळ उरत नाही. प्रतिगामी धर्मद्वेष्टे चर्चेऐवजी कृती राहतात आणि पुरोगामी त्यासंबंधी प्रतिक्रिया आणि तीही वेगवेगळी करीत राहतात.

काटेकोरपणे रेखीव-आखीव भूमिका आधी निश्चित न करता मुख्य रोख कुणाविरुद्ध आणि स्थूलमानाने कशासाठी व कुणासाठी ते ठरवून कृतीस सुरुवात करावी. कृती करत रहावी आणि चर्चाही करत रहावी. कृतीच भूमिकेत स्पष्टता आणील.

धर्माआधारे राजकारण करू पाहणाऱ्या धर्मद्वेष्ट्यांनाही धर्माआधारे अधिक आणि टिकाऊ स्वरूपाची प्रगती करता येत नाही याचे भान येत आहे. हिंदुहृदयसम्राट हे खंडणी व भ्रष्टाचार-सम्राट आहेत याची जाणीव महाराष्ट्रात हळूहळू विस्तारत आहे. संधी आहे. पण नुसती संधी असून भागत नाही.

**कॉ. लेनिन यांच्या धर्मविषयक लेखसंग्रहातील–'धर्म'मधील–काही अवतरणे**

"समाजवादी व साम्यवादी पक्षांनी आस्तिक व्यक्तींना पक्षाचे सभासद करून घ्यावे का? या प्रश्नाचे उत्तर लेनिन यांनी दिले आहे की, अशा व्यक्तीला सभासद करून घ्यावे. नास्तिकपणाची अट घातली तर लाखो कामगारांना व इतर गरीब लोकांना पक्षाचे सभासद होताच येणार नाही. समाजवादाचे तत्त्वज्ञान निरीश्वरवादी आहे, मग पक्षात आस्तिकाला घेणे, हा केवळ संधिसाधूपणा नाही का? यावर लेनिन यांनी दिलेले उत्तर असे की आमचा पक्ष आस्तिक-नास्तिक यांच्या तात्त्विक चर्चेसाठी नसून पिळवणूक करणाऱ्या जनतेला नव्या मानव जीवनाकडे नेणाऱ्या लढ्याचा मार्ग दाखविणारा तो राजकीय सार्वजनिक पक्ष आहे. आमच्या पक्षाच्या कार्यक्रमातही नास्तिकपणाच्या प्रचाराचे कलम नाही. नास्तिकतेची अट जनसंघटनेत ठेवणे चूक आहे, असे आमचे धोरण आहे." (श्री. दि. के. बेडेकर यांच्या प्रस्तावनेतून)

"कामगार पक्षाचे राजकीय उद्दिष्ट म्हणून धर्माविरुद्ध मोहीम जारी करणे म्हणजे नुसता अराजकवादी बाष्कळ अभिनिवेश होय." (पृ. ८)

"मार्क्सवादाबद्दल वरवर विचार करणाऱ्यांना, किंवा त्यासंबंधी डोक्याला शीण न देणाऱ्यांना वाटते की मार्क्सवादाचे धर्मविषयक धोरण म्हणजे नुसती अर्थशून्य धरसोड व विसंगती आहे. त्यांना वाटते की खंबीर निरीश्वरवादावर धर्माला न दुखविण्याच्या वृत्तीचे कलम लावण्याचा हा खटाटोप आहे किंवा ते असेही समजतात की मार्क्सवाद्यांना एकीकडे ईश्वराविरुद्ध क्रांतिकारक लढा तर पुकारावयाचा आहे

पण दुसरीकडे कामगारांनी बिचकू नये व त्यांच्या धर्मश्रद्धेलाही जमले तर गोंजारावे अशी भेकडपणाची वृत्ती आहे, आणि या दुहेरीपणामुळेच मार्क्सवाद्यांची तत्त्वशून्य धरसोड होत आहे. अराजकवाद्यांनी प्रसवलेल्या पांडित्यात मार्क्सवादावर केलेली अशा प्रकारची टीका हवी तेवढी आढळते.'' (पृ. ९)

''प्राथमिक स्वरूपातच राहिलेल्या वस्तुवादाच्या पुढे मार्क्सवाद जातो व म्हणून त्याचा कटाक्ष असा आहे की, धर्माचा विरोध करण्यात आपल्याला प्रत्यक्ष यश आले पाहिजे आणि त्यासाठी जनतेमध्ये श्रद्धाळूपणा व धर्म यांचा वरचष्मा का आहे याची वस्तुवादी दृष्टीने उपपत्ती सांगणे आवश्यक आहे.'' (पृ. १०)

''असे विचारण्यात येते की एखाद्या पाद्र्याला सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे सभासद करून घेता येईल की नाही? आणि साधारणत: असे उत्तरही देण्यात येते की तसे करण्यास मुळीच हरकत नाही. युरोपमधील पक्षांनी तसे केले असल्याचा हवालाही देण्यात येतो. आता या ठिकाणी लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, युरोपमधील विशिष्ट ऐतिहासिक परंपरा लक्षात घेतली होती हेही विसरून चालणार नाही. तशी ऐतिहासिक परंपरा व स्थिती रशियात नाही याबद्दल सविस्तर विवेचन मी मागून देईन. पण तशी ती नाही ही गोष्ट लक्षात न घेता पाद्र्यांना घेण्याच्या बाबतीत सरसकट होकारार्थी निर्णय घेणे चूक आहे. त्यांना आपल्या पक्षाचे सभासद करून घेण्यासंबंधी असेही म्हणून चालणार नाही की, कोणत्याही परिस्थितीत त्यांना घेऊ नये असा कायमचाच निर्बंध घालावा. उलट मुक्तद्वार ठेवण्याचा निर्णयही चुकीचा ठरेल.'' (पृ. १४)

''धर्मश्रद्धा असणाऱ्या कामगारांच्या बाबतीत असे म्हणता येईल की, त्यांना पार्टीत सामील करून घेण्यास हरकत तर नाहीच, उलट त्यांना ओढण्यासाठी सध्यापेक्षा दुप्पट उत्साहाने आपण झटले पाहिजे. त्यांच्या धार्मिक समजुतीमुळे त्यांच्याविषयी थोडीशीही हेटाळणीची भाषा आम्हाला खपणार नाही. त्यांना पार्टीतसुद्धा घ्यावयाचे ते मुख्यत: त्यांना आपल्या कार्यक्रमासंबंधी व ध्येयासंबंधी कार्यप्रवण करण्यासाठी. धार्मिकतेविरुद्ध जहाल मोहीम उभारण्याच्या उद्देशाने नव्हे.'' (पृ. १५)

# साहित्याचे प्रयोजन काय?

आपल्या लिखाणाचा हेतू काय? साहित्याचे प्रयोजन काय? असले प्रश्न सच्च्या सत्यशोधकांना पडले नाहीत. त्यामुळे ते कधी गोंधळात सापडले नाहीत.

त्यांचा विचार रोखठोक होता. त्यांचा उच्चार रोखठोक होता. त्यांचा व्यवहार रोखठोक होता. म्हणूनच त्यांचे लिखाणही रोखठोक होते. प्रस्थापितांना ते रांगडे वाटले. ओबडधोबड वाटले. उद्धटपणाचे वाटले. शिवीगाळ करणारे वाटले. त्यांना ते तसे वाटणे स्वाभाविकच होते. आवश्यकही होते. कारण ते त्यांच्याविरुद्ध होते. त्यांच्या हितसंबंधांच्या विरुद्ध होते. ज्यांच्या हितासाठी सत्यशोधकांचा विचार होता, ज्यांच्यासाठी त्यांचा उच्चार व आचार होता, त्यांना कसे वाटले, हे महत्त्वाचे आहे. त्यांना ते आपले वाटले यातच सर्व काही आले.

परंपरांसंबंधी सत्यशोधकांचा समज स्पष्ट होता. या परंपरा लादलेल्या आहेत. हितसंबंधीयांनी लादलेल्या आहेत. मूठभरांचे हितसंबंध रक्षिण्यासाठी त्या लादलेल्या आहेत. या लादलेल्या परंपरा बहुजनांच्या हिताच्या नाहीत. त्या टाकाऊ आहेत. बहुजनांना गुलाम ठेवण्यासाठी या परंपरा वापरल्या जात आहेत. बहुजनांनी त्या झुगारून दिल्या पाहिजेत. त्यासाठी कठोर संघर्ष केला पाहिजे.

हा हितसंबंधांचा संघर्ष आहे. हितसंबंधांचे सर्व संघर्ष चिकाटीने, नेटाने आणि सातत्याने लढावे लागतात. त्यासाठी बहुजनांना सिद्ध करणे हे सत्यशोधकांच्या साहित्याचे प्रयोजन होते. बहुजनांचा न्यूनगंड नाहीसा करणे, गुलामी वृत्ती नाहीशी करणे, आत्मभान चेतवणे, स्वाभिमान जागृत करणे, ही गरज होती. त्यासाठी सत्यशोधकांचे लिखाण हे हत्यार होते. कठोर संघर्षासाठी हे हत्यार धारदार असणे जरूर होते. दयामाया आणि तथाकथित सभ्यता-शिष्टाचार पाळून चालणार नव्हते.

ज्यांनी बहुजनांना कधी दयामाया दाखविली नाही, त्यांच्याबद्दल दयामाया दाखविणे वेडगळपणाचे ठरले असते. आशयात आणि शैलीत संतुलन किंवा समन्वय ठेवून भागणार नव्हते. तडजोड करून चालणार नव्हते.

"तडजोड नाय रं तडजोड नाय" असा बाणा आवश्यक होता आणि सत्यशोधकांच्या पहिल्या दोन-तीन पिढ्यांनी तो बाणा स्वीकारला आणि टिकविला.

"काय सांगायचे" याचा "कसे सांगायचे" याच्याशी घनिष्ठ संबंध असतो. तिखटजाळ गरम रस्सा चमच्याने पाजून भागत नसते. तो ओरपता येईल असाच वाढावा लागतो.

गुलामी लादणाऱ्या टाकाऊ परंपरा उद्ध्वस्त करणे ही सत्यशोधकांची गरज होती. मूर्तिभंजकाची भूमिका वठवणे त्यांना आवश्यकच होते. गुळगुळीत आणि मिळमिळीत भूमिका बहुजनांच्या हितसंबंधांचे रक्षण करू शकत नव्हती. बारीकसारीक दुबळ्या हत्यारांनी त्यांचे भागत नव्हते. त्यांना दगड फोडणाऱ्या हातोड्यांची आणि वडाराच्या सुतकीचीच गरज होती. पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीच्या सत्यशोधक साहित्यिकांनी त्यांची लेखणी आणि वाणी दगडफोड्याच्या सुतकीसारखी वापरली. प्रस्थापितांनी या साहित्यासंबंधी बोंबाबोंब केली ती त्यामुळेच. त्यांनी लादलेल्या मूर्तींचे भंजन करणाऱ्या हातोड्यासंबंधी ते बोंबलतील नाही तर काय करतील?

"काय सांगायचे?" याचा "कसे सांगायचे" याच्याशी जसा संबंध असतो तसा "कुणाला सांगायचे" याच्याशीही संबंध असतो. सत्यशोधक साहित्यिकांना बहुजनांशी बोलायचे होते. त्यांना जागे करायचे होते. त्यामुळे सत्यशोधक साहित्यिक बहुजनांच्या भाषेत बोलले व त्या भाषेत त्यांचे लिखाण झाले. बहुजनांच्या आणि विशेषत: त्या काळातल्या बहुजनांच्या भाषेत शिव्यांची रेलचेल होती. सत्यशोधक साहित्यिक त्यांच्यातलेच होते म्हणून त्यांच्या लिखाणात शिव्या आल्या. खरे म्हणजे ज्यांना त्या लागल्या त्यांना झिणझिण्या आल्या. ज्यांनी त्या दिल्या त्यांना ते स्वाभाविकच होते. जिथे राग आल्यावर पोटच्या पोराला 'रांडच्या' म्हणून शिव्या हासडण्याची रीत असते तिथे गुलामी लादणाऱ्यांशी कसे बोलणार? आपला हेतू आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मूर्तिभंजकाची भूमिका वठवण्याची ज्यांना जबाबदारी स्वीकारावी लागली त्यांना आपल्या साहित्याची भाषाही अनुरूप ठेवावी लागली आणि शैलीही आक्रमक वापरावी लागली. आशय, भाषा आणि शैली यात सुसंगतता आणि परस्परपूरकता असावीच लागते. अर्थात मुख्य मुद्दा आशयाचा असतो.

महात्मा फुले या आद्य सत्यशोधकाच्या साहित्यातील हा उतारा पहा :

*पशुशिरी सोंड पोर मानवाचे ।। सोंग गणोबाचे ।। नोंद ग्रंथी ।।*
*बैसे उंदरावरी ठेवुनिया बूड ।। फुंकितो शेंबूड ।। सोंडेतून ।।*
*अंत्यजाशी दूर, भटा लाडू देतो ।। नाकाने सोलितो ।। कांदे जणू ।।*
*चिखला तुडवुनी बनविला मोऱ्या ।। केला ढंबू ढेऱ्या ।। भाद्रपदी ।।*
*उत्सवाच्या नावे द्रव्य भोंदाडिती ।। वाटी खिरापती ।। धूर्त भट ।।*
*खरे देवभक्त देह कष्टविती ।। पोषण करिती ।। घरच्यांचे ।।*

- महात्मा फुले

भाषा आणि शैली या बाबतचा आणखी एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा. ज्यांच्यासाठी लिहायचे-बोलायचे त्यांच्यात आशय ठोसपणे व धारदारपणे पोहोचेल; नुसता पोहोचणार नाही, वाचणाऱ्या, ऐकणाऱ्यांना तो आशय चेतवील, पेटवील, कार्यप्रवण करील अशी मांडणी पाहिजे. वाचणाऱ्या-ऐकणाऱ्याच्या भाषेत लिहिले-बोलले पाहिजे. सांगणाऱ्याने ऐकणाऱ्याच्या भाषेत बोलले पाहिजे.

महात्मा फुले आणि सच्च्या सत्यशोधकांना 'शूद्र अतिशूद्रांशी' बोलायचे होते. 'शेटजी भटजीशी' बोलायचे नव्हते. त्यामुळे त्यांची भाषा ही शूद्र अतिशूद्राची भाषा होती. म्हणजे ती वाईट होती, असे मुळीच नाही.

महात्मा फुले यांच्या लिखाणातील अवतरणे देऊन यासंबंधी भा. ल. भोळे लिहितात, "...ज्या समाजाशी आपल्याला संवाद साधायचा आहे त्याला मुळीच आपल्या लिपीतील मुळाक्षरसुद्धा वाचता येत नाही... त्यास वर्तमानपत्र म्हणजे काय, कोल्हा की कुत्रा, का माकड काहीच समजत नाही... तो दरिद्री समूळ ज्ञानहीन, सारासार विचार हरवून बसलेला, वाचण्याच्या नावाने गरगरीत पूज्य असलेला असा आहे."...

"...महापंडितांच्या अक्षर संस्कृतीपेक्षा संताची मौखिक संस्कृती जनसामान्यांच्या भावविश्वात चटकन मुरते आणि पक्की कोरली जाते हे जोतीरावांनी अचूक ओळखले होते." (*शोधाच्या नव्या वाटा,* पृ. १२९)

आपला हितसंबंध व मतलब साधण्यासाठी काही परंपरा समाजावर लादलेल्या होत्या. त्या उद्ध्वस्त करण्यासाठी 'मूर्तिभंजकाची भूमिका स्वीकारणे आवश्यकच होते. शूद्रातिशूद्रांना चेतवण्याची गरज होती. आशय, शैली व भाषेची निवड जोतीरावांनी व इतर काही सत्यशोधकांनी त्यासाठी केली; परंतु याचा अर्थ त्यांची भूमिका केवळ मूर्तिभंजकाची आणि केवळ उद्ध्वस्त करणाऱ्याची होती, असा मुळीच नाही. जोतीरावांना नवे काही घडवायचे होते. नवे आणण्यासाठी जुने समूळ उद्ध्वस्त

करणे अत्यावश्यक असते. नवे आणणे हे उद्दिष्ट असते. त्यासाठी जुने उद्ध्वस्त करावे लागते. जुने जसे आहे तसेच ठेवून नवे आणता येत नाही. तसा मार्ग स्वीकारला तर जुने नव्याला खाऊन टाकते आणि पुन्हा प्रस्थापित बनते. कधी कधी जुन्या-नव्याची अशी विचित्र मिसळ बनते किंवा बनविली जाते की जुनेच नवे वाटू लागते. सत्यशोधक जोतीरावांना नवे आणायचे होते. यासंबंधी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं निरीक्षण यथायोग्य आहे. ते लिहितात,

"...नवीन ध्येयांचा प्रत्यय आल्याशिवाय, नवीन प्रकारच्या सामाजिक उद्दिष्टांचा अर्थ समजल्याशिवाय परंपरागत सामाजिक संस्था नष्ट करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकत नाही..."

"सत्यशोधक समाज स्थापून त्यांनी सामाजिक आंदोलनाचा प्रयत्न केला. या आंदोलनाच्या मुळाशी काही विधायक स्वरूपाच्या ध्येयाचा विचार होता. हा विचार म्हणजेच मूलभूत मानवी हक्कांचा विचार होय. समाजातील बहुसंख्य जनतेचे सामाजिक शोषण बंद करून सर्व मानवांना मुक्त करणारा विचार म्हणजेच मानवी हक्कांचा विचार होय..."

"...जोतीबांच्या विश्व-कुटुंबवादाचा सार्वजनिक सत्यधर्म हा जाहीरनामा आहे. भारतीय लोकशाही क्रांतीची मूलभूत तत्त्वे विशद करून सांगणारा तो जाहीरनामा आहे...." (*म. फुले समग्र वाङ्मय,* प्रस्तावना)

जोतीरावांची मूर्तिभंजकाची भूमिका जेवढी प्रचारली गेली त्याच्या तुलनेत त्यांच्या या विधायक भूमिकेचा प्रचार मात्र फारच कमी झाला. अर्थात त्याला जोतीबा जबाबदार नाहीत. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीचे रूपांतर ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात झाले. आणि तेच चालू राहिले. बिघडत गेले.

ब्राह्मणेतर, मराठेतर, दलितेतर असा 'इतर वाद' जोर धरून राहिला आणि जोतीरावांची विश्वकुटुंबवादाची भूमिका मागे पडली. तर्कतीर्थांनी लिहिले त्याप्रमाणे "सत्यशोधक चळवळीचा विपर्यास म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ होय."

*ख्रिस्त महमंद मांग ब्राह्मणाशी ।। पोटाशी धरी बंधू परि ।।*

या महात्मा फुले यांच्या शिकवणुकीकडे दुर्लक्ष झाले. त्यांच्या या उपदेशात 'ब्राह्मण' समाविष्ट आहेत याकडे दुर्लक्ष झाले.

सोळाव्या सत्यशोधक सामाजिक परिषदेनिमित्त 'सत्यशोधक' मासिकाने काढलेल्या खास अंकाला पाठविलेल्या संदेशात डॉ. आंबेडकरांनी १९५० सालीच



124264

म्हटले आहे. "...ब्राह्मणेतरांनी जोतीबा फुले यांची स्मृती संपूर्णपणे पुसून टाकली आहे, इतकेच नव्हे तर त्या वर्गाने निर्लज्जपण फुले यांचा विश्वासघात केला आहे."

000

समाजजीवन आणि साहित्य यांचा संबंध अविभाज्य असतो. जीवनात असते ते साहित्यात दिसते. जीवन साहित्याला प्रभावित करते, तर साहित्य जीवनाला प्रभावित करते.

समाजजीवनातील चळवळ आणि साहित्य यांच्या अन्योन्य संबंधाची मोठी परंपरा मराठी भाषेला आहे. महानुभवांचे साहित्य, वारकरी संप्रदाय व संतांचे साहित्य, दलित चळवळ व दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्वातंत्र्य आंदोलन काळातील साहित्य, स्वातंत्र्योत्तर काळातील, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळातील साहित्य अशी काही ठरावीक उदाहरणे पुरेशी ठरतात. सत्यशोधकांचे साहित्य ही याच परंपरेतील महत्त्वाची कडी आहे. मग साहित्यातील प्रस्थापित विद्वानांनी त्याला मान्यता दिलेली असो अगर नसो. महाराष्ट्रात सर्वदूर, खेडोपाडी, शूद्र-अतिशूद्रात पसरलेली आणि प्रभाव पाडलेली त्या काळातील सर्वांत मोठी चळवळ म्हणजे सत्यशोधक चळवळ होय. याच चळवळीने साहित्य निर्माण केले आणि समाजजीवनावर प्रभाव पाडला. या चळवळी हे त्या काळातील शोषितांच्या समाजजीवनाचेच प्रतिबिंब होय.

महात्मा फुले, स्वतंत्र काव्य करणाऱ्या सावित्रीबाई फुले, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, भगवंतराव पाळेकर, नारायण मेघाजी लोखंडे, माधवराव विचारे, दिनकरराव जवळकर, भास्करराव जाधव, खंडेराव बागल, माधवराव बागल, प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे इत्यादी काही प्रमुख नावे सांगता येतील.

सत्यशोधकांनी काढलेल्या आणि मोठ्या हालअपेष्टा सोसून चालविलेल्या नियतकालिकांची संख्यासुद्धा खूप मोठी आहे. भौगोलिक विस्तारही व्यापक होता. म. फुले यांचा 'सत्सार', मुंबईहून प्रकाशित होणारा नारायण मेघाजी लोखंडे यांचा 'दीनबंधू', कृष्णराव भालेकर आणि मुकुंदराव पाटील या पिता-पुत्रांचा अहमदनगर जिल्ह्यातील एका खेडेगावातून प्रसिद्ध होणारा 'दीनमित्र', बडोद्याहून प्रसिद्ध होणारे भगवंतराव पाळेकरांचे 'जागृती', दिनकरराव जवळकरांचा 'कैवारी', बेळगावहून प्रसिद्ध होणारा शामराव देसाई यांचा 'राष्ट्रवीर', पुण्याहून प्रसिद्ध होणारा श्रीपतराव शिंदे यांचा 'विजयी मराठा', कोल्हापूरच्या खंडेराव बागल आणि माधवराव बागल या पिता-पुत्रांचा 'हंटर' आणि 'अखंड भारत', केशव सीताराम ठाकरे यांचे 'प्रबोधन', विश्वनाथ वाबळे यांचे 'शिवनेर', ही काही नावे आहेत. नव्या सत्यशोधकांनी याची

नीट यादी केली पाहिजे. अभ्यास केला पाहिजे, मूल्यमापन केले पाहिजे, हा वारसा पुढे आणला पाहिजे आणि पुढे नेला पाहिजे.

000

साहित्याच्या अनेक क्षेत्रांत 'पहिले' असल्याचा मान सत्यशोधकांच्या वाङ्मयाचा आहे. प्रस्थापित हितसंबंधांचे संरक्षण करणाऱ्यांनी हे सत्य मान्य केले नसले, नोंदलेले नसले तरी ते सत्य आहेच.

एखाददुसरा क्षीण अपवाद सोडला तर सत्यशोधकी साहित्याची आणि नियतकालिकांची बळकट असलेली स्वातंत्र्यपूर्व काळातील परंपरा खंडित झाली, असे दु:खाने म्हणावे लागते. बहुजनांतील शिक्षणप्रसार पुरेसा नसला तरी वाढला आहे. लिहिणाऱ्यांची संख्या वाढली आहे. 'शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया' लिहू लागल्या आहेत. त्यांची संख्याही वाढते आहे. मग असे का होते आहे? याचा आपण सर्वांनी विचार करायला हवा.

ज्या ब्राह्मण्याच्या प्रादुर्भावाविरुद्ध म.फुले व इतर सत्यशोधकांनी कठोर संघर्ष केला ते ब्राह्मण्य तर आजही आहे. नव्या ब्राह्मण्याने रंग, रूप आणि वेशभूषा बदली असली तरी त्याचा मूळ गाभा तर तसाच आहे. वर्णवर्चस्वाचा नवा ब्राह्मण्यवाद आला आहे. आपल्या देशात येऊन राज्य करून शोषण करणारा सत्यशोधकांच्या कार्यकाळातील इंग्रजांचा वसाहतवाद गेला असला तरी त्यांच्या देशातच राहून, आमच्या देशाची धुरा आमच्यातल्याच पुढाऱ्यांच्या हाती देऊन, तरीसुद्धा आमच्या देशाचे म्हणजेच आमच्या देशातील बहुजनांचे शोषण करणारा अमेरिकन नववसाहतवाद आला आहे. ब्राह्मण्यवाद आणि नववसाहतवाद या दोन्ही शोषण व्यवस्था एकटवून वापरणाऱ्या राजकीय शक्ती वरचढ बनत आहेत.

१९४८ साली म. गांधींचा खून झाला. संताप अनावर झालेल्या बहुजनांनी या ब्राह्मण्यवादी प्रवृत्तिधारकांची घरेदारे जाळली. परंतु त्यातून साध्य काय झाले? पन्नास वर्षांतच त्या प्रवृत्ती या देशात आणि सत्यशोधकांच्या या राज्यात राज्यकर्त्या बनल्या. आजही त्या सत्तेच्या दावेदार आहेत. त्याला कुणाकुणाचे दोष आणि कुणाकुणाचे वर्णीय-वर्गीय हितसंबंधांचे स्वार्थ जबाबदार आहेत, याची चर्चा होऊ शकते आणि व्हायलाच हवी; पण असे घडण्यात, घडू देण्यात म. फुल्यांचा आणि सत्यशोधकांचा वारसा मिरविणाऱ्या आपल्यातील तुमच्या-माझ्यातील कोणते दोष आणि कोणत्या उणिवा कारणीभूत आहेत; याचीही चर्चा व्हायला हवी. इतरांचे दोष दाखविण्याबरोबर स्वत:च्या दोषांकडेही अंगुलीनिर्देश करायला हवा. हे दोष आणि या उणिवा कशा दुरुस्त करणार याची चर्चा सत्यशोधकी साहित्यिकांच्या या परिषदेत व्हायला हवी.

शोषित समाजाला प्रभावित करून प्रवृत्त करण्याची, चेतविण्याची जबाबदारी साहित्यिकांनी पार पाडायला हवी. मुख्यत: रणनीती ठरवायला हवी. योग्य रणनीती अभावीच अनेक वेळा बहुजन पराभूत झाले, असा इतिहासाचा दाखला आहे.

0 0 0

आजकाल आपल्या देशात काही गोष्टींचा जोर आहे. एक धर्माचा आणि दुसरा जातीचा. धर्माच्या जोरापेक्षा वर्णाचा जोर जास्त. वर्णापेक्षा जातीचा जोर जास्तच. जातीच्या जोरापेक्षा पोटजातीचा जोर अधिक. धर्माच्या जोरापेक्षा पंथाचा जोर अधिक. जितका संकुचितपणा जास्त तितकी बांधिलकी जास्त, तितका जोर जास्त.

कमी-जास्तीच्या भाषेत एक आणखी कमी-जास्त आहे. स्व-धर्माचे प्रेम कमी, परधर्माचा द्वेष जास्त. स्व-जातीसंबंधी प्रेम कमी, परजातीसंबंधी द्वेष अधिक. खरे म्हणजे प्रेम कमी आणि द्वेष जास्त. प्रेमापेक्षा द्वेषाची ताकद जास्त असते. प्रेम करा असे सांगितले तर मिळमिळीत वाटते. द्वेष करा म्हणून सांगितले की, काहीतरी जोरात करावेसे वाटते. 'माणूस व्हा' म्हणून सांगितले तर जुनाट वाटते. 'जनावर व्हा' म्हणून सांगितले की, कसे आधुनिक किंवा अत्याधुनिक किंवा आधुनिकोत्तर आधुनिक वाटते.

महाराष्ट्र 'ब्राह्मणेतर' म्हणजे ब्राह्मण सोडून इतर असे राजकारण होऊनही गेले आणि चालूही आहे. नंतर मग 'मराठेतर' आले. तेही चालू आहे. आता 'दलितेतर' आले. तेही चालू आहे. हे फार उघडे-नागडे वाटले तर मग 'बहुजनवादी' व 'बहुजनेतर' आहेच.

ज्याचे आईबाप ब्राह्मण तो ब्राह्मण. जो ब्राह्मण तो वाईट. इतर सर्व चांगले. ज्याचे आई-बाप मराठे तो मराठा. मराठा तेवढा चांगला आणि इतर वाईट. याच रीतीने एकेका जातीला चांगले किंवा वाईट ठरवले जाते.

जन्माच्या अपघाताने चांगले किंवा वाईट ठरविण्याची ही सोपी रीत. 'आपला' कोण आणि 'परका' कोण हे जातीच्या आधारे ठरवायचे आणि मग 'आपला' तो 'बाब्या' आणि 'दुसरा' तो 'कारटा' समजून वागायचे.

याने काय साधणार? आजवर अशाने काय काय साधले?

काहीच साधले नाही असे मात्र बिलकूल नाही. जे बोलत नव्हते ते बोलू लागले. जे दुबळे होते ते जरा सबळ झाले. वरचे खालच्यांना दाबीत होते आणि खालचे दबून राहात होते ते कमी झाले. खालचेही जमेल तेवढे दाबादाबी करू लागले; परंतु खालच्यांची दाबादाबी वरच्यांच्या विरुद्ध कमी आणि अधिक खालच्यांच्या

विरुद्ध जास्त असे घडू लागले. मधल्यांनी वरच्यांना दाबायला खालच्यांची मदत घेतली. मधले वरचे बनले आणि खालच्यांना दाबू लागले.

म. फुले यांचे समाजकारण 'ब्राह्मणेतर' नव्हते. त्यांच्या सहकाऱ्यांत ब्राह्मण्य सोडलेले आणि सोडण्याचा प्रयत्न करणारे ब्राह्मण होते. ब्राह्मणेत्तर राजकारण हा म. फुले यांच्या भूमिकेचा विपर्यास आहे. ब्राह्मणेतर राजकारणाच्या काळात मराठ्यांनी ब्राह्मणेतरांचे पुढारीपण केले. ब्राह्मणांना मागे रेटले आणि मराठे पुढारी झाले. ब्राह्मणांना मागे रेटण्यासाठी मराठ्यांनी इतर मधल्या व मागास जातींना बरोबर घेतले. ब्राह्मण सोडून इतरांची बेरीज केली आणि ब्राह्मण वजा केले. सर्व नाही, परंतु जे मराठे पुढारी झाले, श्रीमंत झाले, ते ब्राह्मणासारखे वागू लागले. आपल्याच पोळीवर तूप वाढून घेऊ लागले. मधल्या व मागास जातींच्या पोळ्या कोरड्याच राहिल्या. खरे म्हणजे पोळ्या सोडा त्यांना भाकरीही मिळाली नाही.

हे मग मधल्या जातीच्या आणि मागास जातीच्या पुढाऱ्यांच्या लक्षात आले. त्यांनी मधल्या व मागास जातींना आवाहन केले. आपल्या वाट्याला सत्ता आली नाही. संपत्ती आली नाही. सारे मराठ्यांनीच पळविले म्हणून त्यांनी ब्राह्मण-मराठे सोडून इतरांना एकत्र केले. ('ब्राह्मण-बनिया ठाकूर चोर, बाकी सब डी.एस.फोर' ही घोषणा आठवावी.) सत्तेत वाटा मागितला. जमेत तेवढा मिळविला. त्यांचे नेते सत्तेत भागीदार झाले. समाज होता तिथेच राहिला. मग हे नेतेच ब्राह्मणासारखे वागू लागले. सत्तेत वाटा मिळावा म्हणून ब्राह्मण्यशाहीशीही दोस्ती करू लागले. (मायावती आणि भाजप यांची दोस्ती, शिवशक्ती व भीमशक्ती यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न इत्यादी.)

### हा क्रम काय शिकवतो?

ब्राह्मण्य हा महाभयानक संसगर्जन्य रोग आहे. या रोगाची उत्पत्ती ब्राह्मण वर्णात झाली. या रोगाचा प्रादुर्भाव ब्राह्मण वर्णात प्रचंड प्रमाणात आहे. तथापि, हा संसर्गजन्य ब्राह्मण्य रोग मराठ्यांतही पसरला आहे. आजूबाजूला पाहिजे, जरा निरखून पाहिले, जरा पडदा बाजूला करून पाहिले, जरा मराठ्यांच्या आतल्या गोटात शिरकाव करून घेऊन पाहिले तर ब्राह्मण्यग्रस्त मराठे सहज दिसतील. पुरोगामी दिसायला उपयोगी म्हणून म. फुले-आंबेडकर यांचे नाव उपयुक्त आहे, ते घेणे जरा सुलभ व्हावे म्हणून, प्रौढ मतदानावर आधारलेल्या लोकशाहीत मते मिळवायला उपयुक्त म्हणून, मधल्या-दलित जातीतील फारसे त्रासदायक ठरणार नाहीत आणि जेवढे देऊ आणि जेव्हा देऊ तेवढ्यावरच्या समाधान मानणाऱ्या चार-दोन नेत्यांना सहभागी करून घेतात; परंतु ती मराठ्यांची सोय आहे म्हणून. कळवळा म्हणून नव्हे, समता म्हणून नव्हे.

हा ब्राह्मण्य रोग मधल्या जातीत आणि दलित जातीतही पसरला आहे. आपल्या जातीतील, आपल्या नात्यातील, आपल्यापेक्षा खालच्या जातीतील लोकांना तुच्छतेने वागवणे, दुय्यम लेखणे, कमी लेखणे, विषमतेने वागणे ही ब्राह्मण्य रोगाची लक्षणे दलितांतील अनेक नेत्यांतही दिसू लागली आहेत.

ब्राह्मणात ब्राह्मण आहेतच. मराठ्यांतही ब्राह्मण आहेत. मधल्या जातीतही ब्राह्मण आहेत. दलितांतही ब्राह्मण आहेत आणि ही नवब्राह्मणांची जमात वाढते आहे.

केवळ जातीच्या आधारे राजकारण केले, इतर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मागासलेपणाचे, हितसंबंधाचे आधार जोडीला घेतले नाहीत तर जातीचे राजकारण समतेकडे न्यायला फारसे उपयुक्त ठरत नाही, असे अनुभव सांगतो. केवळ जातीच्या आधाराने केलेला व्यवहार जाती नाहीशा करायला उपयुक्त ठरत नाही.

जातिउद्धारासाठी जातींना जातीच्या आधारे असंघटित केले गेले तेव्हा ते स्वाभाविक होते. पण जातिउद्धाराचा संघर्ष आणि अंताचा संघर्ष यांची सांगड घातली गेली नाही. काही काळ कुणी कुणी घालण्याचा प्रयत्न केला; परंतु तो टिकाऊ ठरला नाही आणि जातिअंताचा संघर्ष दुबळाच राहिला.

ब्राह्मण असोत नाही तर ब्राह्मणेतर असोत, मराठे असोत, मध्यम जाती असोत नाही तर अगदी दलित जाती असोत. सर्व जातींत वर्ग निर्माण झाले आहेत. होत आहेत. होत राहणार आहेत. निर्माण होत असलेल्या या वर्गाकडे दुर्लक्ष करून केवळ जातीच्या आधारे राजकारण केले तर ते जातिअंताकडे नेण्यास फारसे उपयुक्त ठरत नाही. अगदी दलितांतसुद्धा भांडवलदार वर्ग निर्माण झाला नसेल; परंतु मध्यमवर्ग निश्चित तयार झाला आहे आणि जेव्हा इतर श्रमिकवर्ग समर्थपणे संघटित व संघर्षात नसतो तेव्हा मध्यमवर्ग भांडवली विचार-व्यवहारासच मदत करतो, असा जगाचा इतिहास सांगतो.

अर्थातच दलितांत, मराठ्यांत, मधल्या जातींत निर्माण झालेल्या मध्यम वर्गीयांपैकी काही विभाग बदलत्या वर्गीय वास्तवाचे भान ठेवून व्यवहार करीत आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यांना बळ मिळेल, असाच व्यवहार असायला हवा. जातिअंताचे लढे हे वर्गअंताचे, स्त्री-पुरुष विषमतेच्या अंताचे लढे इत्यादी लढ्यांबरोबरच लढवले पाहिजेत याचे भान या विभागास आहेच. हेच भान योग्य आहे. ते बळकट कसे करावे याचा विचार करूया. अर्थात जात-जाणीव अधिक प्रबळ आहे. वर्ग-जाणीव दुबळी आहे. या दुबळ्या जाणिवा सबळ करायला हव्यात.

अल्प असतील, अत्यल्प असतील, पण स्वत:ची ब्राह्मण्य या रोगापासून सुटका करून घेतलेले, परंतु जन्माने ब्राह्मण असलेले नेते-कार्यकर्ते विभाग पूर्वीही

महाराष्ट्रात होते आणि आजही आहेत. त्यांची साथ न घेता किंवा त्यांना साथ न देता त्यांना टीकेचे लक्ष्य बनविणे ही समतावाद्यांसाठी योग्य रणनीती नाही.

तसेच जन्माने मराठे, दलित किंवा बहुजन असलेले; परंतु ब्राह्मण्य रोगाने पछाडलेल्यांनाच बळ मिळेल अशी मांडणी करणे किंवा व्यवहार करणे हीसुद्धा समतावाद्यांच्या दृष्टीने योग्य रणनीती होत नाही.

म. फुले, राजर्षी शाहू, महर्षी शिंदे, डॉ. आंबेडकर यांच्या काळातही हा रोग होता आणि या महापुरुषांनी त्यासंबंधी स्पष्ट, अस्पष्ट, प्रत्यक्ष नोंदसुद्धा केलेली आहे. या वादाशी संबंधित काही ऐतिहासिक घटनांची नोंद उपयुक्त ठरावी.

राजर्षी शाहू महाराजांचा रोष पत्करून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मराठा जातीसाठी राखीव असलेल्या जागेवरून निवडणूक लढण्यास नकार दिला होता. 'बहुजनातील' अनेक लेखक-विचारवंत कदाचित त्यांच्या या आणि तत्सम विचारांमुळेच कर्मवीर शिंदे यांच्याकडे दुर्लक्ष करीत असावेत. खरे म्हणजे म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर या यादीत कर्मवीर शिंदे यांचे नाव घ्यायलाच हवे. अनेक मंडळी तसे घेत नाहीत. अनवधानाने असो, अनाभ्यासाने असो किंवा जाणीवपूर्वक असो हे चूक आहे. हा कर्मवीर शिंदे यांच्यावर अन्याय आहे.

भास्करराव जाधवांनी ब्राह्मण पुरोहितांऐवजी मराठा पुरोहित निर्माण करण्यास स्पष्ट विरोध करून 'क्षात्र' जगद्‌गुरूला, मराठा जगद्‌गुरूला नमस्कार करायला नकार दिला होता.

डॉ. आंबेडकरांनी जन्माने ब्राह्मण असूनही ब्राह्मण्य सोडलेल्या सत्याग्रहींना महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात सहभागी करून घेतले होते आणि ब्राह्मणेतरांचे तेव्हाचे नेते श्री. केशवराव जेधे यांची ब्राह्मणांना आंदोलनातून वगळण्याची सूचना नामंजूर केली होती.

महात्मा फुल्यांनी आपल्या लिखाणात बहुतेक ठिकाणी ब्राह्मण हा शब्द न योजता सातत्याने 'भटजी' हा शब्द वापरला आणि तो शेटजी-भटजी असा योजूनच वापरला. शेटजी व भटजी हे व्यवसायसूचक शब्द आहेत. ज्यांना 'पोटाशी धरावे' असे त्यांनी सांगितले त्यात ब्राह्मण आहेत. म. फुल्यांच्या रणनीतीत विश्वकुटुंबवाद आहे. जन्माधिष्ठित जातीच्या आधारे वजाबाकी करण्याची रणनीती नाही. बेरजेची रणनीती आहे.

डॉ. आंबेडकरांनी मनमाडच्या १९३८च्या रेल्वे कामगारांच्या सभेत 'ब्राह्मण्यशाही' ही आपली शत्रू आहे असा 'ब्राह्मण' व 'ब्राह्मण्य' यातील फरक करून शब्द वापरला

होता आणि 'ब्राह्मण्यशाही' व 'भांडवलशाही' हे आपले दोन शत्रू आहेत, असे सांगितले होते. ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मणेतर आम्हास नकोत आणि ब्राह्मण्यविरहित ब्राह्मण आम्हास चालतात असे 'बहिष्कृत भारता'च्या अनेक लेखांत त्यांनी लिहिले आहे.

म. फुल्यांचे 'शेटजी-भटजी' आणि आंबेडकरांचे 'ब्राह्मण्यशाही व भांडवलशाही' या दोन्ही संकल्पना एकच समजाव्यात. योगायोगाने ब्राह्मण जातीत जन्मास आलेल्या आणि प्रयत्नपूर्वक ब्राह्मण्य नाकारीत आलेल्या कम्युनिस्ट व सोशालिस्टांनासुद्धा ब्राह्मण म्हणून हिणवण्याचा प्रकार कुठे कुठे अजूनही आढळतो. तो हानिकारक आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीचा इतिहास असे सांगतो की, या वादाने ब्राह्मणांचा किंवा ब्राह्मण्याचा पराभव झाला नाही. ब्राह्मणेतरांत ब्राह्मण्य मात्र पसरले.

१९४८ साली ब्राह्मणांची घरे जाळून ब्राह्मण जमातवादाचा पराभव तर झाला नाहीच, उलट त्यांचे महाराष्ट्रात व नंतर केंद्रात राज्य आले. म. गांधींचे पुतळे पाडून नथुराम गोडसेचे पुतळे उभारा, असे सांगणारे मुजोर जन्मास आले आणि नथुरामचा उदो उदो सुरू झाला हे लक्षात असू द्यावे. एका वरिष्ठ जातीच्या जमातवादाचा पराभव दुसऱ्या वरिष्ठ जातीच्या जमातवादाने होऊ शकत नाही. एका जमातवादाचा पराभव दुसऱ्या जमातवादाने होऊ शकत नाही. हा इतिहासाचा धडा विसरू नये.

'जात' ही रचना समाजात भेद पसरवून फाटाफूट करण्यासाठी अस्तित्वात आली. त्यासाठीच ती टिकविण्यात आली. ती रचना ऐक्यासाठी, एकजुटीसाठी उपयुक्त ठरू शकत नाही. जेव्हा एका जातीतील सर्वांचे हितसंबंध समान होते तेव्हाची गोष्ट वेगळी होती. आता या प्रत्येक जातीत वेगवेगळे आणि परस्परविरोधी हितसंबंध तयार झाले आहेत. होत आहेत. हे वाढणार आहेत. प्रत्येक जातीत वर्ग तयार होत आहेत. अशा स्थितीत केवळ जातीवर आधारित राजकारण उपयुक्त ठरणार नाही. या राजकारणाचा उपयोग प्रस्थापित करून घेतील.

000

आपल्या देशात नवी अवस्था आली आहे. नवी राजकीय अवस्था आहे. ही नवी राजकीय अवस्था नव्या सामाजिक अवस्थेला बळ देत आहे. जुन्या शोषक सामाजिक अवस्थेलाही बळ देत आहे. देश स्वतंत्र झाला आहे. दीडशे वर्षे चिवट संघर्ष करून जुना वसाहतवाद आपण संपवला आहे. परंतु जागतिकीकरण असे फसवे नाव धारण करून नवा वसाहतवाद आला आहे. या नव्या अवस्थेत सत्यशोधकांना नवी रणनीती ठरवून कार्य करायचे आहे. नवे साहित्य निर्माण करायचे आहे. हे एक आव्हान आपणासमोर आहे. हे आव्हान आपण कसे पेलू शकू हा मुख्य

मुद्दा आहे. तो पेलण्यासाठी उपयुक्त ठरेल असा विचारविनिमय या परिषदेत होईल अशी अपेक्षा करतो.

नवी भेसळ भाषा अवतरते आहे. ही नववसाहतवादी जागतिकीकरणाची देणगी आहे. नवी संस्कृती अवतरते आहे. सावित्रीबाई फुल्यांच्या या प्रदेशात स्त्रीचे सौंदर्य आणि भावणारे व लुभावणारे हावभाव बाजारी वस्तू बनत आहे. स्त्रीच बाजारी वस्तू बनते आहे. याचा मुकाबला आपण कसा करणार हा प्रश्न आहे.

नवी बाजारी शिक्षण-संस्कृती आली आहे. ज्याच्याकडे द्रव्यबळ असेल त्याने शिकावे. इतरांनी निरक्षर राहून किंवा वरिष्ठांची सेवा करण्याइतपत जुजबी शिक्षण घेऊन सेवा करीत राहावे, असा विचार प्रभावी ठरला आहे. तसाच व्यवहार होतो आहे. शिक्षण ही बाजारी वस्तू बनली आहे. रयतेचे भाऊराव पाटील, मराठा विद्या प्रसारक संस्थांचे चालक, बार्शीचे मामा जगदाळे, पंजाबराव देशमुख आणि असे कित्येक यांची 'रयतेला' आणि 'खेडूतांना' शिकवण्याची परंपरा संपुष्टात येते आहे. नवी 'विना अनुदान' शिक्षण संस्कृती आली आहे. शिक्षण हा धंदा झाला आहे. कमी भांडवली, नव्हे बिनभांडवली आणि जास्त नफा देणारा धंदा झाला आहे. 'शिक्षणमहर्षी' मागे पडताहेत आणि 'शिक्षणसम्राट' उदयास आले आहेत. याचा सामना बहुजन कसा करणार असा हा आजचा प्रश्न आहे.

एका बाजूला अमाप संपत्तीचे साठे आणि त्या आधारे चंगळवाद बोकाळतो आहे आणि दुसऱ्या बाजूस कुपोषणाने आणि उपोषणाने मृत्यू वाढत आहेत. विषमता सर्व बाजूंनी वाढते आहे. हे कसे रोखणार हे बहुजनांसमोरील आव्हान आहे.

शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्यासाठी नवा 'शेतकऱ्यांचा आसूड' आपण कसा तयार करणार हा आपल्यापुढील प्रश्न आहे.

ही आणि तत्सम इतर आव्हाने पेलण्यास योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन, योग्य आशय आणि योग्य रणनीती तयार करण्याच्या कार्यात हे अधिवेशन भरीव कामगिरी करील, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि जालन्यातील या दुसऱ्या सत्यशोधकी साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन झाले असे जाहीर करतो.

*(दुसरे सत्यशोधक साहित्य संमेलन, जालना, २५-२६ डिसेंबर २००४, येथे उद्‌घाटक या नात्याने केलेले भाषण)*

# जातिअंत की जातिउद्धार?

हिंदू धर्मातील वर्ण-जातिव्यवस्थेचा पायाच मुळी विषमता आहे.

"कुणी जन्मत:च उच्च असतो, कुणी जन्मत:च नीच असतो. ही उच्च-नीचता स्वाभाविक आहे, अपरिहार्य आहे आणि उपयुक्तही आहे" असा काहीसा हा सिद्धान्त आहे.

हा सिद्धान्त अर्थातच जे स्वत:ला उच्च समजतात त्यांनीच मांडला. त्यांना उच्च-नीचता टिकावी, असे वाटणे स्वाभाविक आहे. कारण ते त्यांच्या हिताचे आहे. वर्ण-जातिव्यवस्थेचे समर्थन ते करीत आले आहेत आणि भाषा, रूप, छुपेपणा इत्यादी काही फरक असला तरी हे समर्थन ते आजही करीत आहेत, हे सारे समजण्यासारखे आहे.

परंतु ज्यांना या उच्च-नीचतेच्या, विषमतेच्या वर्ण-जातिव्यवस्थेचा जाच हजारो वर्षे भोगावा लागला आणि आजही भोगावा लागत आहे, त्यांचे काय? त्यांनी ही उच्च-नीचता संपविण्याच्या मार्गाने जाण्याऐवजी ती टिकवण्याच्या मार्गाने जाणे सुरू केले तर त्यांचे काय करावे? त्यांचे हे असे करणे जाणतेपणाने केलेले असो की अजाणतेपणाने केलेले असो, ते अधिक चिंताग्रस्त करते.

मनुवाद तीन टक्क्यांनी स्वीकारला तर ते समजू शकते; परंतु बाकीच्यांनीही अनवधानाने, चुकीच्या रणनीतीने मनुवादास बळकटी मिळेल, असा व्यवहार केला तर त्यास काय करावे? ब्राह्मणांनी क्षत्रियांना, वैश्यांना, शूद्रातिशूद्रांना नीच लेखणे हा तर नक्कीच मनुवाद आहे; परंतु क्षत्रियांनी शूद्रातिशूद्रांना नीच लेखले तर तोसुद्धा मनुवादच नव्हे काय? शूद्रांनी अतिशूद्रांना नीच लेखले तर तो मनुवाद नव्हे काय?

ब्राह्मणांनी ब्राह्मणेतर जातींना नीच लेखणे हा तर मनुवादच आहे; परंतु मराठ्यांनी मराठेतरांना नीच लेखले तर त्यास काय म्हणावे? महारांनी मांगांना नीच

लेखले किंवा चांभारांनी ढोरांना नीच लेखले तर त्यास काय म्हणणार?

मी स्वत: गुलाम राहणार नाही आणि कुणाला गुलाम करणार नाही, अशी भूमिका घेतल्याशिवाय गुलामी नाहीशी कशी होणार?

वर्ण-जातिव्यवस्था टिकवायला अनेक युक्त्या-प्रयुक्त्या वापरण्यात आल्या आहेत. ब्राह्मणेतर सर्व वर्णांना व जातींना ज्याप्रमाणे 'एक वरची जात' आहे त्याप्रमाणे 'खालच्याही जाती' आहेत. ब्राह्मण मला नीच समजत असतील, तर ते असूद्या; पण शूद्रातिशूद्र माझ्यापेक्षाही नीच आहेत, ही भावना म्हणजे काय? एका बाजूने नीचतेची भावना निर्माण करण्यात आली त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूने उच्चतेची भावना तयार करण्यात आली. उतरंडच तयार केली आणि त्यामुळे उतरंडच्या उतरंड टिकायला सोपे गेले.

*वरच्या लत्ता झेलीत माथा । सवेच खाली झाडीत लाथा ।*
*न ती आवरी, न ही सावरी । गोंधळ केला छान !!*

उच्च-नीचतावाद्यांची, विषमतावाद्यांची, मनुवाद्यांची ही रणनीती लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी परिणामकारक रणनीती तयार केल्याखेरीज मनुवादाचा पराभव होणार नाही.

"मी स्वत: नीच नाही आणि मी कुणाला नीच मानीत नाही. सर्व मानव समान आहेत," अशी भूमिका घेऊन त्या भूमिकेवर आधारलेली रणनीती आखली पाहिजे. तरच समता प्रस्थापित होऊ शकेल. मी स्वत: शोषणमुक्त होईन आणि इतर सर्वांनाही शोषणमुक्त करीन, अशी भूमिका असावी. शोषण करू देणार नाही आणि शोषण करणार नाही, अशी प्रतिज्ञा हवी. सर्व शोषणग्रस्तांना एकजुटीत आणण्याची रणनीती हवी. माझे शोषण तेवढे सर्वांत वाईट. ते अगोदर नाहीसे व्हायला हवे. इतरांच्या शोषणांचे नंतर पाहता येईल. माझे शोषण नाहीसे करायला इतरांनी मदत केली पाहिजे. तो माझा हक्क आहे; परंतु त्या इतरांचे शोषण नाहीसे करायला मात्र मी मदत करणार नाही, अशी भूमिका उपयोगी ठरत नाही. आर्थिक विषमतेविरुद्ध मी लढेन; परंतु सामाजिक विषमतेविरुद्ध मी लढणार नाही. ज्यांना हवे त्यांनी लढावे किंवा सामाजिक विषमतेविरुद्ध मी लढेन; परंतु आर्थिक विषमतेविरुद्ध मी लढणार नाही, ही रणनीती योग्य नव्हे. आम्ही स्त्री-पुरुष विषमतेविरुद्ध लढणार नाही ही रणनीती योग्य नव्हे. आर्थिक, सामाजिक, स्त्री-पुरुष विषमता या सर्व विषमतांविरुद्ध एकत्र संघर्ष करण्याची रणनीती हवी. एक विषमता दुसऱ्या विषमतेला पोषक असते.

ooo

वर्ण-जतिव्यवस्था कशी व केव्हा निर्माण झाली यासंबंधी अभ्यासकांत वेगवेगळी मते आहेत. तथापि ही व्यवस्था कशामुळे टिकून राहिली याबाबत मतभिन्नता कमी आहे.

ही व्यवस्था परमेश्वराने निर्माण केली आहे. परमेश्वराने निर्माण केलेल्या धर्माने केली आहे, असे सांगून, प्रचारून, पटवून ह्या व्यवस्थेला मान्यता मिळवून देण्यात आली, भरभक्कम आधार मिळवून देण्यात आला. त्या त्या काळातील सर्व प्रसारमाध्यमे वापरण्यात आली. ग्रंथ रचले. कथा निर्माण केल्या. पुराणे लिहिली. नव्या नव्या श्रुती-स्मृती रचल्या. कीर्तने, प्रवचने, गाणी, अभंग, आरत्या इत्यादी जी जी म्हणून साधने व प्रकार उपलब्ध होते ते ते सर्व वापरले. असा एक माहोल तयार केला आणि चालू ठेवला की ज्यांना या वर्ण-जातिव्यवस्थेचा अमानुष जाच भोगावा लागत होता त्यांनासुद्धा ही व्यवस्था बरोबर आहे, असे वाटू लागले. गुलामांना आपली गुलामी बरोबरच आहे, असे वाटू लागले. देव, दैव, पूर्वजन्म, पुनर्जन्म, पाप-पुण्य या कल्पना समाजाच्या हाडींमासी रुजवल्या. 'आलीया भोगासी असावे सादर' किंवा 'ठेविले अनंते तैसेची रहावे, चित्ती असू द्यावे समाधान' किंवा असाच काही समज समाजात सर्वदूर पसरविला, रुजविला. अगदी नसानसात भिनवला.

गुलामांनाच गुलामी योग्य वाटू लागली. त्यामुळे गुलामांना गुलाम करण्याऱ्यांचे काम एकदमच सोपे झाले.

पण एवढेच केले नाही. देव, धर्म यांच्या ठेकेदारांनी हे एवढे केले, तर राजसत्तेने या धर्ममार्तंडांनी तयार केलेले कायदे तलवारीच्या जोरावर अमलात आणले. आजच्या कोणत्याही कायद्यापेक्षा तेव्हाचे उच्च-नीचता जोपासणारे कायदे कित्येक पटीने जास्त क्रूर होते. ते कायदे मांडणाऱ्यांना ठोठावण्यात येणाऱ्या शिक्षा महाभयानक होत्या.

एका उच्चवर्णीय धर्मसत्तेने कायदे केले. दुसऱ्या उच्चवर्णीय राजसत्तेने तलवारीच्या जोरावर या कायद्यांची अंमलबजावणी क्रूर, कठोरपणाने केली.

रामायणात शंबुकाची कथा आहे.

आदिवासी अतिशूद्र शंबुकाने तप केले म्हणून ब्राह्मणाचा अल्पवयीन मुलगा निधन पावला. शंबुकाने तप करणे, हा धर्माचा अधिक्षेप होता. धर्माज्ञेचा भंग होता. उच्चवर्णीय धर्मसत्तेने ब्राह्मणांनी प्रतिपादलेल्या धर्माविरुद्ध हे कृत्य होते. त्याला कठोर शिक्षा होती. या धर्माज्ञेचा भंग करणाऱ्या शूद्राचा शिरच्छेद करण्यात आला.

शिरच्छेद करण्याचे काम उच्चवर्णीय क्षत्रिय रामाने केले. ब्राह्मणांची धर्मसत्ता व क्षत्रियांची राजसत्ता यांनी मिळून शूद्रांना अशी अद्दल घडविली की, इतर कुणी धजावूच नये असे केले. धर्माचे कायदे करणारे ब्राह्मण आणि त्यांची अंमलबजावणी करणारे क्षत्रिय या दोघांनी मिळून शूद्रांत दहशत निर्माण केली होती.

ब्राह्मणांना शिव्या-शाप देणाऱ्या उच्चवर्णीय क्षत्रियांना या कथेचे सार लक्षात घ्यावे. तसे लक्षात घेणे त्यांना गैरसोयीचे आहे. शूद्रातिशूद्रांनी मात्र या कथेचे सार नीट लक्षात घ्यावे. धर्मसत्ता व राजसत्ता या दोन्ही सत्तांनी मिळून शूद्रातिशूद्रांची गुलामी निर्माण केली व टिकवली. आजही धर्मसत्ता, राजसत्ता व प्रसारमाध्यम सत्ता हातात हात घालून आजच्या शोषित शूद्रातिशूद्रांवर गुलामी लादत आहेत. गुलामीचा प्रकार वेगळा असेल, बाह्य रूप वेगळे असेल; पण मूळ गुलामीचा गाभा तोच आहे.

याविरुद्धच्या संग्रामासाठी योग्य रणनीती तयार करण्याचा प्रश्न आहे. ब्राह्मण्याविरुद्धचा संघर्ष उच्चवर्णीय क्षत्रियांचा अभिमान बाळगणाऱ्यांना बरोबर घेऊन यशस्वी होईल काय, असा प्रश्न आहे.

ब्राह्मण वर्णाने उरलेल्या तीन वर्णांत जन्मास आलेल्यांना नीच मानणे हे जसे 'ब्राह्मण' आहे, तसे क्षत्रियांनी शूद्रातिशूद्रांना नीच मानणे हेसुद्धा 'ब्राह्मण'च आहे. शूद्रांनी अतिशूद्रांना नीच मानणे हेसुद्धा 'ब्राह्मण'च आहे. शूद्र व अतिशूद्रातील एका जातीने दुसऱ्या जातीला नीच समजणे हेसुद्धा 'ब्राह्मण'च आहे.

'ब्राह्मण' हा संसर्गजन्य महारोग आहे. या रोगाचा उगम जन्माने ब्राह्मण असलेल्या वर्णात झाला आणि आजही सर्वांत जास्त 'ब्राह्मण्यग्रस्त' रोगी जन्माने ब्राह्मण असलेल्यांतच आहेत; पण हा रोग मराठ्यांत पसरला आहे. कमी प्रमाणात असेल; परंतु तो आता शूद्रातिशूद्र जातींतही पसरत आहे. हे 'ब्राह्मण्यग्रस्त' बहुजनांचे मित्र असतील काय, याचा विचार व्हायला हवा. दुसऱ्याच्या 'ब्राह्मण्या'वर टीका करणारा जर स्वत: 'ब्राह्मण्यग्रस्त' असेल तर तो ब्राह्मण्याविरुद्धचा संघर्ष शेवटपर्यंत लढेल काय याचा विचार व्हावा.

रणनीती तयार करताना शत्रू कोण, हे निश्चित करणे अत्यावश्यक आहे. जातीने ब्राह्मण असणाऱ्यांना शिवीगाळ करून स्वत:चे 'ब्राह्मण' लपविणाऱ्यांना समतेच्या संघर्षात काय स्थान असावे याचा विचार व्हावा.

अत्यल्प असतील, अपवाद असतील, शंभर टक्के ब्राह्मण्य अजून सोडले नसेल किंवा सुटले नसेल; परंतु जे समतावादी असतील, ते केवळ जन्माने ब्राह्मण आहेत म्हणून ते शत्रू आहेत, अशी कुणाची भूमिका असेल, तर ती तपासून घ्यायला हवी.

फुले, शाहू, आंबडेकर या महामानवांना बहुजन समाज समता संघर्षात दैवते मानतो. या सर्व महामानवांच्या समता संघर्षात जन्माने ब्राह्मण असलेले काही जण सहभागी होते, हे ऐतिहासिक सत्य लक्षात ठेवावे.

जन्माने ब्राह्मण आहेत म्हणून त्यांना चवदार तळ्याच्या समता संघर्षात सहभागी करून घेऊ नका, अशी सूचना करणाऱ्या ब्राह्मणेतर पक्षांची ही सूचना डॉ. आंबेडकरांनी नाकारली होती. डॉ. आंबेडकरांनी ज्यांचे गुरुपद गौरवाने मिरवले त्या म. फुल्यांनी 'खिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणांशी धरावे पोटाशी बंधुपरी ।। असे सांगितले आहे. त्यांनी बंधुपरी पोटाशी धरावे अशांच्या केलेल्या यादीत 'ब्राह्मणां'चाही समावेश केला आहे. शेठजी-भटजीविरोधी संघर्षाची मांडणी करतानाच त्यांनी हे केले आहे, हे लक्षात असू द्यावे. उदाहरणे अनेक आहेत.

000

विषमता नष्ट करण्यासाठी काय उपाय योजावेत, यासंबंधीचे विचारमंथन असंख्य समतावाद्यांनी केले आहे.

विषमतेचे भोग भोगावे लागल्यामुळे जे मागासलेले राहिले त्यांना पुढे आणण्यासाठी खास सोयी-सवलती द्याव्यात, हा एक उपाय काही प्रमाणात मान्यताप्राप्त झाला आहे. विषमताग्रस्त समाजात समता प्रस्थापित करायची असेल तर समाजाने सर्वांना सारखे वागवून चालणार नाही. सर्व समान आहेत, असे मानून त्यांच्याशी समान व्यवहार करता येणार नाही. असे केल्याने मुळात असलेली विषमता टिकेल हे तर नक्कीच; परंतु वाढेलसुद्धा. म्हणून मागासलेल्यांच्या खास सोयी-सवलती हव्यातच.

१९०२ साली राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील नोकऱ्यांत ५० टक्के राखीव जागा ठेवल्या. मागासांना पुढे आणण्यासाठी खास सोयी केल्या. भारतीय राज्य घटनेने काही मूलभूत तत्त्वे मान्य केली. शासनाने सर्वांना सारखे वागवावे या तत्त्वाला योग्य असे अपवाद मान्य केले. मागासांना नोकऱ्यांत, शिक्षणात, व्यवसायात खास सोयी सवलती दिल्या पाहिजेत, असे प्रतिपादन केले. त्याचा निश्चित उपयोग झाला. कमी प्रमाणात असेल, सर्व क्षेत्रांतील नसेल; परंतु मागासलेल्यांपैकी काही जणांचे मागासलेपण काही क्षेत्रांत थोडे कमी झाले. हे चांगलेच झाले.

परंतु याचा दुसरा एक परिणाम झाला. आपण मागासलेले आहोत असे सांगण्यात, पटविण्यात एक हितसंबंध तयार झाला.

आपली मागासलेली जात सोडण्याऐवजी तिला चिटकून राहण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. या सवलती टिकाव्यात; वाढाव्यात म्हणून जातवार संघटना उभ्या राहिल्या आणि जात-जाणीव कमी होण्याऐवजी वाढली. जातिउद्धाराचे कार्य करता करता जातिअंताच्या कार्यास हानी पोहोचली. याचे काय करावे, असा प्रश्न आहे.

भारतीय राज्य घटनेने लोकशाही स्वीकारली. मतदानात समानता आणली. 'एक माणूस एक मत', सर्वांच्या मताला सारखी किंमत अशी व्यवस्था केली, हे योग्यच केले. जगातील लोकशाहीचे आद्य पीठ म्हणून मिरविणाऱ्या देशांत प्रत्येक प्रौढाला, प्रत्येक स्त्री-पुरुषाला मताचा अधिकार द्यायला शेकडो वर्षे लागली. आपल्या देशात सर्वांना मताचा अधिकार एकदमच मिळाला. चांगलेच झाले.

पण त्यातूनच एक अंतर्विरोध निर्माण झाला. राजकीय क्षेत्रात मतांपुरती का असेना समता आली; परंतु सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत विषमता तशीच राहिली. हा अंतर्विरोध पन्नास वर्षे संपून वर दोन-तीन वर्षे झाली तरी संपला नाही. अंतर्विरोध चालू राहिला. वाढलासुद्धा.

नव्या जाणिवा तयार झाल्या नाहीत. खऱ्या लोकशाहीच्या जाणिवा तयार झाल्या नाहीत. लोकशाही व्यवस्था आली; परंतु लोकशाही-जाणिवा आल्या नाहीत. जुन्या जाणिवा तशाच राहिल्या. धर्मजाणीव, वर्णजाणीव, जातजाणीव या सर्व जाणिवा तशाच राहिल्या. व्यवस्था प्रगत आणि जाणिवा अप्रगत असा तिढा तयार झाला.

ज्यांना कसेही करून समाजात आपले वर्चस्व टिकवायचे होते व आहे त्यांना जुन्या जाणिवा उपयोगाच्या आहेत. धर्मजाणीव, वर्णजाणीव, जातजाणीव टिकणे त्यांना उपयोगाचे आहे. त्यांनी या जाणिवांना खतपाणी घातले. धर्माच्या संघटना, जातीच्या संघटना यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. 'व्होट बँका' तयार केल्या. या व्होट बँका विकत घेता येतात आणि गुंडगिरीच्या जोरावर, दहशतीच्या जोरावर या बँका ताब्यात ठेवता येतात.

ज्यांच्या जुन्या सत्ता गेल्या त्यांना नव्या लोकशाही व्यवस्थेत सत्ता मिळवायला हे सोयीचे आहे. उपयुक्त आहे.

पण ज्यांना पूर्वी सत्ता नव्हती; परंतु लोकशाही व्यवस्थेत सत्ता मिळण्याची शक्यता होती त्यांचे काय? त्यांना जुन्या, अप्रगत, विषमता टिकविणाऱ्या, वाढविणाऱ्या जाणिवा उपयुक्त आहेत काय? धर्मजाणिवा, जातजाणिवा पूर्वापार जे सत्ताहीन आहेत त्यांना सत्ता देतील काय? सत्ता दिली काय?

कुणाकुणाला म्हणजे काही दहा-पाच व्यक्तींना सत्तेत 'दुय्यम वाटा' मिळाला. समाजाला सत्ता मिळाली नाही. मागासलेल्यांच्या जातजाणिवांचा फायदा पुढारलेल्यांनी घेतला. मागासलेले दुभंगलेलेच राहिले. केवळ जातजाणीव ही सर्व मागासलेल्यांनासुद्धा एकच ठेवू शकत नाही, शकली नाही, असाच अनुभवाचा धडा आहे.

जातिउद्धारापुरता संघर्ष मर्यादित ठेवला, तर जातींचाही उद्धार होत नाही. जातीतल्या पाच-दहा जणांचा उद्धार होतो. त्यांना जातजाणिवेचा लाभ होतो. जात तशीच मागासलेली राहते.

'शेठजी-भटजी' यांच्याविरुद्ध 'शूद्र-अतिशूद्र आणि स्त्रिया' यांच्याकरिता आणि 'शेतकऱ्यांच्या आसूड' मधील शेतकऱ्यांकरिता एकच संघर्ष उभा करण्याची रणनीती जातिअंतास अधिक उपयुक्त ठरू शकेल.

उच्च वर्गांविरुद्ध, उच्च वर्णांविरुद्ध आणि स्त्री-पुरुष विषमतेविरुद्ध असा एकत्रित संघर्ष उभा केला पाहिजे, असा संघर्ष उभा करण्याऐवजी रणनीती तयार केली पाहिजे.

जातिउद्धारासाठी योग्य असलेले संघर्ष, जातिअंताच्या संघर्षात अडसर बनणार नाहीत, अशी रणनीती तयार केली पाहिजे.

कामगार संघटनांचे संघर्षसुद्धा 'वर्गउद्धाराच्या' संघर्षापुरते मर्यादित झाले आहेत. ते संघर्षसुद्धा वर्गअंताचे संघर्ष बनतील, अशी रणनीती तयार केली पाहिजे.

# शत्रू कोण? ब्राह्मण की ब्राह्मण्य?

कार्ल मार्क्स म्हणाला होता, "तत्त्ववेत्त्यांनी आपापल्यापरीने जगाचा अर्थ सांगितलाच आहे, मुद्दा आहे तो जग बदलण्याचा." धम्माचा हेतू सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "धम्माचा हेतू जगाची पुनर्रचना करणे, हा आहे."

म. फुले, म. गांधी इत्यादी अनेक महात्म्यांची या अर्थाची अनेक वचने सांगता येतील. सर्व महामानवांच्या विचारांचा आणि व्यवहाराचा हेतू जग बदलणे हाच होता. कॉम्रेड अण्णा भाऊ साठे गाऊन गेले,

*जग बदल घालुनी घाव!*
*मला सांगून गेले भीमराव!!*
*मला सांगून गेले जोतीराव!!!*

आहे ते जग बदलून नवे जग आणायचे, तर जुने जग उद्ध्वस्त करावेच लागते. 'घाव' घातल्याखेरीज जुने जग उद्ध्वस्त होत नसते.

पण घाव घालायचे म्हणजे नेमके काय करायचे, कशाकशावर घाव घालायचे, हे निश्चित केले पाहिजे. नाही तर नको तिथे घाव पडतील आणि घाव घालण्यासाठी वापरलेली शक्ती फुकट वाया जाईल.

जुने आणि टाकाऊ जग तसे असतानासुद्धा टिकून कसे राहते? जुन्या जगाचे टिकून राहण्याचे मर्म कोणते? नुसत्या बळाच्या आणि दंडशक्तीच्या आधारावर कोणतीच समाजरचना दीर्घकाळ टिकून राहत नाही. बळाचा आणि दंडशक्तीचा वापर असतोच; पण त्याच्या जोडीला आणि त्याहून शक्तिमान असे एक हत्यार असते आपली विचारसरणी. ती जुन्या टाकाऊ जगाने विकसित केलेली असते. एक

तत्त्वज्ञान तयार केलेले असते. हे तत्त्वज्ञान समाजमानसात रुजवलेले असते. या टाकाऊ जगाचे समर्थन करणारी एक जाणीव समाजात निर्माण केलेली असते. हे तत्त्वज्ञान आणि त्याआधारे तयार केलेली जाणीव, ही हत्यारे असतात आणि ही हत्यारे बळापेक्षा आणि दंडशक्तीपेक्षाही अधिक सामर्थ्यवान असतात.

जुन्या टाकाऊ जगात ज्यांच्यावर अन्याय होतो, ज्यांच्यावर जुलूम-जबरदस्ती होते, ज्यांना गुलाम केलेले असते, ज्यांचे शोषण केले जाते, त्यांनासुद्धा ही जुलूम-जबरदस्ती आणि हे शोषण बरोबरच आहे, असे वाटेल, अशी जाणीव त्यांच्यातसुद्धा रुजवली जाते आणि त्यामुळेच दीर्घ काळ शोषण चालू राहते.

विश्वातला कोणताही बदल संघर्षाखेरीज होत नाही. आपसूक काहीच बदलत नाही. मानवी समाजात होणारा बदलही संघर्षाखेरीज होऊ शकत नाही. क्रांती संघर्षाविना होत नाही. उत्तम रीतीने शब्दबद्ध केलेले डॉ. आंबेडकरांचे सूत्र आहे, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'. यातले 'संघर्ष करा' हे सर्वात महत्त्वाचे. 'संघर्ष करण्यासाठी संघटित झाल्याखेरीज संघर्ष करता येणार नाही. केलात तर तो यशस्वी होणार नाही.

संघटित होण्यासाठी 'शिका'. शिकल्याखेरीज तुम्ही योग्य प्रकारे संघटित होऊ शकणार नाही. कुणाकुणाचे संघटन करायचे आणि कुणाविरुद्ध संघर्ष करायचा, हे समजणार नाही.

बदल हा जसा विश्वाचा नियम आहे, तसाच संघर्षाखेरीज बदल होत नसतो, हासुद्धा विश्वाचा नियमच आहे. बदलासाठी तत्त्वज्ञान असावे लागते, हासुद्धा नियमच आहे. तत्त्वज्ञानाखेरीज क्रांती होऊच शकत नाही. बदल होऊच शकत नाही. समाज बदलायचा तर त्यासाठी तत्त्वज्ञान असावेच लागते. कोणतेही तत्त्वज्ञान न स्वीकारता जे कुणी जग बदलायचे म्हणतात, ते एक तर मतलबी असतात किंवा भाबडे असतात, भोंदू असतात किंवा भोळे असतात. तत्त्वज्ञान नको असे जे म्हणतात, त्यांचे हे म्हणणे हेच त्यांचे तत्त्वज्ञान असते. ते प्रस्थापितांचे तत्त्वज्ञान असते. जग न बदलण्याचे तत्त्वज्ञान असते. समाज न बदलण्याचे तत्त्वज्ञान असते. समाजबदलाला, परिवर्तनाला, क्रांतीला विरोध करणाऱ्यांचे एक तत्त्वज्ञान तर असतेच असते; परंतु 'तत्त्वज्ञान नको' असे सांगणाऱ्यांचे तत्त्वज्ञान अधिक धोकादायक असते.

समाज आहे तसा राहू द्या. त्यात मोडतोड करू नका. नवा समाज आणू नका. आहे त्यात काही दोष आले असतील, तर तेवढे दोष फार तर दूर करा. चौकट

मोडू नका. चौकट उद्ध्वस्त करू नका. इमारत मोडू नका, पाडू नका. फार तर डागडुजी करा, रंगसफेदी करा, ते तत्त्वज्ञान म्हणजे 'जैसे थे वादी' तत्त्वज्ञान असते.

बदल, परिवर्तन आणि क्रांती यासाठी करावयाच्या संघर्षासाठी योग्य रणनीती असावी लागते. योग्य रणनीती नसेल तर यश मिळणार नाही. संघर्षामध्ये संघटना, तत्त्वज्ञान यांच्याइतकेच रणनीतीचे महत्त्व आहे. योग्य रणनीतीअभावी, योग्य डावपेचाअभावी अनेक संघर्ष अयशस्वी झाल्याचे दाखले इतिहासात सर्वत्र विखुरले आहेत.

रणनीती स्थलकालसापेक्ष असते. आपण केव्हा संघर्ष करतो आहोत आणि कुठे संघर्ष करीत आहोत, याचे योग्य भान देऊन रणनीती निश्चित करावी लागते. रणनीती हेतुसापेक्ष असते. कशासाठी संघर्ष करीत आहोत, हे लक्षात ठेवूनच रणनीती निश्चित करावी लागते. शत्रू कोण आणि मित्र कोण हे ठरवावे लागते. शत्रूंमध्ये आपसात काही मत-मतांतरे असतील, त्यांच्या आपापसातील हितसंबंधांत काही फरक असेल तर तो हेरून त्याचा लाभ कसा मिळू शकेल, हे विचारात घेऊन रणनीती ठरवावी लागते. मित्र कोण हे ठरवावे लागते. कच्चा मित्र कोण, पक्का मित्र कोण, डळमळीत मित्र कोण, त्रयस्थ-तटस्थ कोण, या साऱ्यांचे भान ठेवावे लागते.

विशिष्ट काळी, विशिष्ट ठिकाणी जास्तीतजास्त किती बदल करता येतील व पुढच्या टप्प्याच्या बदलाची तयारी कशी करता येईल, अशा टप्प्याटप्प्यांचाही विचार करावा लागतो. खूप गुंतागुंत असते. रणनीती निश्चित करण्याचे काम सोपे नसतेच मुळी; पण योग्य रणनीतीखेरीज संघर्ष यशस्वी होऊ शकत नसल्याने हे सारे भान ठेवून रणनीती आखावीच लागते. ठोकळेबाजपणाही उपयुक्त नसतो. भोंगळपणाही चालत नाही आणि संधिसाधूपणाही हानिकारक असतो. बहुजनांचे आजवरचे अनेक संघर्ष यशस्वी न व्हायला अनेक कारणे आहेत. वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी कारणे महत्त्वाची ठरली आहेत. तथापि, सर्व वेळा आणि सर्व ठिकाणी संघर्षाच्या अपयशाला जे एक महत्त्वाचे कारण ठरत आले आहे, ते म्हणजे रणनीती चुकली. शत्रू निश्चित करण्यात चुका झाल्या. मित्र निश्चित करण्यात चुका झाल्या. सर्व मित्रांना एकत्रित करण्यात अपयश आले. अनेकदा मित्रांना शत्रू समजले गेले. शत्रूवर हल्लाबोल करण्याऐवजी अनेकदा मित्रांवरच हल्ला चढवला गेला आणि परिणामी संघर्ष अयशस्वी झाले.

बहुजनांचे दुश्मन कोण, मित्र कोण, पक्के मित्र, डळमळीत मित्र कोण यांचा विचार वरचेवर व्हायला हवा. शत्रू बदलतात, बदलू शकतात. मित्र बदलतात, बदलू शकतात. मग हेतू तोच असूनसुद्धा रणनीती बदलावी लागते.

बहुजन म्हणजे नेमके कोण, हेसुद्धा नीट ठरवायला हवे. म फुले यांनी 'शूद्रातिशूद्र आणि स्त्रिया' हे मुख्यत: शोषित आहेत, असे वारंवार म्हटले आहे. 'शेतकऱ्यांचा आसूड'मधील त्यांची मांडणी शेतकरी शोषित आहेत, अशी आहे. म. फुले यांचे सहकारी नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार हे शोषित आहेत म्हणून त्यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. जवळकरांनी कामगारांच्या शोषणाची भूमिका मांडली. याचा एकत्र विचार केला तर 'शूद्र अति शूद्र, शेतकरी, कामगार' हे जनविभाग बहुजन ठरतात. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी तर 'बहुजन पक्ष'च स्थापन केला होता. त्यांनी 'बहुजन पक्षाचा जाहीरनामा' प्रसिद्ध केला होता. त्यांची मांडणी हितसंबंधाच्या आधारावर आहे. समान हितसंबंधाचे सर्व जाती-धर्म-पंथाचे शोषित व दुर्बल यांचा त्यांनी बहुजनांत समावेश केला होता. त्यांचा मूळ जाहीरनामा या संदर्भात अभ्यासायलाच हवा.

डॉ. आंबडकरांची बहुजनांची कल्पना केवळ जातिवाचक नव्हती. कॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पक्षाच्या नावावरून त्यांची ही कल्पना स्पष्ट होते. स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्यूल कास्ट फेडरेशन व शेवटी मांडलेली रिपब्लिकन पक्षाची संकल्पना हे ते राजकीय पक्ष. सर्व जाती-धर्म-पंथाच्या मागास जातींना सोयी-सवलती मिळवणे सुलभ व्हावे म्हणून त्यांनी विशिष्ट परिस्थितीत 'शेड्यूल कास्ट फेडरेशन' हा पक्ष स्थापला. त्यात 'जात' दिसते. तथापि, 'स्वतंत्र मजूर पक्ष' आणि शेवटचा 'रिपब्लिकन पक्ष' यांची रचना जातीवर आधारलेली नाही. त्यांच्या पक्षाच्या नावावरूनच पक्ष कुणाकुणाचा हे स्पष्ट होते. वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी नावे घेऊन वेगवेगळ्या जनसमूहांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. रणनीती बदलती ठेवली. केवळ जातीवर आधारून बहुजनांची व्याप्ती निश्चित करणे यथायोग्य नव्हे. सर्व मागास जाती जात म्हणून शोषित आहेत, हे स्पष्टच आहे. अलीकडे काही मागास जातींत अल्पप्रमाणात 'क्रिमी लेअर' (त्यातल्या त्यात वरचा थर) निर्माण झाला असला, तरी जात हा एक घटक समजला तर या जातीच्या जाती शोषित आहेत हे उघड आहे. तथापि, मागास म्हणून ज्या समजल्या जात नाहीत, अशा जातींतही शोषित आहेत. त्यांचाही समावेश 'बहुजनात' करून रणनीती आखली पाहिजे. सर्व शोषितांचा समावेश बहुजनात करायला हवा. रणनीती त्यावर आधारलेली हवी.

कुणाकुणाचा बहुजन समाज या संकल्पनेत समावेश करावा व या सर्वांची एक बाजू कशी संघटित करावी, याचा विचार व्हायला हवा. एकांगी किंवा एककल्ली भूमिका असलेली रणनीती संघर्ष यशस्वी करू शकणार नाही.

शत्रू कोण हे निश्चित केलेच पाहिजे. म. फुले यांनी 'शेठजी व भटजी' हे शत्रू

म्हणून सांगितले. शोषक म्हणून सांगितले. शेठजी व भटजी ही व्यवसायसूचक नावे आहेत, केवळ जातसूचक नाहीत. म. फुले यांच्या सहकाऱ्यांत अनेक जन्माने-जातीने ब्राह्मण असलेले लोक होते. सदाशिवराव गावंडे होते, सखाराम परांजपे होते. केशवराव भवाळकर होते, थत्ते होते, भिडे होते, अनेक होते.

डॉ. आंबेडकरांनी अनेकवार 'ब्राह्मणशाही व भांडवलशाही' हे शत्रू आहेत, असे सांगितले आहे. एक नसून हे दोन शत्रू सांगितले हे जसे लक्षात ठेवायला हवे, तसे त्यांनी विचारपूर्वक 'ब्राह्मणशाही' असा शब्द योजला आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. ब्राह्मणशाही आणि ब्राह्मण एक नव्हे, एक तत्त्व आहे. एक जात आहे. ब्राह्मण जातीतच ब्राह्मणशाही जास्त आहे, हे स्पष्ट आहे; परंतु म्हणून दोन्ही एक नव्हे. चवदार तळ्याच्या समता संघर्षात 'ब्राह्मण्य' सोडलेले किंवा ब्राह्मणशाहीत समाविष्ट होऊ न शकणारे; परंतु जातीने ब्राह्मण असलेले लोक सहभागी होते. डॉ. आंबेडकरांच्या सहकाऱ्यांत जन्माने व जातीने ब्राह्मण असलेले कार्यकर्ते होते, हे सत्य लक्षात असू द्यावे. गंगाधरपंत सहस्रबुद्धे होते. टिपणीस होते. अनंतराव चित्रे होते. प्रा. चिटणीस होते, आणखी काही होते. राजर्षी शाहू महाराजांना त्यांच्या इनामावर जगणारा राजोपाध्ये वैदिक मंत्राने संस्कार न करता पौराणिक मंत्राने संस्कार करतो आहे आणि शाहू महाराज हे क्षत्रिय राजे असल्याने त्यांना वेदोक्तांचा अधिकार आहे, असे सांगणारे राजारामशास्त्री भागवत हे ब्राह्मणच होते. राजर्षींच्या सहकाऱ्यांत अनेक ब्राह्मण होते. वा. द. तोफखाने होते. दीक्षित होते. आर. बी. शिरगावकर होते. २६ जुलै १९०२ रोजी पन्नास टक्के राखीव जागा निश्चित करणारा हुकूम महाराजांच्या वतीने त्यांचे खाजगी कारभारी नागेश पांडुरंग भिडे यांनी काढला. ते ब्राह्मणच होते. महाराजांचे राजगुरू रघुनाथ पंडित महाराज ब्राह्मण होते. त्यांची इतकी मैत्री होती, की मृत्यूनंतरसुद्धा दोघांची समाधी एकत्र असावी, असा आदेश महाराजांनी देऊन ठेवला होता.

'ब्राह्मण्य' हा संसर्गजन्य रोग आहे. या रोगाचा उगम जन्माने ब्राह्मण असलेल्या वर्णात झाला आहे आणि आजही जातीने ब्राह्मण असलेल्यांत या रोगाचा फैलाव मोठ्या प्रमाणात आहे. तथापि, अल्प असतील, अत्यल्प असतील, अपवादात्मकच असतील; परंतु ब्राह्मण्य सोडलेले, सोडण्याच्या प्रयत्नांत असलेले ब्राह्मणही आहेत. आणि समतेच्या संघर्षात ते मित्र आहेत.

याउलट हा ब्राह्मण्य रोग मराठ्यांत पसरला आहे. मध्यम जातीत पसरला आहे. दलितांतही पसरला आहे. हे ब्राह्मणग्रस्त मराठे, ब्राह्मण्यग्रस्त मधल्या जातीतले नेते-कार्यकर्ते, ब्राह्मण्यग्रस्त दलित नेते समतेच्या संघर्षात अडसर बनत असतात, हेही

ध्यानात ठेवून रणनीती आखली पाहिजे. हे अनेक ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मण्येतर अधिकच अडचणीचे असतात, असा इतिहासाचा अनुभव आहे. ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मण आणि ब्राह्मण्यग्रस्त दलित यांत जास्त अडचणीचा कोण याचा विचार करून पाहावा.

डॉ. आ. ह. साळुंखे हे महाराष्ट्रातले एक थोर विचारवंत आहेत. आशयाच्या बाबतीतला स्वत:चा आग्रह जरासुद्धा कमी होऊ न देता आपली अभिव्यक्ती अतिसंयमाने व्यक्त करणे, हे त्यांच्या मांडणीतले वैशिष्ट्य आहे.

या देशातील क्रांती का फसत आली, यासंबंधी ते म्हणतात, "...या देशातील क्रांती फसण्याचे प्राचीन काळापासून हे एक महत्त्वाचे कारण आहे की, शोषणाला बळी पडलेल्या गोटातून आलेले व ज्यांना संधी मिळाली, ते लोक मागे वळून पाहत नाहीत. त्यामुळे चळवळी फसतात. हा कुणावर दोषारोप करण्याचा प्रश्न नाही; आत्मपरीक्षण करण्याचा हा मुद्दा आहे. ज्या बहुजन समाजातून तुम्ही आलात, त्याच्याशी बांधिलकी तुम्ही ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा आपण पुन्हा शोषित अवस्थेला जाऊ."

ब्राह्मणेतरांमधील ब्राह्मण्याबाबत डॉ. आंबेडकरांनीही आपली मते अनेकवार नोंदवून ठेवली आहेत. सप्टेंबर १९४४ मध्ये मद्रासमध्ये दिलेल्या व्याख्यानात ते म्हणतात, "ब्राह्मणेतर पक्षातील पुष्कळ लोक दुय्यम दर्जाचे ब्राह्मण होण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. त्यांनी ब्राह्मण धर्माचा त्याग केला नाही, उलट ध्येय म्हणूनच ते त्याला कवटाळीत आहेत."

शोषितांच्या गोटातून आले आणि स्वत:ला संधी मिळाल्यानंतर मागे वळून न पाहणारे जे कुणी बहुजनात असतात, त्यांच्या संबंधीचा यथायोग्य दृष्टिकोन ठरल्याखेरीज स्वनिर्मितीसाठी करावी लागणारी जुळवाजुळव आणि शत्रू-मित्र विवेक योग्य रीतीने होणार नाही. केवळ शोषितांच्या गोटातून आलो एवढ्याच एका कारणासाठी ते बहुजनांचे मित्र असतीलच असे नाही.

याचा अर्थ संपूर्ण मराठा जात, संपूर्ण मधल्या जाती किंवा संपूर्ण शूद्रातिशूद्र किंवा दलित जाती ब्राह्मण्यग्रस्त आहेत, असा अर्थातच नाही. या जातींतील काही थर आणि काही व्यक्ती ब्राह्मण्यग्रस्त आहेत, हे मात्र नक्की. रणनीती निश्चित करताना हे लक्षात ठेवायला हवे.

त्याचप्रमाणे केवळ जन्माने न मागता मिळालेली जात पाहून मित्र व शत्रू ठरवू नयेत. ब्राह्मण्यग्रस्त कोण आहेत व कोण नाहीत; ब्राह्मण्यशाही मानणारे कोण आहेत व कोण नाहीत, हे तपासून रणनीती ठरवावी. अर्थात आम्ही ब्राह्मण्यग्रस्त आहोत,

असे कुणीच म्हणणार नाही. ते व्यवहार कसा करतात, हे पाहून ते ब्राह्मण्यग्रस्त आहेत की नाहीत, हे ठरवावे.

'आपल्या धडावर आपलेच डोके असावे' हे उत्तम विचार मांडणारे उत्तम वाक्य आहे. आपला विचार आपण करावा. आपणास आपलेच तत्त्वज्ञान असावे. आपलीच विचारसरणी असावी. शोषितांना स्वत:चे तत्त्वज्ञान असावे. शोषकांच्या तत्त्वज्ञानाने शोषितांचे भले होण्याची सुतराम शक्यता नसते. शोषकांचे तत्त्वज्ञान शोषण हट्ट करीत असते. शोषण नाहीसे करीत नसते. क्वचित प्रसंगी काही काळ शोषकांचे तत्त्वज्ञान शोषण सुसह्य करते; परंतु तेसुद्धा शोषण दीर्घ काळ टिकावे एवढ्यासाठीच असते. शोषितांचा उठाव लांबवावा यासाठी असते. शोषितांत फूट पडावी यासाठी असते.

सामाजिक न्याय, लोकशाही व समता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने आपल्या धडावर आपलेच डोके असावे, हा विचार अतिउपयुक्त आहे.

तथापि, या मांडणीस दुसरी एक बाजू आहे. डोके आणि धड याच बाबींच्या आधारे ही दुसरी बाजू अशी सांगता येईल, 'आपले डोके आपल्याच धडावर असावे, डोके आपले आणि धड दुसऱ्याचे असे असून चालणार नाही.'

आपला विचार अमलात आणण्यासाठी आपलेच बळ असावे लागते. आपले तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आणण्यासाठी आपलेच सामर्थ्य उभारावे लागते. शोषितांच्या विचारानुसार समाजव्यवहार घडायला हवा असेल, तर त्यासाठी शोषितांचेच सामर्थ्य उपयोगी पडते. शोषकांच्या बळावर शोषितांच्या भल्याचा विचार अमलात येऊ शकणार नाही.

शोषितांच्या हिताच्या विचारास जेव्हा शोषकच पाठबळ देण्याचा आव आणतात, तेव्हा त्यात धोका असतो. पूर्वीच्या तुलनेत शोषित अधिक विचार करू लागले आहते हे खरे आहे, चांगले आहे, स्वागतार्ह आहे. पूर्वीच्या तुलनेत शोषित स्वत:चे बळ गोळा करण्याच्या कामास लागले आहेत, हेही खरे आहे आणि बरे आहे.

शोषक चलाख असतात, आहेत. ते ज्या अनेक चलाख्या करतात, त्यातील एक चलाखी अशी असते की, ते स्वत:च शोषितांच्या हिताचा विचार मांडतात. शोषितांना बनवायचा तो प्रकार असतो. शोषक दुसरी एक चलाखी करतात. जे शोषितांचा विचार मांडतात त्यांनाच शोषक मान्यता देतात. त्यांनाच आपले विचारवंत म्हणून घोषित करतात.

याचा परिणाम  शोषितांचा संघर्ष कमकुवत करण्यात येतो. काही वेळा शोषितांमधून आलेल्या नेत्या-कार्यकर्त्यांना शोषक जवळ करतात. सत्तेत थोडाबहुत वाटा देतात. हासुद्धा शोषितांना फसवण्याचाच डाव असतो.

आपल्या धडावर आपलेच डोके असावे आणि आपल्या डोक्याखाली आपलेच धड असावे.

तत्त्वज्ञानही आपलेच असावे आणि बळी आपलेच असावे. पूर्ण विचाराअंती आणि सर्व साधकबाधक विचार करून ठरविलेली रणनीतीसुद्धा आपणच ठरवलेली असावी. तरच समतेचा संघर्ष कडेला जाईल, तरच समतेचा संघर्ष यशस्वी होईल.

# बहुजनवादी राजकारण : शक्यता आणि मर्यादा

*सर्वात महत्त्वाचा मुद्दा जग बदलणे हाच आहे, यात शंकाच नाही; परंतु जगासंबंधी यथायोग्य ज्ञान मिळविल्याखेरीज ते बदलण्याचा बिनचूक मार्ग सापडूच शकत नाही हासुद्धा तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे.*

गेली काही वर्षे 'बहुजनवादी राजकारण' जोर धरीत आहे, असे दिसते. भारताच्या राजकीय क्षितिजावरील नवी व वाढती शक्ती, असेही वर्णन या बहुजनवादी राजकारणाचे अनेक अभ्यासक व समीक्षक करीत असतात.

या बहुजनवादी राजकारणाची शास्त्रीय व योग्य व्याख्या हे राजकारण करणाऱ्यांनी किंवा अन्य कुणी केल्याचे आढळत नाही. पण सामान्य जनतेच्या मनात या राजकारणाची एक बरीचशी स्पष्ट अशी प्रतिमा तयार झालेली आहे.

संख्येने 'बहु' असलेल्या 'मध्यम व मागास वर्गीय जातींनी' एकत्र येऊन संख्येने 'अल्प' असलेल्या 'पुढारलेल्या जाती'विरुद्ध केलेले राजकारण, अशी ती प्रतिमा आहे.

या राजकारणास बहुजन'वाद' असे संबोधले जात असले तरी सर्वंकष जीवनव्यापी तत्त्वविचार या अर्थाने या राजकारणास 'वाद' म्हणता यईल, असे वाटत नाही. या राजकारणाचे तत्त्वज्ञान कोणते? ध्येय कोणते? कार्यक्रम कोणता? अंतिम ध्येय साध्य कसे करणार? इत्यादी अनेक प्रश्न अजून तरी बऱ्याच प्रमाणात अनुत्तरित आहेत.

अर्थात अशा सर्व प्रश्नांची उत्तरे अगोदर तयार करून मगच राजकारण करावे असे नाही. राजकारण करण्याच्या क्रमात या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे तयार

करीत राहिले तरी चालू शकते. नव्हे तसे केल्यानेच योग्य उत्तरे मिळतात; परंतु ध्येय, धोरण, तत्त्वविचार, नीती, कार्यक्रम या प्रश्नांची स्पष्ट आणि नि:संदिग्ध उत्तरे तयार करावीच लागतात. अन्यथा अशा उत्तरांअभावी असे राजकारण अल्पजीवी ठरण्याची आणि भरकटत जाण्याची शक्यता संभवते.

आज तरी दिसते की, 'बहुजनवादी' ही एक रणनीती आहे. एक व्यूहरचना आहे.

## लोकशाही आणि विषमता

आपल्या देशात प्रौढ मतदानावर आधारलेली लोकशाही अस्तित्वात आहे व त्याच वेळी सर्व प्रकारची विषमताही अस्तित्वात आहे.

भारतीय समाज अगदी स्पष्टपणे तुटक तुटक असलेल्या जातींनी बनलेला आहे. जातींची एक खूप मोठी उतरंड भारतीय समाजात आहे. मुळात फक्त हिंदू धर्मीयांत या जातीय उतरंडीचा प्रभाव होता; पण हा प्रभाव इतका जबरदस्त आहे की, ज्या इतर धर्मांत जाती नाहीत ते धर्मसुद्धा भारतात आल्यावर त्यांच्यातही या जाती तयार झाल्या. त्यांच्याकडेही जातीची उतरंड तयार झाली. ज्या हिंदूंनी धर्मांतर केले ते हिंदूसुद्धा नव्या धर्मात आपली जात घेऊनच गेले. त्यांना धर्म बदलता आला; परंतु जात टाकता आली नाही.

भारतीय समाजातील जातींच्या या उतरंडीत वरच्या जाती संख्येने अल्प आहेत; परंतु सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठा त्यांनाच मिळत आली आहे. ती त्यांनाच मिळत राहावी, अशीच समाजव्यवस्था आहे. खालच्या किंवा मागास जाती संख्येने 'बहू' आहेत; परंतु सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठा यांपासून वंचित आहेत. ते बहुजन असे वंचित राहावेत, अशीच समाजव्यवस्था आहे.

## आत्मभान

समाजव्यवस्थेने प्रदीर्घ काळ सातत्याने सर्व बाजूंनी असा काही विचार पसरविला की, आपणास सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठा मिळत नाही, हे बरोबरच आहे असे खालच्या जातींना प्रदीर्घ काळ सतत वाटत राहिले. आपणावर परमेश्वराची 'अवकृपा' आहे, आपले नशीबच असे आहे, असे त्यांना वाटत राहिले.

असे जोपर्यंत बहुसंख्याक असलेल्या खालच्या जातींना वाटत होते तोपर्यंत वरिष्ठ जातींचे फावले. पण अशी कृत्रिम व्यवस्था आणि मानसिकता सतत टिकू शकत नाही. खाली ठेवलेल्या जातींना आत्मभान आले. आपण कमी नाही, आपण

दुबळे नाही, आपल्या दुरवस्थेला देव किंवा नशीब कारणीभूत नाही, आपल्या दुरवस्थेला समाजातील मूठभर वरिष्ठ जातीचे लोक आणि त्यांनी त्यांच्या हितासाठी तयार केलेली समाजव्यवस्था कारणीभूत आहे, याचे भान बहुसंख्याक खालच्या जातींना आले. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा आपणास मिळाली पाहिजे, असे त्यांना वाटू लागले. त्यासाठी ते प्रयत्न करू लागले. त्यांच्या या प्रयत्नाचे सध्याचे राजकीय स्वरूप म्हणजे बहुजनवादी राजकारण होय.

सर्व मागासलेल्यांनो एक व्हा! संघटित व्हा!! सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठेसाठी संघर्ष करा!!! ही बहुजनवादाची हाक आहे.

## जुटीचा पाया

खालच्या समजल्या गेलेल्या मागास जातीतसुद्धा अनेक जाती आहेत. अनेक फरक आहेत. त्यातही उतरंड आहे.

मागासलेपणा ही त्यांच्यातली समान स्थिती आहे. सत्ता-संपत्ती-प्रतिष्ठा यांपासून वंचित ठेवले गेले ही त्यांची समान अवस्था आहे. यातून बाहेर पडण्याची ऊर्मी ही त्यांची समान ऊर्जा आहे. आजवर ज्यांनी अन्याय केले त्यांच्याबद्दलची तीव्र चीड समान आहे. ज्या चातुर्वर्ण्य आणि जातिव्यवस्थेने त्यांना गुलामांपेक्षाही गुलाम ठेवले त्या व्यवस्थेसंबंधी घृणा समान आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या थोर नेत्यांवरील श्रद्धा समान आहे.

ही समानता हा या मागास जातींना एकत्र ठेवण्याचा पाया आहे.

## अपुरेपणा

मागासलेल्यांना एकत्र आणण्याचा हा पाया सर्वमान्य आहे हे खरे; परंतु हा पाया पुरेसा आहे काय, याचा विचार व्हायला हवा. चीड, संताप, उद्रेक, ऊर्मी या साऱ्या आवश्यक आणि उपयुक्त बाबी आहेत; परंतु एकत्र येण्यास, एकत्र राहण्यास, अशा एकजुटीला स्थायी, टिकाऊ आणि अर्थपूर्ण स्वरूप देण्यास आणि त्याआधारे मुक्तीचे राजकरण करण्यास हा पाया पुरेसा आहे काय याचा विचार केला पाहिजे.

खरे म्हणजे असे एकत्र येणेसुद्धा अजून पुरेशा प्रमाणात घडलेले नाही. देशाच्या विविध भागांत आणि वेगवेगळ्या राज्यांत अशा एकत्र येण्याची अवस्थासुद्धा एकसारखी नाही. काही भागांत बऱ्याच पूर्वी अशी एकजूट झाली. या एकजुटीने काही काळ राजकारण केले. काही साध्य केले. नंतर या राजकारणास विपरीत वळण लागले. मूळ हेतू बाजूस पडला. नवे प्रस्थापित तयार झाले. कुंठित अवस्था झाली.

पुन्हा नवी एकजूट, नवी अवस्था आली. नंतर या एकजुटीत पुन्हा फूट पडली. फाटाफुटीचे दुष्परिणाम भोगून पुन्हा जूट झाली. काही ठिकाणी हा क्रम वारंवार घडला. महाराष्ट्र राज्यातील मागासलेल्यांचे बहुजनवादी राजकारण हे एक असे उदाहरण आहे.

**बिहार**

बिहारसारख्या दुसऱ्या काही राज्यात शेती व तत्सम ग्रामीण व्यवसाय करणाऱ्या मध्यम जाती आणि मागास जाती एकत्र येऊन त्यांनी लोकशाहीतील यशस्वी राजकारण केले. पण त्या सर्व जाती नंतर एकत्र राहू शकल्या नाहीत. त्यातल्या त्यात प्रबळ असणाऱ्या प्रमुख जातींत अंतर पडले. फूट झाली. यादव व कुर्मी अलग झाले. त्यांनी एकमेकांविरुद्ध राजकारण केले आणि परिणामी मागासलेल्यांच्या राजकारणाची पीछेहाट होऊन वरील जातींचे आणि वरिष्ठ वर्गांचे राजकारण करणाऱ्यांची प्रगती झाली. १९९६च्या लोकसभा निवडणुकीत लालूप्रसाद यादवांच्या जनता दलाची व संयुक्त आघाडीची पीछेहाट झाली. श्री. नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहारातील कुर्मी आणि इतर काही मागास जाती लालूप्रसादांच्या यादव जातीविरुद्ध उभ्या राहिल्या. त्यांनी भाजपबरोबर एकजूट केली. परिणामी ज्या भाजपला १९९१ साली लोकसभेच्या अवघ्या पाच जागा मिळाल्या होत्या, त्यांना १९९६ साली १८ जागा मिळाल्या. अर्थात इतरही कारणे आहेतच.

उत्तर प्रदेशातही जवळ जवळ असेच घडले. मध्यम व मागास जातींमधील एकजूट भंग पावली. या जातींचे दोन विभाग झाले आणि ते एकमेकांविरुद्ध उभे राहिले. मुलायमसिंह यादव आणि कांशीराम एकमेकांविरुद्ध लढले आणि दोघांना जवळ जवळ प्रत्येकी २० टक्के अशी ४० टक्के मते मिळवूनही ३० टक्के मते मिळविलेल्या भाजपला ८५ पैकी ५२ जागा मिळाल्या. वरिष्ठ वर्ण-वर्गाविरुद्धची मागास जातींची जूट भंग पावली. मायावतींना मतलबी पाठिंबा देऊन आणि अल्प काळ मुख्यमंत्री बनवून भाजपने कावा साधला. भाजप कावेबाजच आहे. त्यामुळे त्याने कावा साधला हे समजू शकते. परंतु जातींच्या मागासलेपणाच्या आधारे बनविलेली एकजूट या काव्यापुढे टिकू शकली नाही, हा खरा मुद्दा आहे. जात हा घटक धरून मागासलेपणाच्या आधारावरील एकजुटीचा पाया अपुरा ठरला.

**महाराष्ट्र**

बहुजनवादी राजकारणाचा महाराष्ट्रातील इतिहास कदाचित देशात सर्वात जुना असेल. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी बहुजन समाज पक्ष स्थापून काही काळ कार्य केले. महात्मा फुले यांचा वारसा सांगत महाराष्ट्रात ब्राह्मणेतर पक्ष स्थापन झाला

होता. त्यांनी निवडणुकाही लढविल्या. ब्राह्मण जातीचे वर्चस्व कमी करण्यात त्यांना यशही मिळाले. परंतु पुढे त्यांच्यातील मराठेच 'ब्राह्मण्य' स्वीकारून वागू लागले व प्रस्थापितांत सामील झाले. जातीच्या पायावरील जूट टिकू शकली नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि शेवटी रिपब्लिकन पक्ष अशी राजकीय पक्षांची रचना केली व सांगितली. त्यांची रिपब्लिकन पक्षाची संकल्पना जात घटक करून जातींवर आधारलेला पक्ष अशी मुळीच नव्हती. परंतु रिपब्लिकन पक्षाची ही संकल्पना जेव्हा प्रत्यक्षात अवतरू लागली तेव्हा मागास जातीतील एका प्रमुख जातीखेरीज फारसा इतरांचा आधार लाभला नाही. संकल्पना वेगळी राहिली आणि वास्तवात रिपब्लिकन पक्ष म्हणजे दलितांचा (सर्व दलितांचाही नव्हेच) पक्ष असे वास्तव समोर आले.

रिपब्लिकन पक्षात डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर अनेकदा फुटी पडल्या. जुटीचे प्रयत्न झाले, ते फसले. दलित पँथर उदयाला आला. त्यातही फूट पडली. जात घटक धरून प्रत्यक्षांत घडलेला व्यवहार टिकाऊ स्वरूप धारण करू शकला नाही. मुळात रिपब्लिकन पक्षाची किंवा दलित पँथरची संकल्पना ही जात हा घटक समजण्याची नव्हती हे जरी खरे असले, तरी जसा प्रतिसाद मिळाला त्याचा परिणाम पाहता संघटनेचा घटक जात हा राहिला आणि तो टिकाऊ ठरला नाही, असे दिसते.

१९९६ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षात नव्याने ऐक्य झाले. दलित समाजात उत्साह आला. सभा-मेळावे खूप मोठमोठे झाले. इतर मागासवर्गीय जातीत कार्य करणारा बहुजन महासंघही आघाडीत होता. काँग्रेस-सेना-भाजप यांच्या विरोधी असणारे सर्व राजकीय पक्ष एकत्र होते. मुस्लीम अल्पसंख्याकांना ज्यांच्याबद्दल भरवसा वाटतो त्या मुलायमसिंगांचा समाजवादी पक्षही आघाडीत होता. कामगारवर्गाचे राजकारण करणारे सर्व पक्ष होते. तरीसुद्धा सेना-भाजपला ४८ पैकी ३५ जागा मिळाल्या. १९९१ साली त्यांना ९ जागा मिळाल्या होत्या.

महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकांचे मूल्यमापन अनेक बाजूंनी करावे लागेल. निकालाला एकच कारण नाही. परंतु मागासलेल्या जाती एकत्र राहिल्या की नाही ही बाजू तपासायची म्हटले तर निवडणुकांचे जे निकाल लागले आणि निवडणूक काळात जे प्रत्यक्ष दिसले त्यावरूनच एक गोष्ट स्पष्ट झाली. जातिआधारे विचार करायचा तर बौद्ध व महार तेवढे बऱ्या प्रमाणात पुरोगामी लोकशाही मोर्चाबरोबर राहिले. इतर मागास जाती व इतर मागासवर्गीय मोठ्या प्रमाणात सेना-भाजपबरोबर राहिले. काही अर्थातच काँग्रेसबरोबर राहिले. मागास जातींच्या आधारे तयार झालेले पक्ष व संघटनांबरोबर सर्व मागास जाती राहिल्या नाहीत.

अर्थात केवळ जातीच्या आधारे केलेल्या विश्लेषणाने पुरेसा आणि नीट अर्थ लागणारच नाही. परंतु तो वेगळा विषय आहे. सर्व मागास जाती एकत्र राहिल्या नाहीत हा मुद्दा आहे.

१९९६ च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात सेना-भाजपला ४८ पैकी ३५ जागा मिळाल्या म्हणजे त्यांच्या यशाचे प्रमाण जवळ जवळ ७० टक्के आहे. वरिष्ठ जातीवर्गांचे आणि वरिष्ठ वर्गांचे राजकारण करणाऱ्या राजकीय शक्तींना एवढे यश देशात कुठेच मिळाले नाही.

महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर इत्यादींचा वारसा मिरवणाऱ्या पुरोगामी (?) महाराष्ट्रात त्यांच्या विचारांचा पराभव झाला. या वारसाला पात्र बनविण्यासाठी महाराष्ट्राने अधिक सखोल विचार केला पाहिजे. अधिक दूरदृष्टी दाखविली पाहिजे. पुरोगामित्वाचा आणि बुद्धिवादाचा खोटा आत्मगौरव, आत्मघातकी ठरेल.

बिहार, उत्तर प्रदेश व महाराष्ट्रातील १९९६ च्या लोकसभा निवडणुकांचा अर्थ स्पष्ट आहे. मागासलेल्यांना केवळ जातीच्या पायावर एकत्र केले तर पुरेसे ठरत नाही. तशी एकजूट सर्व मागास जातींना एकत्रही करू शकत नाही आणि एकत्र केलेच तर ती एकजूट टिकतही नाही.

## एकजूट टिकत का नाही?

बहुजनवादी राजकारणासाठी तयार केलेल्या मागास जातींच्या एकजुटीत सातत्य का राहत नाही? भावनाविवश न होता, शिवीगाळ किंवा आक्रस्ताळेपणा न करता, एकमेकांवर दोषारोप न करता, एकमेकांच्या उणिवांवर भर न देता या अनुभवाचा विचार केला पाहिजे. या राजकारणासाठीचे ते आवश्यक आहे.

## मागासलेल्यांमधील जात-जाणीव

मागासलेल्यांतही अनेक जाती आहेत. मागासलेल्यांतही जातींची उतरंड आहे. यातील एक जात दुसऱ्या जातीकडे कनिष्ठ म्हणून पाहण्याची प्रदीर्घ काळ रुजविलेली घट प्रवृत्ती आहे. एकूण जातिव्यवस्थेचा हा भयंकर दुष्परिणाम मागासलेल्या जातीतही आहे. मागासलेपण सारखे असले तरी जाती भिन्न आहेत आणि मागासलेपणाच्या जाणिवेपेक्षा जातीची जाणीव अधिक घट्ट आहे. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय शोषण समान असले तरी जातभेद अधिक परिणामकारक आहेत. मागासलेल्यांमध्ये ही जात-जाणीव त्यांची एकजूट टिकू देत नाही. मागास जातींमध्ये आसपास असलेली उच्च-नीचतेची ही जाणीव ही एकजूट टिकू देत नाही. यावर उपाय काय?

### जरा मागे-जरा पुढे

मागासलेल्या जातींमध्ये सर्व जाती आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक पातळीवर सारख्याच मागासलेल्या नाहीत. काही जरा पुढे आहेत, काही जरा मागे आहेत. काही खूपच मागे आहेत. जाती-जातींमधील हे अंतर इतिहासक्रमात घडलेले आणि घडवलेले अंतर आहे. हे अंतरसुद्धा सर्व मागासलेल्या जातींची जूट घडवायला व घडवलेली टिकवायला एक अडथळा आहे.

### एका जातीत थर

मागासलेल्या जातींमध्ये जाती-जातीत जसे भेद आहेत, तसेच एका जातीतसुद्धा थर आहेत. एका मागास जातीतील सर्वच लोक एका पातळीवर नाहीत. कमी प्रमाणात असेल; परंतु एका जातीतील लोकांतसुद्धा आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक पातळीवर थर आहेत. एका जातीत भिन्न वर्ग तयार होत आहेत. भेद तयार होत आहेत. मागास जातीत मध्यमवर्ग तयार झाला आहे. मागास जातीतील या नव्या मध्यमवर्गाची वृत्ती इतर मध्यमवर्गासारखीच आहे. त्यांना वरच्या जातीतील मध्यमवर्गीय जवळचा वाटू लागतो. ते त्यांच्यात बसतात, उठतात. त्यांच्यासारखे बोलतात. त्यांच्यासारखे राहतात. त्यांना स्वत:च्या जातीतील अशिक्षित गरीब दूरचे वाटू लागतात. थोडक्यात म्हणजे त्यांच्यात 'ब्राह्मण्य' येऊ लागते.

अर्थात सर्वच शिक्षित मध्यमवर्गीय दलित जातीत हे 'ब्राह्मण्य' येत नाही, ही खूप मोठी आशादायक बाब आहे. दलित चळवळीचे, दलित वाङ्मयीन चळवळीच्या नेतृत्वाकडे नजर टाकली तर ही बाब स्पष्ट होते.

### प्रबोधनाची उणीव

आपल्या देशात एकूण निरक्षरता खूप आहे. अल्पशिक्षित समाज विभाग मोठा आहे. स्वत: वाचून प्रबोधन करू शकतील अशांची संख्या खूप कमी आहे. हे सर्व प्रमाण दलित मागास, इतर मागास यांत सरासरीपेक्षा अर्थातच जास्त आहे. या सर्व विभागांच्या जाणिवा तयार करण्याचे काम व्हावे त्या रीतीने व त्या प्रमाणात मुळीच होत नाही. साधनांचा अपुरेपणा हे कारण आहेच; परंतु प्रबोधनाच्या आवश्यकतेची जेवढी तीव्रता कृतीत दिसावी तशी दिसत नाही. उलट विकृती पसरवणारे शिक्षण मोठ्या प्रमाणात चालू आहे. सर्व प्रसारमाध्यमे प्रस्थापितांबरोबर आहेत. दलित-मागास इतर मागासांविरुद्ध आहेत. ते जाणीवपूर्वक गैरसमज पसरवतात. फूट पाडतात. समाज बळी पडतो. परिणामी ऐक्य होत नाही. झाले तर टिकत नाही. बहुजनवादी राजकारण बरेचसे श्रद्धेवर आधारून चालवावे लागते. विचाराऐवजी

नुसती श्रद्धा आली की, बिघाड शक्य होतो. फुले-शाहू-आंबेडकर इत्यादी नावे घेतली जातात; परंतु त्याच्या विचारांचा अभ्यास होतोय असे फारसे दिसत नाही. जो होतो तो खूप मर्यादित समाज विभागापुरता होतो.

श्रद्धा उपयुक्त ठरू शकते; पण नुसती श्रद्धा पुरी नसते. अनेकदा ती घातक ठरू शकते. विचार सोडून श्रद्धा बाळगणाऱ्यांना भटकविता येते आणि असे भटकविण्यात तज्ज्ञ मंडळी खूपच आहेत.

## नेतृत्व

बहुजनवादी राजकारण बहुतेक सर्व ठिकाणी व्यक्ती-नेतृत्व दिसते. संघटना-नेतृत्व खूपच कमी दिसते. संघटनेऐवजी व्यक्तीवरील निष्ठा चळवळीत उपयुक्त नसते. सातत्यासाठी ती मारक ठरते. व्यक्ती बिघडू शकते. संघटना बिघडण्याची शक्यता कमी असते.

बहुजनवादी राजकारणाच्या व्यक्ती-नेतृत्वात उणिवा जाणवतात. हे नेतृत्व एकांगी बनताना दिसते. अतिरेकी बनते. एकांगी आणि अतिरेकी नेतृत्व प्रभावी आणि आकर्षक वाटते; परंतु लोकशाहीमध्ये आवश्यक असलेला जनाधार मिळविण्यास ते मारक ठरू शकते. मारक ठरते.

या एकांगीपणाचे एक अंग असहिष्णुता आहे. बहुजनवादी राजकारणाचे नेतृत्व करणाऱ्या अनेक व्यक्ती याच राजकारणाचे नेतृत्व करणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीसंबंधी बहुधा असहिष्णू असतात. बहुजनवादी राजकारणाचे पक्षपाती व मित्र असणाऱ्यांच्या बाबतीतही ते असहिष्णू असते. परिणामी व्यापक जूट होत नाही. झाली तर टिकत नाही.

व्यक्ती भ्रष्ट होऊ शकते. संघटना भ्रष्ट होण्याची शक्यता कमी असते. बहुजनवादी राजकारणाचे नेतृत्व करणाऱ्या अनेक व्यक्तींचे चारित्र्य हा काही त्यांच्या संबंधीच्या आकर्षणाचा खंबीर मुद्दा दिसत नाही. प्रवाद खूप आहेत, ते सारेच खरे नाहीत हे कुणीही समजू शकतो; परंतु बहुजनवादी राजकारणाचे नेतृत्व चारित्र्यवान असावे यावर भर दिला जात असताना दिसत नाही.

## काय करावे?

बहुजनवादी राजकारणाच्या अंगभूत मर्यादा आहेत. या अंगभूत मर्यादा लक्षात घेऊनही भारतातील अनेक भागांत हे राजकारण उपयुक्त आणि आवश्यक आहे. व्यापक जनसमुदायांना आत्मभान ते देऊ शकते. लोकशाहीमधील आपल्या

सामर्थ्यामुळे 'बहुजन' स्वाभिमानी बनू शकतात. 'आपण काहीतरी करू शकतो', ही जाणीव समाजाला पुढे नेणारी जाणीव आहे.

परंतु अंगभूत मर्यादांचे भान ठेवले पाहिजे. अंगभूत नसलेल्या उणिवा व दोष दूर करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे.

फक्त जातींवर आधारलेल्या 'बहुजनवादा'च्या मर्यादा लक्षात घेऊन आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, प्रादेशिक अशा सर्व शोषितांच्या व्यापक जुटीच्या दिशेने वाटचाल होईल, अशा रीतीने बहुजनवादी राजकारणाने गेले पाहिजे. जाणत्यांनी ते तसे नेले पाहिजे. या राजकारणाच्या मित्रांनी त्यात कृतिशील सहभाग केला पाहिजे.

आर्थिक मागण्यांसाठी संघर्षात राहिलेल्यांनी सामाजिक मागण्यांसाठी संघर्ष उभे केले पाहिजेत आणि उभे राहिलेल्या संघर्षात सामर्थ्यानिशी सहभागी झाले पाहिजे. सामाजिक अन्यायाविरुद्ध प्रामुख्याने संघर्ष करणाऱ्यांनी मागास समाजाच्या आर्थिक मागण्यांसाठीही संघर्ष केला पाहिजे. असे संघर्ष जुटीने चालविले म्हणजे हे ऐक्य होईल.

# बहुजनवादाच्या विविध संकल्पना

जात हा घटक आणि सामाजिक मागासलेपणा या दोन गोष्टी एकत्र येण्यासाठी समान वास्तव, पुढारलेल्यांना विरोध, राजकीय सत्तेत वाटा मिळविणे हे ध्येय, जातीची अस्मिता जागवून कार्यप्रवणता निर्माण करणे हा मार्ग, इत्यादी आनुषंगिक बाबींआधारे केलेले राजकारण आपल्या देशात बराच काळ सुरू आहे.

या राजकारणाला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळतो आहे. असे राजकारण करणाऱ्यांचे निवडणुकांमधील बळ मधूनमधून आणि कुठे कुठे वाढतानाही दिसते आहे. मागासलेल्या अनेक जातींनी एकत्र येऊन मुख्यत: भावनेच्या आधारे निवडणुका लढवणे आणि काही काळानंतर पुन्हा जातीच्याच आधारे त्यांची फाटाफूट होऊन या राजकारणाचे तुकडे पडणे हा क्रमही सुरू आहे. पुन्हा एकत्र येण्याचा प्रयत्न आणि पुन्हा तुकडे पडणे सुरू आहे. एकत्र येण्यासाठी जात जाणिवेआधारे ज्या अस्मितेला आवाहन करण्यात येते त्याच जाती जाणिवेआधारे तुकडे पडताना दिसतात. एकत्र येण्यासाठीचा घटक जसा जात, तसा फाटाफुटीसाठीसुद्धा जात किंवा पोटजात हाच घटक निर्णायक ठरतो.

महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाचे तुकडे पडण्यालासुद्धा महार या जातीतील पोटजातीचा आधार सांगितला जातो. विदर्भातील भंडारा लोकसभा मतदारसंघात डॉ. आंबेडकरांचा पराभव व्हायला त्यांची व मतदारांची वेगळी पोटजात हे एक कारण सांगितले जाते.

## इतिहास

कोणतीही संकल्पना नीट समजून घेऊन काही रास्त निष्कर्ष काढावयाचे असतील तर, त्या संकल्पनेचा इतिहास समजून घेतला पाहिजे; होत आलेले बदल

लक्षात घेतले पाहिजेत; या बदलाची कारणे समजून घेतली पाहिजेत. या कारणांपैकी परिस्थितीजन्य कारणे अलग केली पाहिजेत; व्यक्तिनिष्ठ कारणे अलग केली पाहिजेत. इष्ट-अनिष्ट समजून घेतले पाहिजे आणि पुढील वाटचालीचे सूचन केले पाहिजे; या पद्धतीने जाऊ पाहता बुहजनवादाच्या संकल्पनेच्या रास्त समजासाठी किमान म. फुल्यांपर्यंत मागे गेले पाहिजे.

बहुजनांत कुणाकुणाचा समावेश, कुणाकुणाला विरोध, अशा व्याप्ती व विरोध एवढ्याच बाजूने पाहिजे तरी काही उलगडा होतो. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया ही म. फुल्यांची व्याप्ती दिसते. 'शेठजी आणि भटजी' यांना विरोध दिसतो. म. फुल्यांनी ज्यांना एकत्र करावयाचे त्यांच्यात भाषेत बोलायचे व लिहायचे असे केले असल्याने त्यांच्या भाषेचा अर्थ तशाच रीतीने लावला पाहिजे. अलीकडील भाषेतील समानार्थी शब्द योजून तुलना केली पाहिजे.

लोकराजा शाहू छत्रपती यांची व्याप्तीची संकल्पना त्यांच्या १९०२च्या संस्थानच्या नोकरीत मागास जातींसाठी ५० टक्के राखीव जागांच्या हुकुमात दिसते. या हुकुमात त्यांनी 'ब्राह्मण, परभू, शेणवी' सोडून उरलेले सर्व मागासलेले अशी व्याख्या केली आहे. म. फुल्यांचे अनुयायित्व सांगणाऱ्यांनी महाराष्ट्रात 'ब्राह्मणेतर' पक्ष काढला आणि ब्राह्मणेतरांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. यात शाहू महाराजांचे पुढारीकरण होते. ब्राह्मण जातीला विरोध आणि इतर सर्व जातींची एकजूट अशी ती रचना होती.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचा 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर' अशा विभागणीला विरोध होता. त्यांची संकल्पना थोड्याशा विस्ताराने पाहायला हवी.

डॉ. आंबेडकरांनी वेगवेगळ्या हेतूंनी वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे राजकीय पक्ष स्थापन केले होते. या पक्षांच्या नावांवरून व्याप्ती व विरोध या बाबी स्पष्ट होतात. 'स्वतंत्र मजूर पक्ष', 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' आणि 'रिपब्लिकन पक्ष' अशी ती नावे आहेत.

१९३८ साली मनमाड येथे जी.आय.पी. रेल्वे कामगारांच्या सभेत भाषण करताना ते म्हणाले होते, "ब्राह्मणशाही व भांडवलशाही हे आपले दोन शत्रू आहेत." म. फुले यांनी योजलेल्या 'भटजी' व 'शेठजी' या शब्दांची येथे आठवण व्हावी. डॉ. आंबेडकरांनी 'ब्राह्मण' असा शब्द न वापरता 'ब्राह्मण्य' असा शब्द वापरला. म. फुले याच्या 'शेठजी' या शब्दाने 'शेठगिरी' (सावकारी) करणे हा व्यवसाय सूचित होतो आणि 'भटजी' (ब्राह्मण नव्हे) या शब्दाने 'भटकी' करणे व्यवसाय सूचित होतो.

दलित पँथरच्या पहिल्या जाहीरनाम्यात डॉ. आंबेडकरांच्या रिपब्लिकन पक्षाच्या संकल्पनेचे आणि १९३८ च्या भाषणातील 'ब्राह्मण्यशाही' आणि 'भांडवलशाही' या संकल्पनांचे अधिक स्पष्ट व अधिक पुढे नेणारे स्पष्टीकरण जाणवते.

कांशीराम-मायावती यांची व्याप्ती व विरोध, त्यांच्या 'बहुजन पक्ष' या राजकीय पक्षाच्या अगोदरच्या संघटनेतील एका घोषणेवरून स्पष्ट होतो : 'बामन बनिया ठाकूर चोर, बाकी सब डी.एस.फोर.' डी.एस.फोर म्हणजे दलित-शोषित समाज संघर्ष समिती -डी.एस.एस.एस.एस. म्हणजे डी.एस.फोर. या नावात 'शोषित' अशी शब्दयोजना आहे; परंतु त्यांच्या घोषणेचा अर्थ सरळ आहे. बामन-बनिया-ठाकूर या जातीत शोषित नाहीत आणि असलेच तर त्यांच्या शोषणाशी आम्हाला काही कर्तव्य नाही, असा तो अर्थ आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णातल्या सर्व जातींतील सर्व जण शोषक आहेत. त्यात कुणी शोषित नाही. असलेच तर त्यांच्याशी आम्हाला काही कर्तव्य नाही, अशी ही भूमिका आहे.

बी.सी., ओ.बी.सी. यांची जूट आणि उरलेल्यांना विरोध अशा व्यूहरचनेतून कार्य केल्यानंतर १४ एप्रिल १९८४ रोजी कांशीराम यांनी 'बहुजन समाज पक्ष' या राजकीय पक्षाची स्थापना केली.

भारतीय राजकारणात, विशेषत: आणि मुख्यत: निवडणूक राजकारणात, बसप हा एक बहुचर्चित आणि दखलपात्र राजकीय पक्ष आहे. 'बहुजन' हा शब्द योजून व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसतो.

कॉंग्रेस पक्ष, समाजवादी आणि कम्युनिस्ट हे व इतर पक्षही दलितांचे व शोषितांचे राजकारण सांगत आले आहेत. त्यांचे प्रश्न मांडत आले आहेत. त्यासाठी भांडत आले आहेत; परंतु तो अलग प्रश्न आहे. हे पक्ष 'जात' हा समाज घटक धरून आणि केवळ मागास जातींचे प्रश्न मांडण्याचे राजकारण करीत आलेले नाहीत. म्हणून त्यांच्या या संबंधीच्या संकल्पना या ठिकाणी विचारात घेण्याचे कारण नाही.

## कर्मवीर शिंदे यांची संकल्पना

१ सप्टेंबर १९२० रोजी कर्मवीर शिंदे यांनी 'बहुजन समाज पक्ष' या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहीरनाम्यात त्यांनी मुद्देसूदपणे, रेखीवपणे या पक्षाची व्याप्ती, कार्यपद्धती, हितसंबंध, उद्देश या बाबी स्पष्ट केल्या आहेत.

या पक्षाच्या स्थापनेची पार्श्वभूमी थोडक्यात समजून घेतली पाहिजे. मर्यादित मतदारांनी मर्यादित अधिकार असलेल्या प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुका घेण्याची चर्चा व कार्यक्रम सुरू होता. या निवडणुकांत सर्वसाधारण आणि राखीव

जागा अशा जागा निश्चित केल्या होत्या. या राखीव जागांत 'मराठा व तत्सम जाती' असा एक गट करण्यात आला होता. त्यासाठी मुंबई इलाख्यात ७ जागा राखीव ठेवण्यात आल्या होत्या. इतरही राखीव जागा होत्या.

नोव्हेंबर १९२० मध्ये निवडणुका होणार, असे जाहीर झाल्यानंतर पुणे येथे जेधे मॅन्शनमध्ये मराठा समाजातील विविध गटांची व नेत्यांची सभा भरली. या सभेत 'मी राखीव जागेवर उभा राहणार नाही. त्यातील जातिवाचकत्वाच्या मी विरुद्ध आहे' असे विठ्ठल रामजी शिंदे यांनी ठामपणे सांगितले आणि मराठा जातीसाठी राखीव असलेल्या जागेवर उभे राहण्यास नकार दिला.

तेव्हाची एक मजेशीर विचार मांडणी उद्बोधक आहे. कर्मवीर शिंदे जन्माने 'मराठा' होते. मराठा समाज राष्ट्रीय प्रवाहापासून अलग राहू नये म्हणून त्यांनी राष्ट्रीय मराठा संघ स्थापन करण्यात पुढाकारही घेतला होता; परंतु त्यांनी 'मराठा' जातीसाठी राखीव असलेल्या जागेवर निवडणूक लढविण्यास विरोध केला. दुसरीकडे श्री. नरसिंहराव चिंतामण केळकर हे जन्माने ब्राह्मण होते. तेव्हा ते 'मराठा' या नियतकालिकाचे संपादक होते. ते म्हणाले, 'मी मराठा आहे. कारण मी 'मराठा' वर्तमानपत्र चालवितो. म्हणून मला निवडून द्या.' निवडून यावे म्हणून काय काय तर्क सांगितले जातात याचा हा अस्सल पुणेरी नमुना. या संदर्भातील राजर्षी शाहूंनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया खास कोल्हापुरी आहे. त्यांनी कर्मवीर शिंदे यांना पत्र पाठवले होते. त्यात म्हणतात, "नरसिंह चिंतामण केळकर म्हणतात मी मराठा आहे म्हणून मला निवडून द्यावे. कारण मी 'मराठा' वर्तमानपत्र चालवतो. त्यावर मी (राजर्षी शाहू) म्हणतो की, माझ्या बैलाचे नाव 'ब्रिटानिया' ठेवले, माझ्या आवडत्या घोड्याचे नाव 'टर्कीश फ्लॅग' ठेवले, माझ्या गायीचे नाव जपानिका ठेवले म्हणून का मी जपानी अगर टर्की लोकांचा पुढारी होणे योग्य होईल? वि. रा. शिंदे मराठे वर्गापैकी आहेत... " इत्यादी. असो.

कर्मवीर शिंदे राखीव जागेवर उभा राहिले नाहीत. शाहू महाराजांची इच्छा व आग्रह असताना उभे राहिले नाहीत. सर्वसाधारण जागेवर उभे राहिले आणि पराभूत झाले. राजर्षी शाहू यांनी दुसरे उमेदवार गुप्ते यांना पाठिंबा देऊन निवडून आणले.

कर्मवीर शिंदे यांच्या या महत्त्वाच्या कृतीमधून त्यांची 'बहुजनांची' संकल्पना स्पष्ट होते. अर्थात त्यांची काळजीपूर्वक बहुजन पक्षाचा जाहीरनामा लिहिलेला आहे. त्यामुळे तर्क करण्याची गरज नाही. संदिग्धता उरत नाही.

निवडणुकांच्या या पार्श्वभूमीवर कर्मवीर शिंदे यांनी बहुजन पक्ष स्थापन केला. या जाहीरनाम्यातच त्यांनी नमूद केले आहे की, "राजकारण हे व्यवहारशास्त्र आहे."

बहुजन पक्ष हा पक्ष त्यांनी नंतर पुढे चालविला असे दिसत नाही. नंतर ते काँग्रेस पक्षातच होते.

व्याप्ती आणि विरोध याचा विचार करताना या जाहीरनाम्यात 'हितसंबंधाची' मांडणी आहे. जाती-पोटजातीवर आजवर उभारलेले पक्ष आणि संघटना मुख्यत: भावनेच्या आधारे व्यवहार करतात. हितसंबंधाच्या आधारे व्यवहार करताना दिसत नाहीत. या पक्षांनी एकत्रित केलेल्या 'जातीं'मध्ये वेगवेगळे 'हितसंबंध' असतात. तरी ते जात म्हणून एकत्र येतात. या जातींबाहेरच्या जातींतसुद्धा त्यांच्याशी समान हितसंबंधाचे विभाग असतात; परंतु जातीबाहेरील या समान हितसंबंधांच्या विभागांना एकत्रित करण्याची त्यांची दिशा नसते. आपल्या एका किंवा अनेक जातींबाहेरसुद्धा मागासलेले असतात. परंतु आपल्या जातीतले मागासलेले आणि आपल्या जातीबाहेरचे मागासलेले यांना एकत्र करण्याकडे ते दुर्लक्ष करतात. म्हणून कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांची हितसंबंधाची मांडणी आणि त्या समान हितसंबंधांच्या विभागांना एकत्र करण्याची कल्पना आणि व्यवहार नीट लक्षात घेतला पाहिजे. १ सप्टेंबर १९२० च्या बहुजन पक्षाच्या जाहीरनाम्यात ते लिहितात, "... कारण ह्या पक्षाच्या (बहुजन पक्षाच्या) पायाखाली केवळ पोकळ मनोभावना नसून भरीव हितसंबंध आहेत. त्यांची राखण आणि पुरस्कार करण्याचे नि:स्पृह काम या पक्षाला आपल्याच पायावर उभा राहून व आपल्याच हातांनी करावयाचे आहे. आमचे सहकारी ब्राह्मण असोत, ब्राह्मणेतर असोत, मवाळ असोत, जहाल असोत, किंबहुना स्वकीय असोत की परकीय असोत, त्यांनी कोणतीही नावे, रूपे किंवा मते स्वीकारलेली असोत, फार तर काय त्यांचा पूर्वेइतिहास कसाही असो, जोपर्यंत आपल्या हितसंबंधाचा पुरस्कार प्रामाणिकपणे आणि जोराने त्यांच्या हातून होईल, अशी आमची खातरजमा कायम राहील, तोपर्यंत आम्ही त्यांच्याशी व तेवढ्यापुरते सहकार्य करावयास मोकळे राहू. एरवी त्यांना आमचा रामराम."

हा पक्ष ज्यांना संघटित करू पाहतो त्यांची व्याप्ती त्यांनी स्पष्टपणे नमूद केली आहे. ते लिहितात,

"हिंदुस्थानातील एकंदर लोकसंख्येचे केवळ राजकीयदृष्ट्या दोन मुख्य भाग पडत आहेत. ते हे की, एक विद्याबळ, द्रव्यबळ किंवा अधिकारबळाने पुढारलेला वर्ग आणि दुसरा ह्यातील कोणतेही बळ अंगी नसल्यामुळे नाइलाजाने मागासलेला वर्ग किंवा बहुजन समाज."

कर्मवीर शिंदे यांची विभागणी स्पष्ट आहे. ती केवळ वर्णावर आधारलेली नाही. केवळ जातीवर आधारलेली नाही. ती 'विद्याबळ, द्रव्यबळ आणि अधिकारबळ' यांवर

आधारलेली आहे. मागासलेल्या जातींना यातले कोणतेही बळ नसते, हे स्पष्टच आहे; परंतु मागासलेल्या म्हणून ज्यांना समजले जात नाही किंवा ज्यांना पुढारलेल्या जाती असे समजण्यात येते त्या जातीतही विद्याबळ नसलेले, द्रव्यबळ नसलेले आणि अधिकारबळ नसलेले असतात आणि तेसुद्धा कर्मवीर शिंदे यांच्या 'बहुजन' या संकल्पनेत येतात, हे महत्त्वाचे आहे. तेव्हा व आता मागासलेल्या समजत असलेल्या जातींतही विद्याबळ, द्रव्यबळ आणि अधिकारबळ येत आहे. कमी-जास्त प्रमाणात आले आहे. असे बळ प्राप्त झालेले विभाग कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या बहुजन संकल्पनेत येत नाहीत. हे नीट लक्षात घ्यावे. याच कारणांनी त्यांनी 'ब्राह्मणेतर' असे नाव घेण्यास स्पष्ट विरोध केला.

महाराष्ट्रात पुन्हा एकदा 'ब्राह्मणेतर', 'मराठेतर' अशा संकल्पना मांडल्या जात आहेत. 'मराठा तितुका मेळवावा' हे पुन्हा एकदा महाराष्ट्रात सांगितले व आचरले जात आहे आणि यातील 'मराठा' व 'ब्राह्मण' हे शब्द जन्माने निश्चित केलेल्या व अपघाताने मिळालेल्या जातीच्या अर्थानेच वापरले जात आहेत. भारतीय राज्य घटनेतील आणि कायदेशीर तरतुदीमधील अडचणींमुळे पक्षांच्या नावात 'जातवाचक' शब्द योजणे अडचणीचे ठरते म्हणून फसवी नावे धारण केली जातात. परंतु एक वास्तव आहे की, महाराष्ट्रात 'मांग' जातीची पक्ष-संघटना, धनगर जातीची पक्ष-संघटना, माळी जातीची पक्ष-संघटना, मराठा जातीच्या पक्ष-संघटना, ब्राह्मण जातीच्या पक्ष-संघटना, लिंगायत-जैनांची पक्ष-संघटना इत्यादी संघटित होत आहेत. त्या त्या पक्षांच्या नेत्यांच्या बौद्धिक कुवतीनुसार व क्षमतेनुसार गोंडस, फसवी नावे धारण केली जातात. वेगवेगळे बुरखे पांघरले जातात. जरा निरखून पाहिले की, आतली जात स्पष्ट दिसते.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांच्या बहुजन पक्षाची व्याप्ती सविस्तरपणे व स्पष्टपणे नमूद केलेली आहे. त्यात त्यांनी एकूण आठ वर्ग सांगितले आहेत. वर्ग हा शब्दही त्यांचाच. ते असे :

१. *शेतकरीवर्ग :* मात्र यात जमीनदार आणि जहागीरदार यांचा समावेश मुळीच नाही.

२. *शिपाईवर्ग :* ह्यात सरदारांची गणना मुळीच नाही.

३. *शिक्षकवर्ग :* ह्यात सोवळेशास्त्री, हक्कदार पुरोहीत किंवा बलुते जोशी किंवा असल्या इतर ऐतखाऊंची गणना करता येत नाही.

४. *उद्यमी :* यात सुतार, सोनार, साळी, शिंपी, गवळी, माळी, तेली, तांबोळी,

नाटकवाले, गोंधळी, शकुन सांगणारे जोशी, पोवाडे गाणारे शाहीर, वैदू आणि तत्सम उद्यमी समाज विभागाचा समावेश केला जातो.

५. *दुकानदार :* ह्यात व्याज देऊन दुसऱ्याचे भांडवल वळवून आणून त्यावर गब्बर होणारे पेढीवाले वर्ग आहेत.

६. *मजूरवर्ग :* ह्या विभागात अंगमेहनत करणाऱ्या विभागाबरोबरच बुद्धिचातुर्य वाढविणारे वकील, डॉक्टर यांचाही समावेश आहे. परंतु ते विद्याबळामुळे आणि द्रव्यबळामुळे बहुजन समाजाचेही पुढारीपण करतात. त्यामुळे ते तत्त्वत: मजूर असले तरी ते मागासलेले नसतात. म्हणून त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण त्यांचे त्यांनी करावे असे शिंदे नमूद करतात. तथापि ते शोषक नाहीत आणि बहुजनांचे विरोधक नाहीत हे स्पष्टपणे सुचवितात.

७. *अस्पृश्यवर्ग :* कर्मवीर लिहितात, "परंपरेची, रूढीची अगर दुसरी कोणतीही खरी-खोटी कारणे सांगत न बसता या वर्गाची अस्पृश्यता व असहाय्यता पूर्णपणे नष्ट करून त्यांना अगदी समान दर्जाने बहुजन समाजात एकजीवन करणे हे या पक्षाचे केवळ पवित्र काम आहे."

मराठ्यांचे संघटन करण्याचे प्रयत्न करणाऱ्या आजच्या महाराष्ट्रातील नेत्यांनी व विचारवंतांनी जन्माने मराठा असलेल्या कर्मवीर शिंदे यांचा या शब्दांमधून व्यक्त होणारा अंतरीचा कळकळा लक्षात घ्यावा. ब्राह्मणांच्या विरोधात लढ्यासाठीचे संख्यासामर्थ्य म्हणून अस्पृश्यावर्गाकडे पाहू नये.

८. *स्त्रीवर्ग :* म. फुल्यांनी शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया अशी एकत्र शब्दयोजना सातत्याने केली होती. तोच विचार कर्मवीरांचा दिसतो. ते लिहितात, "स्त्रीवर्ग म्हणजे तर आमचा पाळणा! त्यांची हयगय करू तर पाळण्यातच आमचे थडगे डोलू लागेल. हे आम्ही पूर्ण जाणून आहोत."

अशा रीतीने व्याप्तीचे ८ विभाग सांगून आणि त्यातील जमीनदार, जहागीरदार, सरदार, सावळेशास्त्री, हक्कदार पुरोहित, व्याजावर गब्बर झालेले पेढीवाले यांच्यासारख्या हितसंबंधामुळे वजा केलेले विभाग स्पष्टपणे सांगितले आहेत.

**आज काय?**

आजही बहुजन पक्ष, बहुजन, ब्राह्मणेतर, मराठेतर यांच्याबरोबरच जातिनिहाय राजकीय संघटना उभ्या राहत आहेत आणि जुन्या जात-जाणिवांच्या आधारे निवडणुकांत बळ व्यक्त करीत आहेत. हितसंबंधांच्या आधारे समाजाची विभागणी

करण्याऐवजी जात व धर्माच्या आधारे समाज विभागीत आहेत आणि म. फुल्यांचे नाव घेत आहेत. डॉ. आंबेडकरांचे नाव घेत आहेत. त्यांनी कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांची बहुजन संकल्पना विचारात घ्यावी. त्यांची संकल्पना योग्य वाटत नसेल तर ती नाकारावी. विचाराने नाकारावी. अनुभवाआधारे नाकारता येत असेल तर नाकारावी. कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांच्याकडे दुर्लक्ष करून किंवा अनुल्लेखाने व्यवहार करून नये. ते बहुजनांच्या हिताचे ठरणार नाही.

कित्येक जाणकार फुले-शाहू-आंबेडकर या नामावलीत शिंद्यांच्या नावाचा समावेश करीत नाहीत. हा त्यांच्यावर अन्याय आहे.

# भूमिहीनांचे आंदोलन

देशातील दलितांचे आजवरचे सर्वश्रेष्ठ मार्गदर्शक नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे. हे इतके निर्विवाद ऐतिहासिक सत्य आहे की, ते आज गृहीत धरण्यात येत आहे. त्यांच्या निधनानंतर मात्र दलितांचे जवळ जवळ सर्व नेते हे एकमेकांस खलपुरुष, धोकेबाज, फुटीर, स्वार्थी, कावेबाज, महत्त्वाकांक्षी, विकाऊ, नादुरुस्त इत्यादी शेलक्या शिव्या देत आले आहेत. तरीसुद्धा सर्वजण आपणच आंबेडकरांचे खरे शिष्य आणि खरे वारसदार आहोत, असे सांगत असतात. असा दावा करणारे बहुतेक सर्वजण स्वत:स डॉ. आंबेडकरांनंतरचा आंबेडकर मीच, असे समजत असतात.

तथापि, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर दलितांचा सर्वात मोठा नेता कोण असा प्रश्न उपस्थित करून, अभिनिवेश बाजूस ठेवून वास्तवाचा विचार केला तर एकच नाव पुढे येते आणि ते म्हणजे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे.

डॉ. आंबेडकर यांच्या हयातीतसुद्धा दादासाहेब गायकवाडांचा समावेश दलित नेतृत्वात रास्तपणे होत होताच. खुद्द बाबासाहेबांचा त्यांच्याशी झालेला पत्रव्यवहार, त्यांच्यावर सोपिवलेली आणि त्यांनी समर्थपणे पार पाडलेली चळवळीची कामे, यांचे यथायोग्य मूल्यमापन केले तर हे सत्य स्पष्ट दिसते.

हे सत्य डॉ. आंबेडकरांच्या दादासाहेब गायकवाड यांना लिहिलेल्या १४ मे १९५२च्या पत्रात ठळकपणे दिसते. मृत्यूपूर्वी ४ वर्षे अगोदर लिहिलेल्या या पत्रात बाबासाहेबांनी लिहिले आहे.... "माझ्या प्रकृतीची काळजी करण्यापेक्षा आता माझ्यावरील साऱ्या जबाबदाऱ्या तुम्ही स्वत: स्वीकारण्याची मनाची तयारी लवकर केली पाहिजे. कारण मी काही फार दिवस जगणार नाही, याबद्दल माझी खात्री होऊन चुकली आहे... "

## गुरू आणि शिष्य

कर्मवीर दादासाहेब गायकवाड हे बाबासाहेबांचे अनुयायी आणि शिष्य होते; पण ते स्वत:ही विचार करीत. स्वत:ची मते बनवीत. ते 'होयबा' नव्हते. बाबासाहेब आणि दादासाहेब या गुरू-शिष्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण नात्याचे मूल्यमापन प्रा. रावसाहेब कसबे यांनी यथायोग्य असेच केले आहे. ते असे :

"...पाश्चात्यांकडे गुरू-शिष्य परंपरा अधिक मोकळी आणि विचारविकासाच्या दृष्टीने पोषक अशी होती. आपल्याकडे गुरू हा शिष्याच्या श्रद्धेचा विषय होता. त्याला प्रश्न विचारणे ही अंधश्रद्धा मानली जात होती. यातूनच 'संशयात्मा विनश्यती'सारखे विचार प्रतिष्ठित झाले. गुरूचा अनादर न करताही गुरूवर प्रश्नांची सरबत्ती करणारे शिष्य गुरूला लाभणे हे दृश्यच या क्षेत्रातील एक विलोभनीय दृश्य आहे. सॉक्रेटिस-प्लेटो, प्लेटो-अरिस्टॉटल किंवा हेगेल-मार्क्स या गुरू-शिष्यांच्या जोड्या समकालीन भारतात जन्माला आल्या असत्या, तर भारतीय विचारांना कुंठितावस्था प्राप्त झाली नसती. बाबासाहेब आणि दादासाहेब या गुरू-शिष्यांचे नाते या पाश्चात्त्य गुरू-शिष्यांच्या नात्याइतकेच मला विलोभनीय वाटते. बाबासाहेब उच्च विद्याविभूषित तर दादासाहेबांचे शिक्षण बेताचेच. बाबासाहेब राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा विचार करून दलित चळवळीचे डावपेच ठरवू पांहणारे एक महान नेते, तर दादासाहेबांना व्यवहारातील तातडीच्या प्रश्नांच्या तीव्रतेचे प्रतिबिंब दलित चळवळीत अविलंब उमटावे, अशी दुर्दम्य इच्छा. त्यामुळेच गुरूच्या ठिकाणी श्रद्धा ठेवूनही मतभेद नोंदविण्याचे सामर्थ्य दादासाहेबांना प्राप्त झालेले होते. भारतीय राजकारणात तेच नेते आपल्या नेतृत्वाचा ठसा आपल्या कालखंडावर उमटवून गेले; जे नित्य चिकित्सक शिष्यांच्या वर्तुळात वावरले आहेत. हितसंबंधी 'होयबा' अनुयायी आपल्या नेत्याला नेहमीच फसवीत असतात आणि अहंकार सुखावण्याच्या मोबदल्यात अहंकारी नेते अशा 'होयबां'कडून आपला राजकीय मृत्यू पत्करताना दिसतात. हा अहंकाराचा विजय असतो आणि अहंकारी माणसे सामान्यांच्या चळवळीला सम्यक नेतृत्व देऊ शकत नाहीत. बाबासाहेब अशा चिकित्सक शिष्यांच्या गर्दीत कार्यरत होते. म्हणून ते युगपुरुष ठरले."

## भूमिहीनांचे आंदोलन आणि कर्मवीर दादासाहेब

प्रत्येक नेत्याच्या आयुष्यात त्याला अनेक चळवळींत भागीदारी करावी लागते. असे असले तरी अशा अनेक प्रश्नांवरच्या विविध चळवळींपैकी कोणत्यातरी एका वैशिष्ट्यपूर्ण आंदोलनाशी या नेत्याचे नाव अभिन्नपणे जोडले जाते. ते एक ऐतिहासिक मूल्यमापन असते.

कर्मवीर दादासाहेबांचे नाते याच रीतीने भूमिहीनांच्या जमिनीसाठी केलेल्या देशव्यापी अशा सत्याग्रह आंदोलनाशी जोडले गेले आणि हे रास्तच आहे.

वास्तविक पाहता डॉ. आंबेडकरांच्या जीवनात त्यांनी जी जी आंदोलने केली, त्यांत कर्मवीर दादासाहेबांचा सतत सिंहाचा वाटा राहिला आहे. तथापि त्या आंदोलनांच्या वेळी डॉ. आंबेडकरांचे महावृक्षाच्या व्याप्तीचे उत्तुंग असे नेतृत्व होते. त्यामुळे इतर कुणाच्या नावाशी ती आंदोलने जोडली जाण्याचा प्रश्नच नव्हता.

आंबेडकरांच्या १९५६ साली झालेल्या निधनानंतर दलित नेतृत्वाखाली आजवर झालेल्या सर्व आंदोलनांत सर्वांत व्यापक आणि सर्वांत मोठे असे आंदोलन भूमिहीनांचे आंदोलन झाले. आणि त्याचे नेतृत्व निर्विवादपणे कर्मवीरांनी केले होते. या आंदोलनात प्रामुख्याने आणि मोठ्या प्रमाणात दलित भूमिहीन सहभागी झाला होता, हे खरे आहे. तथापि, या देशव्यापी आंदोलनात दलितेतर भूमिहीनसुद्धा सहभागी झाले होते; हे या आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य होते.

## इतर आंदोलनांच्या नेतृत्वातील सहभाग

डॉ. आंबेडकरांच्या हयातीत त्यांच्या नेतृत्वाखाली जी महत्त्वाची आंदोलने झाली, त्यांत महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, महाडच्या दोन परिषदा, काळाराम मंदिरप्रवेशाचा ६ वर्षे चाललेला सत्याग्रह आणि हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारण्याचे महाप्रचंड आंदोलन यांचा समावेश आहे.

या आंदोलनांतील कर्मवीर दादासाहेब यांच्या वैशिष्ट्यपूर्ण सहभागाचा विचार केला म्हणजे त्यांचे मोठेपण स्पष्ट होते. १९२७ साली महाडला अस्पृश्यांची परिषद झाली. तेव्हा चवदार तळ्यातून पाणी पिण्याच्या हक्काचाच प्रश्न न्यायप्रविष्ट होता. सवर्ण हिंदू आणि ब्रिटिश राज्यकर्ते या दोघांविरुद्ध एकाच वेळी संघर्ष करू नये. असा विचार पुढे आला. या आंदोलनाचा मित्रपक्ष असलेल्या ब्राह्मणेतर पक्षाचे मतसुद्धा न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत थांबावे असे होते. म्हणून खुद्द बाबासाहेबांनीच सत्याग्रह तहकुबीचा ठराव मांडला. या ठरावाला परिषदेतील बहुसंख्य उपस्थितांचा विरोध होता. वाटेल तो परिणाम भोगण्याची त्यांची तयारी होती. तशा निवेदनावर ३८८४ लोकांनी सह्या केल्या आणि सह्या करण्यासाठी आणखी प्रचंड रांग लागली.

ठरावाच्या विरोधी कर्मवीर दादासाहेब गायकवाडांनी भाषण केले आणि त्याला परिषदेने मोठ्या बहुसंख्येने पाठिंबा दिला. समाजाच्या भावना शब्दबद्ध करून समाजाला कृतिप्रवण करण्याचे कार्य समाजात सातत्याने कार्यरत असणारा कार्यकर्ताच करीत असतो. दादासाहेबांनी ते केले.

महाडच्या या अभूतपूर्व संग्रामात अनंतराव चित्रे, नानासाहेब टिपणीस, गंगाधर नीळकंठ, बापूसाहेब सहस्रबुद्धे, कॉ. रामचंद्र बाबाजी मोरे, सी. ना. शिवतरकर, बापूसाहेब राजभोज यांनी आणि इतर अनेकांनी सहभागी होऊन संघटन केले होते. तथापि आपल्या भावना शब्दबद्ध करून समाजाचे संघटन करून त्यांना संघर्षास प्रवृत्त करणारा नेता म्हणून कर्मवीरांची ख्याती या घटनेनंतर अस्पृश्य समाजात पसरली.

महाडच्या दुसऱ्या परिषदेत मनुस्मृती दहनाचा ठराव बापूसाहेब सहस्रबुद्धे यांनी मांडला होता आणि प्रत्यक्ष दहन त्यांच्या आणि स्पृश्य साधूंच्या हस्ते झाले होते.

## काळाराम मंदिर सत्याग्रह

मार्च १९३० पासून सुरू झालेला नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह तर दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखालीच झाला. ३० जणांच्या सत्याग्रह समितीचे सेक्रेटरी भाऊराव होते. हा सत्याग्रह सहा वर्षे चालला. भारताच्या आंदोलनाच्या इतिहासातील हा एक अपूर्व सत्याग्रह होता. रावसाहेब कसबे यांनी म्हटल्याप्रमाणे, "ही आपल्या कार्यकर्त्यांची आणि अनुयायांची एका अर्थाने बाबासाहेबांनी अग्निपरीक्षा घेतलेली दिसते. कोणत्याही चळवळीतील नेत्याला आपल्या चळवळीच्या सामर्थ्याचे आणि तिच्या मर्यादांचे सतत भान असावे लागते व हे भान आपल्या कार्यकर्त्यांना आणि अनुयायांनाही करून द्यावे लागते. प्रत्येक महान आंदोलनातील नेते या गोष्टी करीत असतात. दादासाहेबांनी हा लढा उणीपुरी सहा वर्षे लढविला. या लढ्यानेच त्यांच्या कर्तृत्वाची शौर्यगाथा इतिहासात नोंदवून ठेवलेली आहे. या अभूतपूर्व लढ्यासंबंधी डॉ. आंबेडकरांनी ३ मार्च १९३४ रोजी पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, "मी मुद्दामच पाच वर्षांपूर्वी सत्याग्रहाला संमती दिली होती. त्यामुळे अस्पृश्यांना हिंदू धर्माची वास्तव क़ल्पना येईल असे वाटले होते आणि हिंदू धर्मात आपले स्थान काय दर्जाचे आहे, हेही त्यांना कळेल, त्या दृष्टीने माझा हेतू साध्य झाला आहे. आता मला मंदिरप्रवेश चळवळीची मुळीच आवश्यकता वाटत नाही."

## दलित आंदोलनातील पुढचे पाऊल

चवदार तळ्याचे आंदोलन, काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह या महत्त्वाच्या दलित आंदोलनांत कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. या खेरीज डॉ. आंबेडकरांच्या हयातीत आणि नंतर झालेल्या सर्व आंदोलनांत त्यांनी अतिशय महत्त्वाची भागीदारी व नेतृत्व केले आहे.

तथापि, सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे कोणत्या एका आंदोलनामुळे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नाव अद्वितीय ठरत असेल तर ते भूमिहीनांचे आंदोलन आहे.

या आंदोलनातील प्रश्न आजही तेवढाच प्रस्तुत आणि महत्त्वाचा प्रश्न आहे. यामुळेही या आंदोलनाचे खास महत्त्व आहे.

कुत्र्या-मांजरांना आणि ढोर-डुकरांनासुद्धा जे पाणी पिण्याचा हक्क होता ते चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा हक्क याला प्रतीकात्मक महत्त्व होते. त्या हक्काने दलितांच्या भौतिक जीवनात फरक पडत नव्हता. काळाराम मंदिरात प्रवेशाचा हक्क मिळविणे हासुद्धा असा प्रतीकात्मक हक्क होता. या असल्या हक्काच्या उपयुक्ततेबरोबरच त्यांच्या मर्यादाही डॉ. आंबेडकर, भाऊराव गायकवाड इत्यादी सर्व नेत्यांना माहिती होत्या. तसे त्यांनी त्या वेळी आणि नंतरही वेळोवेळी स्पष्टपणे म्हटलेही आहे.

भूमिहीनांना जमीन मिळण्याचा प्रश्न मात्र या प्रश्नांपेक्षा वेगळा होता. ते एक पुढचे पाऊल होते. त्याचे महत्त्व वेगळे होते व आहे. या आंदोलनाचे तुलनात्मक महत्त्व रावसाहेब कसबे यांनी अचूकपणे सांगितले आहे. नाशिकचे ॲड. हरिभाऊ पगारे यांनी दादासाहेब गायकवाड यांचे लिहिलेले चरित्र १९८७ साली प्रसिद्ध झाले आहे. त्याच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, "आज उत्तर भारतातील आणि विशेषत: बिहारमधील ज्या घटनांच्या वार्तांनी मन अस्वस्थ होते, त्याचे मूळ या जमिनीच्या प्रश्नात आहे, याचे भान दादासाहेबांना तीस वर्षांपूर्वीच आलेले होते आणि त्यांनी त्या दृष्टीने प्रत्यक्ष चळवळही केलेली होती, याचे भान अद्याप आपल्याला येत नाही. माझ्या दृष्टीने दादासाहेबांनी या काळात दिलेला भूमिहीन शेतमजुरांचा लढा ही महाड आणि नाशिक सत्याग्रहाची पुढची पायरी होती. तो दलित चळवळीचा नैसर्गिक विकासक्रम होता. दलित चळवळीतील ते एक क्रांतिपर्व होते. ज्यातून स्वाभिमान शब्दात नव्हे तर प्रत्यक्षात मिळण्याची हमी होती आणि भूमिहीनातील जातीच्या बंधनांना प्रत्यक्ष चळवळीच्या क्रांतिकारी मशालीने अग्नी देण्याचे आश्वासन होते. याकडे दुर्लक्ष होता कामा नये."

## भूमिहीन शेतमजुरांचा देशव्यापी सत्याग्रह

भारतातील भूमिहीन शेतमजुरांत दलितांचे प्रमाण खूप मोठे आहे. या वस्तुस्थितीच्या आधारासाठी आकडेवारीची गरज नाही. हे सर्व भूमिहीन भारताच्या ग्रामीण भागात राहतात आणि त्यांच्यात निरक्षरांचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त आहे.

या वास्तवामुळे जमिनीच्या फेरवाटपाचा प्रश्न हा दलित भूमिहीनांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. नोकऱ्या मिळून दलितांच्या उपजीविकेचा प्रश्न सुटू शकेल एवढ्या नोकऱ्यांची उपलब्धता पूर्वीही नव्हती आणि आजही नाही. आता तर राज्यकर्त्यांनी जी अर्थव्यवस्था स्वीकारली आहे, त्यामुळे असलेल्याच नोकऱ्या कमी

होत आहेत; आणखी होणार आहेत. कारखाने बंद पडत आहेत. खाजगीकरण वाढत आहे. आधुनिकीकरण वाढत आहे. शंभर कामगारांचे काम दहा कामगार करू शकतील, असे आधुनिकीकरण आले आहे. येत आहे. 'जॉबलेस ग्रोथ': 'विना रोजगार विकास' हे घोषवाक्य बनत आहे. ज्यांना रोजगार मिळणार नाही, त्यांच्या विकासाचा प्रश्न कुणी उपस्थितसुद्धा करीत नाही. मग त्या प्रश्नाच्या सोडवणुकीची बाब फारच दूर राहिली. दलित-ग्रामीण-भूमिहीन-अल्पशिक्षित यांचा व्यापार-व्यवसायाशी फारसा संबंध कधीच नव्हता. आता तर परदेशी व्यापार-व्यावसायिक देशात येत आहेत. त्यामुळे तो मार्गही भूमिहीनांना उपलब्ध नाही. औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण व्यावसायिक, कारू-नारू, बारा बलुतेदार कधीच त्यांचे व्यवसाय गमावून बसले आहेत.

या नव्या अर्थव्यवस्थेच्या वातावरणात भूमिहीनांना जमीन मिळण्याचा प्रश्न अधिकच महत्त्वाचा बनत आहे.

परंतु दलित आंदोलने जमिनीच्या फेरवाटपाचा, नोकऱ्यांच्या उपलब्धतेचा, घटत्या रोजगाराचा प्रश्न न मांडता आणि त्यासाठी संघर्ष न करता प्रतिकारात्मक, भावनात्मक प्रश्नात अडकून बसली आहेत. दलितांतील उच्चशिक्षित, नोकरदार, बुद्धिजीवी हे त्यांचे स्वत:चेच प्रश्न मांडत आहेत. वेतनाचा आणि त्यात वाढ मिळविण्याचा प्रश्न, बढतीचा प्रश्न, बदलीचा प्रश्न हेच प्रश्न ते मांडत आहेत. त्यांचे प्रश्न आहेत, ते बरोबर आहेत. त्यासाठी त्यांचे संघर्षही योग्यच आहेत. तथापि मुद्दा तो नाही.

प्रचंड बहुसंख्येच्या रोजगारहीन, भूमिहीन दलितांच्या प्रश्नांना वाचा कोण फोडणार? असा प्रश्न आहे.

## कर्मवीरांची दूरदृष्टी – जमिनीसाठी संघर्ष

भूमिहीनांना जमिनी मिळाल्या पाहिजेत या मागणीसाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झालेला अखिल भारतीय संग्राम हा त्यांच्या दूरदृष्टीचा पुरावा आहे. शहरी, सुशिक्षित, उच्च विद्याविभूषित दलित नेतृत्व आणि दादासाहेब गायकवाड यांच्या दृष्टिकोनातील अंतर जे कुणी दुर्लक्षित करतील; त्यांना दादासाहेब तर नीट समजणार नाहीतच; परंतु बदलत्या वास्तवातील दलितांचे खरे प्रश्नही समजणार नाहीत.

डॉ. आंबेडकरांना आपला समाज हा खेडोपाडी असलेला अक्षरहीन, भूमिहीन समाज आहे याचे भान होते. उच्च विद्याविभूषित असूनही दूर डोंगरकपारीतल्या दलितांच्या दु:खाची जाणीव आणि बोचणी त्यांना होती.

मृत्यूपूर्वी ४ वर्षे, १९५२ साली, डॉ. आंबेडकरांनी कर्मवीर गायकवाडांना एक पत्र लिहिले. या पत्रात ते म्हणतात, "माझ्याशिवाय कुणालाही आपल्या लोकांची स्थिती किती हलाखीची आहे हे माहीत नाही..." या विधानातील 'कुणालाही' ही शब्दयोजना केवळ इतर राजकीय पक्षांच्या नेतृत्वाबाबत योजलेली आहे, असा मर्यादित अर्थ लावणे चूक आहे. दलित नेतृत्वात झिरपत येत असलेले 'ब्राह्मण्य' डॉ. आंबेडकरांना माहीत होते व बोचत होते. त्यांनी वेळोवेळी आणि ठिकठिकाणी त्याचा उल्लेख केलेला आहे.

दादासाहेब गायकवाड त्यांच्या इतर समकालीन दलित नेत्यांच्या तुलनेत कमी शिकलेले होते. विद्वान समजत आलेल्या नेत्यांपेक्षा वेगळे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना स्वत:च्या मृत्यूची चाहूल १९५२ सालीच लागली असावी असे वाटते. त्यांनी तसे स्पष्टपणे १९५२ साली कर्मवीर गायकवाडांना पत्र पाठवून कळविले होते आणि आपल्या मागे कर्मवीरांनी "....सार्‍या जबाबदार्‍या स्वत: स्वीकाराव्यात" असे सांगितले होते.

आपल्या मागे दलित समाजाचे नेतृत्व कोण करू शकेल आणि कुणी करावे हे जे मत डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे नोंदवले आहे, यात त्यांच्या 'माणूसपारखी' चाणाक्षपणाची खूण स्पष्ट दिसते आणि दादासाहेबांचे श्रेष्ठत्व दिसते.

डॉ. आंबेडकर आणि कर्मवीर गायकवाड यांच्या एकमेकांस पूरक कार्यविभागणीबाबत आणि वेगळेपणाबाबत श्री. वि. द. घाटे यांनी म्हणून ठेवले आहे की, "....बाबासाहेब प्रखर बुद्धिवादी, आपल्या प्रचंड ग्रंथालयात ज्ञानोपासना करण्यात त्यांना खरे सुख मिळत असे. भाऊरावांसारखा कर्तबगार शिष्य त्यांना मिळाला नसता तर डॉ. बाबासाहेबांचे विचार, त्यांची स्वप्ने कदाचित त्या राजगृहातील ग्रंथालयातच राहिली असती..."

लक्षावधींचा समाज जेव्हा एखादा विचार स्वीकारतो तेव्हा तो विचार हीच एक प्रचंड भौतिक शक्ती बनते आणि ही शक्ती समाजात बदल घडवून आणते. एरवी ग्रंथातील किंवा कुणाच्या तरी डोक्यातील विचार वांझोटे असतात. डॉ. आंबेडकरांचा विचार लक्षावधींनी स्वीकारला. लक्षावधींच्या, विशेषत: अल्पशिक्षित ग्रामीण दलितांच्या, या विचार-स्वीकाराला कारणीभूत ठरलेल्या व्यक्तीत खुद्द डॉ. आंबेडकरांखालोखाल कर्मवीर गायकवाड यांचे योगदान निश्चितच अनन्यसाधारण आहे.

### जमिनीसाठी संघर्ष-व्याप्ती

भूमिहीनांचा संघर्ष हा भारतातील दलित चळवळीचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न

आहे, हे त्या आंदोलनातील व्याप्तीने सिद्ध केले. सिद्धान्ताची, धोरणांची आणि विचारांची खरी कसोटी ही प्रत्यक्ष व्यवहारात दिसते.

भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात या मागणीसाठी सुरू झालेला सत्याग्रह मराठवाड्यात सुरू झाला आणि ते स्वाभाविक होते. कर्मवीर गायकवाडांचे नेतृत्व अखिल भारतीय होते हे खरे असले, तरी त्यांचे कार्यक्षेत्र मुख्यत: महाराष्ट्र होते आणि या महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक विभागांपैकी मराठवाड्यात जमीनदारी सर्वात अधिक होती. भूमिहीनांची संख्या आणि प्रमाणसुद्धा मराठवाड्यात अधिक आहे. या वस्तुस्थितीमुळे भूमिहीनांचा सत्याग्रह मराठवाड्यात सुरू होणे स्वाभाविक होते. मराठवाड्यातील दलित नेतृत्वास याचे भान होते. हे भान महाराष्ट्रातील आणि देशातील दलित नेतृत्वास आणून देण्याचे कार्य, या नेतृत्वाने केले होते. अशा नेतृत्वात श्री. बी. एस. मोरे हे एक होते. त्यांनी हा प्रश्न बाबासाहेबांच्या हयातीतच त्यांच्या व इतरांसमोर मांडला होता. बाबासाहेबांनासुद्धा या प्रश्नाचे महत्त्व समजले होते. त्यांनी या प्रश्नावर आंदोलन केले पाहिजे, अशी मते व्यक्त केली होती.

भूमिहीनांचे हे आंदोलन मराठवाड्यात सुरू होणे, जसे स्वाभाविक होते, तसेच या संघर्षाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी करणेही स्वाभाविकच होते. ग्रामीण भागातील दलितांच्या खऱ्या प्रश्नांची जाणीव त्यांनाच होती. दलित आंदोलनातील टाय, पँटधारी उच्च विद्याविभूषित नेत्यांनी आणि त्यातही मुख्यत: बी. सी. कांबळे यांनी, त्यांची 'धोतऱ्या' म्हणून टिंगलटवाळी केली होती; परंतु ग्रामीण दलितांना आणि सुज्ञ शहरी दलितांनासुद्धा हा 'धोतऱ्या'च डॉ. आंबेडकरांनंतर आपला नेता आहे, याचे भान होते.

सरकारजवळील पडीक जमीन भूमिहीनांना कसण्यास मिळावी या मागणीसाठी १९५८-५९ साली हा सत्याग्रह मराठवाड्यात सुरू झाला. महाराष्ट्राच्या इतर भागांतही हे आंदोलन सुरू झाले. नाशिक व धुळे जिल्ह्यांत त्याचा जोर अधिक होता. आंदोलनाच्या तयारीसाठी कर्मवीर गायकवाडांसोबत क्रांतिसिंह कॉम्रेड नाना पाटील यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी सभा घेतल्या होत्या. कर्मवीर गायकवाड आणि मराठवाडा पक्षाचे अध्यक्ष श्री. बी. एस. मोरे यांना या आंदोलनात ४-४ महिन्यांची शिक्षा झाली आणि त्यांना औरंगाबाद येथील तुरुंगात ठेवण्यात आले. औरंगाबाद येथील जेलमध्ये एका वेळी ३००० सत्याग्रही होते. तो जेल अपुरा पडू लागला म्हणून मग पैठण जेलमध्ये ठेवण्यात येऊ लागले.

त्या सत्याग्रहात पुरुषांबरोबर महिलाही सहभागी होत्या. तान्हा मुलांसह अनेक स्त्रिया तुरुंगात गेल्या. रिपब्लिकन पक्ष कार्यकर्त्यांबरोबर कम्युनिस्टही त्या सत्याग्रह

आंदोलनात सहभागी होते. मनमाडच्या कम्युनिस्ट कार्यकर्त्या कॉम्रेड कुसुमताई माधवराव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मनमाडच्या ७०-८० महिलांना २० दिवसांची तुरुंगवासाची शिक्षाही झाली होती. कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय कौन्सिलचे आजचे सदस्य कॉ. मनोहर टाकसाळ, कॉ. एकनाथ नलावडे, सिल्लोडचे कॉ. करिमोद्दिन, देवगाव रंगारीचे कॉ. तुळशीराम पाटील इत्यादी अनेक कम्युनिस्टांनी या आंदोलनात भाग घेतला होता. प्रसिद्ध कम्युनिस्ट नेते कॉम्रेड चंद्रगुप्त चौधरी या आंदोलनाचे एक प्रमुख संघटक होते. त्या सत्याग्रहात सहभागी होणाऱ्यांत ज्याप्रमाणे दलित होते, तसेच भूमिहीन सवर्णही त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढले. आरक्षणाच्या प्रश्नांवरील आंदोलनात दलित-सवर्ण जूट घडवून आणणे आवश्यक व योग्य असले तरी जिकिरीचे आहे. भूमिहीनांना जमीन मिळविण्याचा आंदोलनात ते सुलभ आणि स्वाभाविकही आहे.

## देशव्यापी आंदोलन

महाराष्ट्रात सुरू झालेले भूमिहीनांचे आंदोलन नंतर देशव्यापी करण्यात आले. कर्मवीर गायकवाड, एन. शिवराज, बॅ. खोब्रागडे इत्यादी नेत्यांनी देशभर दौरे करून प्रथम जागृती केली. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक या राज्यांत दौरे झाले.

२१ ऑक्टोबर १९६४ रोजी पार्लमेंटवर मोर्चा निघाला. त्यात देशभरातून १ लाख भूमिहीन सहभागी झाले होते. या प्रचंड मोर्च्याचे नेतृत्व कर्मवीर गायकवाड यांनी केले. नेतृत्व करणाऱ्यांत तेव्हाचे रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष एन. शिवराज होते. बॅ. खोब्रागडे होत, खासदार कट्टी होते. या मोर्च्याने आपल्या १० मागण्या पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना सादर केल्या. भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात, किमान वेतन कायदा लागू करावा, पार्लमेंटमध्ये डॉ. आंबेडकरांचे तैलचित्र लावावे, नवबौद्धांना शैक्षणिक सवलती मिळाव्यात इत्यादी मागण्या त्यात होत्या. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी सर्व मागण्यांबाबत विचार करण्याचे स्पष्ट आश्वासन दिले. तरीसुद्धा पंतप्रधानांचे आश्वासन प्रत्यक्षात घेण्याची शक्यता नाही, हे समजून ६ डिसेंबर १९६४ रोजी प्रत्यक्ष सत्याग्रह सुरू करणार असे घोषित करण्यात आले.

१ ऑक्टोबर १९६४ रोजी पक्षाध्यक्ष एन. शिवराज यांचे निधन झाले. तरीही ६ डिसेंबरचे देशव्यापी सत्याग्रह आंदोलन करण्याचे ठरले आणि तसे ते सुरू झाले.

भूमिहीनांच्या या आंदोलनाची व्याप्ती खूपच मोठी होती. दोन महिन्यांत देशभरातील ३ लाख ४० हजार भूमिहीनांनी तुरुंगवास पत्करला. त्यात पुरुषांबरोबर

स्त्रिया होत्या. तरुणांबरोबर म्हातारे होते. दलितांबरोबर सवर्ण होते. हा सत्याग्रह निर्धारपूर्वक तरीही शांततेत पार पडला.

कर्मवीर दादासाहेब गायकवाडांच्या घरी पत्रकार श्री. हरिभाऊ पगारे यांनी एक आठवण नोंदली आहे.

"...या प्रचंड सत्याग्रहींची संख्या ऐकून लालबहादूर शास्त्री दादासाहेबांना म्हणाले होते, अरे यार, आप छुपे रुस्तम निकले। हम समझें, दस-बीस हजार आदमी जेल में जायेंगे । आपने तो कमाल कर दी।"

भूमिहीनांची जमिनीची भूक किती व्याप्तीची आहे, याचे भान फार थोड्यांना होते, आजही ते फार थोड्यांना आहे.

भूमिहीनांची जमिनीसाठी आंदोलने या आंदोलनाअगोदर आणि नंतरही झाली आहेत. या प्रत्येक आंदोलनाचे आपापले महत्त्व आहे. अजूनही या मागणीतील आंदोलनाची क्षमता प्रचंड आहे. सरकारी पडीक जमीन, जंगलातील लागवडीलायक वृक्षहीन जमीन, गायरानाच्या जमिनी आणि त्याचबरोबर जमीनदारांनी आणि ग्रामीण धनिकांनी कमाल मर्यादेसंबंधी कायदे असूनही अनेक गैरप्रकार करून दाबून ठेवलेल्या जमिनी, याच कायद्याप्रमाणे जादा किंवा वरकड ठरलेली, परंतु अजूनही भूमिहीनांना न दिलेली जमीन अशा जमिनींची बेरीज खूप मोठी आहे. या जमिनी कसून देशांच्या संपत्तीत भर घालू शकणारे आणि स्वतःचे जीवनमान उंचावू शकणारे लक्षावधी भूमिहीन आहेत. या प्रश्नांची व्याप्ती व उपयुक्तता प्रचंड आहे.

परंतु दलित चळवळीच नव्हे, तर जवळ जवळ सर्वच पुरोगामी व डाव्या चळवळींनी या प्रश्नाकडे लक्ष दिलेले नाही. अपवाद आहेत नाही असे नाही; परंतु अपवादच आहेत.

सर्वच पुरोगामी डाव्या चळवळींच्या वा संघटनांच्या नेतृत्वातील शहरी नेत्यांच्या वर्चस्वाचा तो परिणाम असावा.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड, क्रांतिसिंह नाना पाटील, गोदूताई परुळेकर यांच्यासारख्या ग्रामीण, गरिबांसाठी संघर्ष करू शकणाऱ्या नेतृत्वाची आजही गरज आहे.

## दादासाहेब गायकवाड, दलित चळवळ आणि कम्युनिस्ट

कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची इतर काही दलित नेत्यांनी 'धोतऱ्या' म्हणून जशी टिंगलटवाळी केली होती, तशीच त्यांच्यावर आणखी एक टीका होती. 'गायकवाड हे कम्युनिस्टांच्या हातातले बाहुले आहे.' 'सत्याग्रहाचे तंत्र हे

कम्युनिस्टांचे तंत्र आहे.' इत्यादी टीका पुन्हा त्यांना 'धोतऱ्या' म्हणून हिणवणाऱ्या श्री. बी. सी. कांबळे यांचीच मुख्यत: होती. हेटाळणीची रीत याही टीकेबाबत अवलंबविली गेली होती. दादासाहेबांना उद्देशून 'नार म्हातारपणी फसली, लालजीच्या नादी लागली' असे म्हटले गेले.

वास्तविक पाहता, दलित चळवळ आणि कम्युनिस्ट चळवळ यांचे संबंध बंधुभावाचे असायला हवेत. दोन्ही चळवळी ज्या समाज विभागांच्या हितसंबंधांसाठी आंदोलने करतात ते समाज विभाग एकच आहेत. अग्रक्रमासंबंधीच्या व्यूहरचनेबाबत मतभिन्नता अर्थातच आहेत. आर्थिक विषमतेविरुद्धची आंदोलने आणि सामाजिक विषमतेविरुद्धची आंदोलने यात अग्रक्रम काय असावा; दोन्ही आंदोलनांचे परस्पर संबंध कसे असावेत; ही आंदोलने कोणत्या मार्गांनी चालवावीत; घटनात्मक किंवा कायदेशीर मार्गाची आंदोलने आणि त्या बाहेरील आंदोलने यांचा ताळमेळ कसा घालावा; हिंसा आणि अहिंसा यांचा प्रश्न, बुद्धाचा मार्ग आणि कार्ल मार्क्स यांचा मार्ग, असे मतभिन्नतेचे मुद्दे आहेतच; परंतु ज्यांच्या हितसंबंधांसाठी ही दोन्ही आंदोलने आहेत ते समाज विभाग एक आहेत. या दोन्ही आंदोलनांच्या हितसंबंधात विरोध तर मुळीच नाही. ही दोन्ही आंदोलने इतिहासात अनेकदा एकत्र आलीही आहेत. डॉ. आंबेडकरांच्या काळात ती जशी आली आहेत तशी त्यानंतरच्या काळातही एकत्र आली आहेत.

## आंबेडकर-कम्युनिस्ट, कार्ल मार्क्स-बुद्ध

आंबेडकर व कम्युनिस्ट तसेच कार्ल मार्क्स व गौतम बुद्ध हा म्हणजे खूपच मोठा, स्वतंत्र आणि बऱ्याच काळजीपूर्वक हाताळण्याचा विषय आहे. ते करणे इथे शक्य नाही.

तथापि डॉ. आंबेडकर आणि कम्युनिस्ट यांच्या विचारसरणी या एकमेकांच्या पूर्णपणे विरुद्ध आहेत. त्यांच्यात समान असे काहीच नाही. अशी मांडणी काही मंडळी सतत करीत असतात, तसेच डॉ. आंबेडकर, त्यांचे पक्ष, त्यांचे अनुयायी आणि कम्युनिस्ट यांनी सतत एकमेकांना विरुद्ध असाच व्यवहार केला आहे. तसाच तो करीत राहिला पाहिजे, असेही काही मंडळी मांडतात.

अशी मांडणी करणाऱ्यांत संकुचित पंथवादी आणि हितसंबंधी मंडळींचा भरणा मोठा आहे. तसेच तपशिलात न जाणाऱ्या आणि स्थळ-काळ सापेक्षतेने विचार न करणाऱ्या उथळ मंडळींचाही समावेश आहे.

कर्मवीर दादासाहेय गायकवाड यांच्यावर कम्युनिस्ट-धार्जिणेपणाचा आरोप वारंवार करण्यात आलेला आहे, म्हणून काही नोंदी आवश्यक ठरतात.

'बुद्ध की मार्क्स' असा डॉ. आंबेडकरांचा एक निबंध प्रसिद्ध आहे. अभ्यासकांनी तो मुळातूनच वाचावा. इथे या दोन थोर महापुरुषांच्या विचारसरणीतील डॉ. आंबेडकरांनी स्वत: नोंदविलेली साम्यस्थळे फक्त नोंदविली आहेत.

१. तत्त्वज्ञानाचे कार्य, जगाच्या उत्पत्तीच्या कारणांचे खुलासे देण्यात व्यर्थ वेळ खर्च करण्याचे नाही, तर जगाची पुनर्रचना करण्याचे आहे.

२. समाजात दोन वर्ग असतात. या दोन वर्गांचे हितसंबंध एकमेकांविरुद्ध असतात आणि त्यांचा एकमेकांशी संघर्ष असतो.

तसेच 'सर्व दु:खाचे कारण ही वर्ग विभागणी आहे' या मुद्यासंबंधीचे एकमत स्पष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी बुद्धाच्या 'अष्टांग' मार्गाचा उल्लेख केला आहे. बुद्धाने 'दु:ख' असा शब्द वापरला. कार्ल मार्क्सने 'शोषण' असा शब्द वापरला. डॉ.आंबेडकर म्हणतात, '...दु:खाच्या ठिकाणी शोषण असा शब्द वापरला की बुद्ध मार्क्सपासून दूर नाही...'

३. 'खाजगी मालमत्तेमुळे समाजातला एक वर्ग सामर्थ्यवान, शक्तिमान बनतो आणि शोषणामुळे दुसरा वर्ग दु:खी बनतो.'

एकमताच्या मुद्द्यावर डॉ. आंबेडकरांनी तथागत गौतम बुद्ध आणि त्यांचा सत्‌शिष्य आनंद यांच्यामधील संवादच सदर निबंधात देऊन एकमत स्पष्ट केले आहे.

४. चांगल्या समाज व्यवस्थेकरिता खासगी मालमत्ता नष्ट करून दु:ख दूर केले पाहिजे.

एकमताच्या या मुद्द्याबाबत कोणत्याच पुराव्याची गरज नाही. भिख्खू संघाचे नियम या बाबतीत जास्त कडक आहेत, अशी नोंद डॉ. आंबेडकरांनी केली आहे.

अर्थात गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान आणि कार्ल मार्क्स यांचे तत्त्वज्ञान या दोन्ही तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेल्या महापंडित राहुल सांस्कृत्यायन यांच्यासारख्या तत्त्वचिंतकाने यापेक्षा वेगळ्या शब्दांत आणि काही वेगळी अशी आपली मते नोंदवून ठेवलेली आहेत; परंतु या ठिकाणी तो व्यापक प्रश्न नाही. एकमताचे मुद्दे सांगताना डॉ. आंबेडकरांनी खाजगी संपत्ती (प्रायव्हेट प्रॉपर्टी) अशी शब्दयोजना केली आहे. कार्ल मार्क्सची शब्दयोजना 'उत्पादनसाधनांनी खाजगी मालकी' (प्रायव्हेट ओनरशीप ऑफ मीन्स ऑफ प्रॉडक्शन) अशी आहे.

याच निबंधात कार्ल मार्क्स आणि बुद्ध यांच्या विचारांतील फरकही नोंदण्यात आला आहे. तो मुख्यत: मार्गासंबंधी आहे. मार्क्सने 'हिंसेचा मार्ग' सांगितला आहे

तर गौतम बुद्धाने 'अहिंसेचा मार्ग' सांगितला आहे. अशी त्या नोंदीची ढोबळ मांडणी करता येईल. अर्थात हिंसा-अहिंसा यासंबंधी याच निबंधात त्यांनी खालील नोंदीही केल्या आहेत :

'कदाचित गौतम बुद्धाने 'साध्याच्या' आधारे 'साधनाचे' समर्थन मान्य केले असते.

'दुसरा मार्गच उरला नसेल तर संपत्तीच्या मालकांविरुद्ध बळाचा वापर, हे योग्यच साधन आहे, असे गौतम बुद्ध म्हणाले असते..'

डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत'च्या २७ सप्टेंबर १९२९ च्या अंकात 'आधी कळस मग पाया' या शीर्षकाचा एक लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी कम्युनिस्ट विचारसरणी आणि भारतीय कम्युनिस्टांचा व्यवहार असा फरक करूनही काही मते व्यक्त केली आहेत. अभ्यासकांनी हा लेखही मुळातूनच वाचावा. त्यातील काही वाक्ये अशी :

'जातिभेद व अस्पृश्यता ही कम्युनिझमच्या मूलतत्त्वांना अगदी सोडून आहे. लेनिन हिंदुस्थानात जन्मला असता तर प्रथम त्याने जातिभेद व अस्पृश्यता यांना साफ गाडून टाकले असते व तसे केल्याखेरीज क्रांतीची कल्पना त्याने मनातही आणली नसती...'

कम्युनिझमचे तत्त्वज्ञान हे जातिभेदाविरुद्ध आहे, याची स्पष्ट नोंद डॉ. आंबेडकरांनी केली आहे. तत्त्वज्ञानाची भूमिका तर त्यांनी स्पष्टपणे नोंदविली आहे.

भारतीय कम्युनिस्टांच्या या बाबतीतल्या व्यवहारासंबंधी त्यांची टीकाही त्यांनी नोंदविली आहे.

'...रशियाप्रमाणे हिंदुस्थान सोविएत राज्यव्यवस्था चालू झाली म्हणजे आपोआप जातिभेद नाहीसा होईल, यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणे परिणाम होऊन सामाजिक विषमता आपोआप अदृश्य होईल, असे हिंदी कम्युनिस्टांना वाटते काय?...'

डॉ. आंबेडकरांचे हे विधान प्रश्नार्थक आहे. तथापि त्याचा सूर हिंदी कम्युनिस्टांना तसे वाटत आहे, असा दिसतो.

१९२५ साली स्थापना झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या या बाबतीतील मतासंबंधी उण्यापुऱ्या ४ वर्षांतील डॉ. आंबेडकरांचे हे लिखाण आहे. १९२९ पूर्वीच्या कम्युनिस्टांच्या कोणत्याही लिखाणात किंवा ठरावात असा सूर निघाला, असल्याचे माझ्या तरी वाचनात नाही. तथापि ते गौण आहे.

क्रांतीनंतर 'सामाजिक समता' आपोआप निर्माण होईल, असा माझा समज नाही. कुणी कम्युनिस्ट विचारवंतांनी असा समज लिहून ठेवण्याचे माझ्या वाचनात नाही. कुठल्याही ठरावात अशी नोंद मला आढळत नाही. असा 'आपोआपवाद' किंवा 'आपसूकवाद' जे कुणी कम्युनिस्ट मांडत असतील, त्यांनी त्यांचा मार्क्सवाद पुन्हा वाचावा.

'पाया आणि इमला' या उपमेने व्यक्त झालेली आर्थिक समता आणि सामाजिक समता किंवा 'आर्थिक पाया' आणि 'सामाजिक इमला' या संबंधीचे कार्ल मार्क्स व फ्रेड्रिक एंगल्स यांचे लिखाण पुन्हा वाचावे. मूळ सिद्धान्तात असा 'आपसूकवाद' बिलकूल नाही.

याच लेखात डॉ. आंबेडकरांनी एक सूचक विधान केले आहे ते असे : 'थोडक्यात सांगावयाचे म्हणजे या देशातील कामगारांना व शेतकऱ्यांना कम्युनिस्टांची तत्त्वे आज तरी (१९२९ साली) रुचणे व पचणे शक्य नाही. कम्युनिस्टांचा आदर्श समाज अस्तित्वात यायला बहुजन समाजाची जी मनोभूमिका तयार झाली पाहिजे, ती मुळीच तयार झालेली नाही...'

ही मनोभूमिका १९२९ साली तयार झालेली नव्हती हे बरोबरच आहे. आजही वेगळ्या कारणांसाठी हे विधान करता येईल.

मुख्य मुद्दा आंबेडकरांचे विचार आणि कम्युनिस्ट विचारसरणी यांत, या बाबतीतही विरोध नाही, हा आहे.

१९२९च्या या नोंदीबरोबरच या बाबतीत आणखी एक नोंद आवश्यक आहे. ती डॉ. आंबेडकरांच्या निधनापूर्वी चार वर्षे अगोदरची, १९५२ सालची आहे. हरिभाऊ पगारे यांनी ती नोंद कर्मवीर गायकवाडांच्या चरित्रात केली आहे. १९५२ सालच्या निवडणुकानंतर काहीशा निराशेच्या वातावरणात त्यांनी कर्मवीर गायकवाडांना एक पत्र लिहिले आहे. त्या पत्रात ते लिहितात, '...मला फेडरेशनमधून बाहेर पडावेसे वाटते, एवढेच नव्हे तर राजकारणातून आता पूर्णत: निवृत्त व्हावेसे वाटते. ते ऐवढे सोपे नाही, हे मला माहीत आहे. तरीही माझे राजकीय तत्त्वज्ञान आपल्या लोकांचे अगदी त्वरित कल्याण साधू शकेल, असे मला वाटत नाही. माझ्याशिवाय कुणालाही आपल्या लोकांना किती हलाखीची स्थिती आहे, हे माहीत नाही. तेव्हा त्यांचे कल्याण साधण्यासाठी त्यांनी तरी आणखी किती दिवस वाट पाहावी? कम्युनिस्ट पार्टीत जावे, असे माझे मत होत चालले आहे.'

त्यातून कमीतकमी अर्थ काढायचा तर हे नक्कीच म्हणता येते की, डॉ. आंबेडकर तेव्हा स्वत:च्या 'राजकीय तत्त्वज्ञाना'खालोखाल 'कम्युनिस्ट' तत्त्वज्ञान मानत होते. विरोधी तर नक्कीच नव्हते.

१९५२ सालच्या निवडणुकांत मुंबई शहरातून डॉ. आंबेडकर राखीव जागेवर लोकसभेसाठी उभे होते. संयुक्त मतदारसंघ होता. त्याच्या अगोदरच्या मुंबईच्या युद्धविरोधी संपात डॉ. आंबेडकर आणि कम्युनिस्ट यांनी एकत्र काम केले होते. डॉ. आंबेडकरांनी कम्युनिस्ट पक्षाशी युती करून निवडणुका लढवाव्यात, असे कम्युनिस्ट पक्षाने आवाहन केले होते. प्रयत्न केले होते. तथापि रिपब्लिकन पक्षाने तेव्हाच्या प्रजा समाजवादी पक्षाशी युती करून शीतयुद्ध लढविले. डॉ. आंबेडकर आणि प्र. सो. पा. एकत्रपणे कॉ. डांगे यांच्याविरुद्ध लढत होते. अशा स्थितीत कॉ. डांगे यांनी आंबेडकरांना पाडले, असा जो आरोप घेतला जातो, तो रास्त नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्क्सवादी नव्हते किंवा कर्मवीर दादासाहेब गायकवाड कम्युनिस्ट नव्हते, हे स्पष्टच आहे. बुद्ध आणि मार्क्स यांची तत्त्वज्ञाने किंवा विचारसरणी एक नव्हती, हेही स्पष्टच आहे. तथापि मुद्दा तो नाही. डॉ. आंबेडकर मार्क्सवादाच्या 'विरोधी' होते की कसे आणि आंबेडकरांची विचारसरणी आणि मार्क्सवाद यांत काही साम्य होते की नाही, हा मुद्दा आहे. या साम्याच्या आधारे आंबेडकरांचे अनुयायी आणि मार्क्सवादी विचारांचे अनुयायी यांचे अनेक सामाजिक/राजकीय व्यवहार एकत्र होऊ शकतात की नाही, हा मुद्दा आहे. सर्वच राजकीय/सामाजिक व्यवहार एकत्र होऊ शकणार नाहीत, हेही स्पष्ट आहे.

संकुचित पंथवादी विचार न करता मार्क्सच्या अनुयायांची आणि आंबेडकर व बुद्धाच्या अनुयायांनी आपल्या देशातील राजकीय/सामाजिक व्यवहार एकत्र करण्याची गरज सतत होती. आज ती जास्तच आहे. अर्थात असे प्रयत्न दोन्ही बाजूंनी व्हायला हवेत.

## एकत्र व्यवहार

इतिहासकाळात आणि चालू काळातही दलित चळवळ आणि कम्युनिस्ट चळवळ यांनी एकत्र काम केले होते व करीत आहेत. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात कम्युनिस्ट पक्षाचे एक नेते कॉम्रेड आर. बी. मोरे सहभागी होते. १९३८ साली मुंबईच्या गिरणीकामगारांचा संप लढवण्यात कम्युनिस्टांबरोबर डॉ. आंबेडकरांचाही सहभाग होता.

१९५७ ते १९६० या काळात महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचे जे अपूर्व आंदोलन झाले, त्यात रिपब्लिकन पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष सहभागी होते. १९५७च्या निवडणुका त्यांनी एकत्र लढवल्या आणि या निवडणुकीत महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाचे जितके खासदार व आमदार निवडून आले तितके त्यापूर्वी आणि नंतरसुद्धा केव्हाही निवडून आले नाहीत. १९५७च्या निवडणुकांत रिपब्लिकन पक्षाचे

९ खासदार निवडून आले. संसदेत रिपब्लिकन् पक्षाच्या खासदारांचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाडांकडे होते. त्यांची लोकसभेतील कारकीर्दही लक्षणीय होती.

१९५८-५९ साली महाराष्ट्रात सुरू झालेल्या आणि नंतर देशभर पसरलेल्या भूमिहीनांच्या आंदोलनातील आंबेडकर-अनुयायी आणि मार्क्सचे अनुयायी यांचे सहकार्य व सहभाग याचा उल्लेख वर आला आहे.

आजच्या काळातील प्रस्तुतता लक्षात घेता या सहकाऱ्यांचे आणि सहभागाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. रिपब्लिकन पक्षाचे आणि मार्क्सच्या अनुयायांचे अनेक तुकडे होऊन ही दोन्ही आंदोलने आज पूर्वीइतकीसुद्धा परिणामकारक राहिलेली नाहीत, हे वास्तव आहे. समान प्रश्नांवर, समान भूमिकांवर राजकीय/सामाजिक व्यवहार एकजुटीने करून एकेका विभागाच्या आणि दोन्ही विभागांच्या जुटीला चालना मिळू शकते. याचा विचार व्हायला हवा.

आज देशात मार्क्सच्या आणि आंबेडकरांच्या विचारांत पूर्णपणे विरोधी असलेल्या आणि विषमतेवर आधारलेल्या धर्माचा आश्रय घेऊन व वापर करून प्रतिगाम्यांनी सत्ता बळकावली आहे. गुजरात राज्यात शासनसत्ता बळकावलेल्या फॅसिस्ट प्रवृत्तीच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सत्तेच्या साह्याने अल्पसंख्याकांचे हत्याकांड घडविले आणि एक दहशत निर्माण केली. ही हुकूमशाही प्रवृत्ती केवळ भारताच्या धर्मनिरपेक्षतेलाच नव्हे, तर लोकशाहीलासुद्धा धोका निर्माण करीत आहे.

धर्मनिरपेक्षतेचे रक्षण, लोकशाही रक्षण, सामाजिक व आर्थिक विषमता वाढविणाऱ्या धोरणांना विरोध, नव्या आर्थिक धोरणांना विरोध या मुद्द्यांवर आज व्यापक जुटीची आंदोलने उभी राहू शकतात.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड आज हयात असते तर त्यांनी या मुद्द्यावर संघर्ष संघटित करण्यात पुढाकार घेतला असता. अशा संघर्षात ते सहभागी झाले असते.

दलित चळवळीने आरक्षण आणि त्यातून उद्‌भविलेले प्रश्न यातच गुंतून न राहता ग्रामीण गरिबांच्या प्रश्नांवर आंदोलने संघटित केली पाहिजेत. मार्क्सच्या अनुयायांनीसुद्धा शहरी कामगार कर्मचाऱ्यांचे संघर्ष यातच गुंतून न राहता ग्रामीण गरिबांच्या प्रश्नावर आंदोलने संघटित केली पाहिजेत.

व्यापक एकजूट, एक व्यापक जाणीव आणि एक व्यापक संघर्ष ही काळाची गरज आहे.

# सामाजिक न्याय आणि सामाजिक क्रांती : मार्क्सवादी दृष्टिकोन

*तत्त्ववेत्त्यांनी आपापल्या परीने जगाचा अर्थ सांगितलाच आहे. प्रश्न आहे तो हे जग बदलण्याचा.*

*— कार्ल मार्क्स*

*धर्म जगाची निर्मिती कशी झाली हे सांगतो. परंतु जगाची पुनर्रचना करणे हे धम्माचे उद्दिष्ट आहे.*

*— डॉ. आंबेडकर*

*भुकेल्या मुलांना मी जेव्हा जेऊ घातले तेव्हा ते मला 'संत' म्हणाले. ते भुके का आहेत असे जेव्हा मी विचारले तेव्हा ते मला 'कम्युनिस्ट' म्हणाले.*

सामाजिक न्याय म्हणजे काय हे नीट समजावून घ्यायला हवे. त्या अगोदर न्याय म्हणजे तरी काय याचाही विचार करायला हवा.

न्यायाची आणि सामाजिक न्यायाची संकल्पना ही चिरंतन किंवा सनातन आहे की कसे? ती न बदलणारी आहे की बदलणारी आहे? आणि बदलत आली असेल तर ती का बदलत आली? या बदलाला कारणे काय असतात इत्यादी प्रश्न महत्त्वाचे आहेत.

सदासर्वकाळ स्थळ, काळ, वर्ग, वर्ण, वंश, जात-निरपेक्ष अशी न्यायाची आणि सामाजिक न्यायाची संकल्पना होती काय? असेल काय? नसेल तर का नाही? का नव्हती? हेही समजावून घ्यायला हवे.

एकेकाळी गुलामगिरी ही प्रस्थापित समाजव्यवस्था होती. त्या काळी मालकाने गुलामाला आसुडाने, चाबकाने, कशानेही मारणे, इतकेच नव्हे तर ठार मारणे, नको असेल तर जनावरांसारखा गुलामांचा बाजार भरवून विकून टाकणे असे घडत होते.

हे सारे त्या काळी न्याय्य समजले जात होते. गुलामांना मारणे, विकणे हा अन्याय नव्हता. पण हा न्याय कुणाचा होता? याला न्याय कुणी ठरविले होते?

त्या काळी जे कुणी मालक होते, प्रस्थापित होते, धनवान होते, श्रीमंत होते, सत्ताधीश होते त्यांनी आणि त्यांच्यासाठी 'तत्त्वज्ञान' सांगणाऱ्या तत्त्ववेत्त्यांनी ही न्यायाची संकल्पना सांगितली होती, अमलात आणली होती. गुलामांनी या अशा अवस्थेला न्याय म्हटले नव्हते. गुलामगिरीचे भोग भोगणाऱ्यांनी त्याला न्याय म्हटले नव्हते.

हा न्याय गुलामांच्या मालकांचा होता. त्यांना सर्व अधिकार होते. त्यांना प्रतिष्ठा होती. त्यांच्याकडे संपत्ती होती. संपत्ती निर्माण करण्याची सर्व साधनेही त्यांच्याकडेच होती. गुलामांना कसलाच अधिकार नव्हता. त्यांना कुणी तुम्हाला न्याय्य काय वाटते हे विचारले नव्हते. प्रदीर्घ काळ गुलामांनीही काही सांगितलेच नव्हते. त्यांनी बोलूच नये अशी व्यवस्था करून ठेवली होती. त्यांनी विचारच करू नये अशी काटेकोर व्यवस्था करून ठेवली होती.

पण माणसाला मेंदू असतो. तो विचार करतो. गुलामसुद्धा माणूसच होते. त्यांनाही मेंदू होता. तेही विचार करू लागले. उशिरा करू लागले. परंतु उशिरा उशिरा का होईना त्यांच्या ध्यानात आले आणि हा न्याय नसून अन्याय आहे असे ते म्हणू लागले. अन्यायाच्या विरुद्ध लढू लागले. लढताना असंख्य मेले. पण शेवटी विजयी झाले.

माणसाने माणसाला गुलाम करणे हा न्याय नाही, अन्याय आहे, असे तत्त्व प्रस्थापित झाले.

मालकांच्या तत्त्वज्ञानाचा पराभव झाला. गुलामांच्या बंडाचा विजय झाला. न्यायाच्या नावाने सुरू असलेला अन्याय नाहीसा झाला. न्यायाची संकल्पना बदलली.

समाजातील प्रस्थापितांची न्यायाची संकल्पना एक असते. प्रस्थापित नसलेल्यांची संकल्पना त्याहून भिन्न असते. उलटी असते. न्यायाच्या संकल्पना एक नसतात. निदान दोन असतात.

न्यायाची संकल्पना वर्ग-संकल्पना असते. समाज-संकल्पना नसते. समाज एक नसतो. समाजात वर्ग असतात. ते संपत्तीचे आणि संपत्ती निर्माण करणाऱ्या साधनांचे मालक आहेत की नाहीत यावरून वर्ग ठरतात.

गुलामगिरीची समाजव्यवस्था जगभर होती, भारतातही होती, महाराष्ट्रातही होती, अगदी शिवाजी महाराजांच्या काळांतही होती. शिवाजी महाराजांकडे

पोर्तुगिजांनी स्वराज्यांत व्यापार करायची परवानगी मागितली होती. शिवाजी महाराजांनी परवानगी दिली. परवानगी देताना ज्या अटी घातल्या त्यात एक अट 'स्वराज्यात गुलामांचा व्यापार करता येणार नाही' अशी होती. असा व्यापार त्या काळात कुठे कुठे सुरू होता म्हणूनच अशी अट घालावी लागली होती.

महाभारतात 'जुगारपर्व' या नावाने एक प्रकरण आहे. याला मूळ महाभारतात 'द्यूतपर्व' म्हटले आहे. द्यूत आणि जुगार एकच. राजा खेळला की त्याला द्यूत म्हणायचे आणि इतर खेळले की त्याला जुगार म्हणायचे. म्हणजे बघा, भाषाही वेगळी. रीतिरिवाजही वेगळे, संस्कृतीही वेगळी. भाषा, रीतिरिवाज, संस्कृती हे सारे वेगवेगळे असते. समाजात वर्ग असतात. म्हणून हे वेगवेगळे असते. असो.

तर महाभारतातल्या या 'जुगारपर्वात' एक प्रसंग आहे. या जुगारात धर्मराज सर्व संपत्ती आणि सर्व राज्य हरला. नंतर धर्मराजाने स्वत: आणि आपल्या भावांनाच पणाला लावले. हाही पण धर्म हरला. धर्मासह सर्व पांडव कौरवांचे गुलाम झाले. त्यानंतर धर्माने द्रौपदीला पणाला लावले. तोही पण तो हरला. द्रौपदीला दरबारात खेचून आणले गेले. तेव्हा तिने सभागृहाला प्रश्न विचारला आहे. स्वत: हरल्यानंतर पांडव कौरवांचे गुलाम झाले होते. गुलामांचा स्वत:च्या बायकोवरही हक्क नसतो. त्या काळी नव्हता. द्रौपदीने विचारले, जे स्वत: हरून गुलाम झाले, तेव्हा त्यांची बायकोवरची मालकीही संपली. मग त्यांना पत्नीला जुगारावर लावण्याचा हक्कच उरला नव्हता. म्हणून त्यांना मला पणाला लावताच येत नव्हते आणि म्हणून मी स्वतंत्र आहे. कौरवांचा माझ्यावर हक्क नाही हे माझे म्हणणे बरोबर की चूक ते सांगा?

सर्व विद्वान व पंडित राज्यकर्त्यांपुढे लाचार असतात. तसे भीष्म, द्रोण हे लाचार होते. त्यांनी द्रौपदीच्या प्रश्नाला उत्तर दिले नाही.

महाभारताच्या काळात गुलामी होती. गुलामांचा स्वत:च्या बायकोवरही हक्क नसे हे यावरून स्पष्ट होते. असो.

या सर्व विवेचनाचे सार एवढेच की 'न्याय एक नसतो. सामाजिक न्याय एक नसतो.' समाजात वर्ग असतात. प्रत्येक वर्गासाठी न्याय वेगळा असतो. परंतु प्रस्थापित तो न्याय सांगतात. त्यालाच त्या काळी सामाजिक न्याय म्हटले जाते. हा न्याय प्रस्थापितांच्या हिताचा असतो. आणि दुसरे म्हणजे न्यायाची संकल्पना बदलत असते. ती सनातन नसते. चिरंतन नसते. बदलत असते. बदलत नाही असे साऱ्या विश्वात काहीच नाही. बदल हा या विश्वाचा नियम आहे.

आज जे आहे तेसुद्धा बदलणारच आहे. निश्चितच बदलणार आहे.

आज आपल्या देशात एक समाजव्यवस्था आहे. या व्यवस्थेत न्याय कशाला म्हणतात? सामाजिक न्याय कशाला म्हणतात?

आपल्या देशातील कायदे राज्यांसाठी राज्याराज्यांच्या विधानसभा करतात. देशासाठी लोकसभा करते. हे कायदे घटनेच्या चौकटीत करावे लागतात. कायदा घटनेच्या चौकटीत आहे की नाही हे उच्च व सर्वोच्च न्यायालये सांगतात. अर्थात कुणीतरी कोर्टाला विचारले तर ते सांगतात. आपण होऊन आपली न्यायालये फारसे काही करत नाहीत. कायद्यांची अंमलबजावणी मंत्रिमंडळे व प्रशासन व्यवस्था करते. त्यांचे चुकले असेल, त्यांनी कायदा सोडून काही केले असेल आणि कुणी कोर्टात जाऊन त्यासंबंधी दाद मागितली तर कोर्ट न्याय करतात. स्वत: होऊन कोर्ट काही करत नाही. तर न्याय मागावा लागतो. मग न्याय दिला जातो. खरे म्हणजे कोर्ट देतात त्याला न्याय म्हणतात. तो न्याय असतोच असे नाही. कधी कधी असतो, कधी कधी नसतो.

न्यायव्यवस्था नि:पक्षपाती असते असे सांगितले जाते. कोण न्याय मागतो आणि कोणाविरुद्ध मागतो हे न्यायसंस्था पाहत नाही. या अर्थाने न्यायव्यवस्था आंधळी असते असे सांगितले जाते.

अनुभव मात्र वेगळा येतो. श्रीमंतांना न्याय लवकर मिळतो. न्यायासाठी पैसा खर्च करावा लागतो. तो ज्यांच्याकडे असतो त्यांना न्याय मिळतो. ज्यांच्याकडे पैसा नसतो ते कोर्टात जाऊ शकत नाहीत. त्यांना न्याय मिळत नाही.

न्यायासाठी पैसा लागतो ही एक अडचण तर आहेच. पण आणखीही अडचणी आहेत. न्यायाधीश याच समाजातून येतात. बहुतेक जण श्रीमंत किंवा मध्यमवर्गातून येतात. ते ज्या वर्गातून येतात त्या वर्गाचे हितसंबंध त्यांच्या विचारांवर प्रभाव गाजवत असतात.

मागे १९७१ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षाने जमीन बळकाव आंदोलन केले. ज्यांच्याकडे जास्त जमिनी आहेत त्यांच्या शेतात घुसायचे असा कार्यक्रम होता. ठिकठिकाणच्या कलेक्टरांनी एकाच पोलीस कायद्याखाली सारखेच बंदीहुकूम जाहीर केले. आम्ही हे हुकूम मोडले आणि शेतात घुसलो. पक्षाच्या भूमिकेप्रमाणे सर्वांनी सर्व ठिकाणी गुन्हा कबूलच केला. कोल्हापूर जिल्ह्यांत कोर्टाने कोर्ट उठेपर्यंत शिक्षा सुनाविली आणि कोर्ट उठले. आमची शिक्षा संपली. आम्ही घरी गेलो. कऱ्हाडजवळच्या रेठरे येथील मोहित्यांच्या शेतात असाच सत्याग्रह झाला. बंदीहुकूम तोच होता. सर्वांनी गुन्हा कबूलच केला. तिथल्या कोर्टाने तीन महिन्यांची शिक्षा दिली.

एकाच गुन्ह्याला, एकाच हेतूने केलेल्या गुन्ह्याला अशा दोन वेगवेगळ्या शिक्षा

का झाल्या असाव्यात याचा आम्ही शोध घेतला. काय दिसले? ज्याने कोर्ट उठेपर्यंत शिक्षा दिली त्याचा बाप भूमिहीन होता. दुसऱ्याच्या शेतात राबत होता. राखीव जागांमुळे शिक्षण घेऊन पोरगा न्यायाधीश झाला होता. त्याला बहुतेक त्याचा भूमिहीन बाप आठवला. भूमी बळकाव सत्याग्रह करणाऱ्यांत त्याला त्याचा बाप दिसला. त्याने कोर्ट उठेपर्यंतची शिक्षा दिली आणि लगेच उठला. तीन महिने शिक्षा देणाऱ्याच्या बापाची जमीन कूळ कायद्याने गेली होती. शेती करणाऱ्याच्या मालकीची झाली होती. त्यालाही त्याचा बाप आठवला असावा. भूमी बळकाव आंदोलन करणाऱ्यांत त्याला गुन्हेगार दिसले. स्वत:च्या बापाची जमीन बळकावणारे दिसले. त्याने तीन महिन्याची शिक्षा ठोठावली.

कोणता न्यायाधीश कोणत्या वर्गातून येतो. याच्यावर त्याचा दृष्टिकोन ठरतो. तो जे देतो त्याला न्याय म्हणावे लागते.

कायदे करणारे कोणत्यातरी वर्गाच्या हिताचे कायदे करतात. न्याय देणारे कुणाच्या तरी हिताकडे लक्ष देऊन न्याय देतात.

"न्याय सारखाच केला जातो, न्याय हा सर्वांना सारखाच मिळतो" हे खरे नाही. अनुभव तसा नाही.

न्यायव्यवस्था ही वर्गव्यवस्थाच असते आणि ती व्यवस्था प्रस्थापितवर्गाच्या हितसंबंधाची जपणूक करीत असते. समाज एकसंध नसतो, समाजात वर्ग असतात. या वर्गांचे हितसंबंध एकमेकांच्या विरुद्ध असतात. हे कार्ल मार्क्सने तर पुन्हा पुन्हा सांगितलेच आहे. परंतु आपले विठ्ठल रामजी शिंदे यांनी बहुजनांची व्याख्या करताना लिहून ठेवले आहे की "...हिंदुस्थानात एकंदर लोकसंख्येचे केवळ राजकीयदृष्ट्या दोन प्रमुख भाग पडले आहेत. ते हे की एक विद्याबळ, द्रव्यबळ किंवा अधिकारबळाने पुढारलेला वर्ग आणि दुसरा ह्यातील कोणतेही बळ अंगी नसल्यामुळे नाइलाजाने मागासलेला वर्ग किंवा बहुजन समाज." ही मांडणी व भाषा मार्क्सच्या वळणाने जाणारीच आहे आणि बरोबरही आहे.

## सामाजिक न्यायासाठी चळवळी

सामाजिक न्यायासाठी चळवळींचा आढावा घेण्यासाठी काळाचे ढोबळमानाने तुकडे पाडून किंवा टप्पे ठरवून विचार करणे आकलनांसाठी उपयुक्त ठरेल.

गौतम बुद्धाचा काळ, जैन, लिंगायत, शिख इत्यादी धर्म किंवा पंथाच्या उदयाची कारणे व परिणाम हा अतिदूरचा काळ ठरेल. विषयाची व्याप्तीही वाढेल. तसेच संतांची चळवळ व परंपरा हा फार दूरचा काळ नसला तरी तोसुद्धा स्वतंत्र विषय

ठरेल. तथापि एवढी नोंद व्हायलाच हवी की ते सर्व प्रयत्न आणि त्या सर्व चळवळी यासुद्धा धर्माच्या किंवा आध्यात्मिक क्षेत्रातील सामाजिक न्यायासाठीच्याच चळवळी होत.

हे काळ सोडले तरी अलीकडच्या काळाचे किमान चार टप्पे पाडून विचार करणे उपयुक्त ठरेल. स्वातंत्र्यपूर्व काळातील चळवळींचा एक टप्पा; आपल्या देशाची घटना तयार होणे व घटनेवर आधारित कायदे व आदेश तयार होण्याची प्रक्रिया हा दुसरा टप्पा; घटनेने आदेशिलेल्या सामाजिक न्यायाच्या दिशेने अडखळत का असेना उचलली गेलेली काही पावले व ती पावले उचलली जावीत म्हणून झालेल्या चळवळी हा तिसरा टप्पा आणि चालू बाजारी अर्थव्यवस्था आणि या अर्थव्यवस्थेच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पना व त्यांची अंमलबजावणी यावर झालेले परिणाम हा चौथा टप्पा मांडता येईल. आणि आगामी काळासाठी या चळवळींच्या दिशेसंबंधी काही सूचना तयार होते की कसे याचा विचार करावा लागेल.

## स्वातंत्र्यपूर्व काळ

स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक न्यायासाठीच्या चळवळीचे स्थूलमानाने दोन भाग पडतात. एक भाग न्याय मागणाऱ्या चळवळींचा दिसतो. म. फुले, रामस्वामी नायकर, डॉ. आंबेडकर यांच्या व तत्सम छोट्या-मोठ्या चळवळींचा दिसतो. हे विचार व या चळवळी ज्यांच्यावर अन्याय होत आला त्यांच्या उठावाच्या व 'न्याय मागणाऱ्यांच्या' आहेत. दुसरा एक भाग दिसतो, ज्यात दयाबुद्धी, धर्मबुद्धी, धर्मसुधारणा इत्यादी विचार प्रधान आहेत. न्याय द्यायला हवा, ज्यांनी व ज्यांच्या पूर्वजांनी अन्याय केले त्यांना आवाहन करणारा हा भाग आहे. आजवर ज्यांनी अन्याय केले त्यांना आवाहन करून त्यांच्या विचार व व्यवहारात बदल करण्याच्या प्रयत्नाचा आहे. उदाहरणार्थ, म. गांधींचा विचार.

अन्यायग्रस्त व न्याय मागणाऱ्यांना संघटित करून त्यांचे उठाव घडवून आणणे ही एक दिशा दिसते तर "ज्यांनी न्याय द्यायला हवा त्यांच्या न्यायबुद्धीला व धर्मबुद्धीला आवाहन करणे अशी दुसरी दिशा दिसते."

या दोन्ही चळवळींवर स्वातंत्र्य चळवळ या मुख्य चळवळीचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. यातूनच 'आधी सामाजिक का आधी राजकीय' हा वाद उद्‌भवला आणि एकमेकांवर गंभीर आरोपही करण्यात आले. या वादाने सामाजिक न्यायाच्या चळवळी व राजकीय चळवळी यांची हानीच झाली आहे. दोन्ही चळवळींची हानी होण्याचा हा क्रम अजूनही चालूच आहे. म. फुले यांच्यावर ब्रिटिशांचे हस्तक व स्वातंत्र्य

चळवळीचे विरोधक असे आरोपही झाले. अग्रक्रम व भर यांवरून उद्‌भवलेल्या भिन्न भूमिकांना शत्रुत्वापर्यंत ताणण्यात आले. विठ्ठल रामजी शिंदे व म. गांधी यांचे दोन्ही चळवळींना एकत्र चालविण्याचे प्रयत्न फारसे यशस्वी होऊ शकले नाहीत. या दोन थोर पुरुषांच्या भूमिकांतही फरक आहेच. म. गांधी यांनीच कर्मवीर शिंदे यांना पत्र लिहून कबूल केले आहे की कर्मवीर शिंदे यांची भूमिका सामाजिक न्यायाच्या बाबतीत अधिक अग्रक्रमाची व जादा भर देणारी आहे.

स्वातंत्र्य चळवळीतील सर्वांत मोठा प्रवाह काँग्रेस पक्षाचा होता. या काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनाच्या मंडपातच सामाजिक परिषदेची संमेलने भरविण्याची योग्य पद्धत पुण्याच्या सनातनी मंडळींच्या पुणे अधिवेशनाच्या वेळच्या विरोधामुळे कालांतराने बंद पडली.

स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक न्यायाचा विचार मांडणारे इतरही प्रवाह होते. या प्रवाहांनी स्वातंत्र्य कशासाठी हवे आहे या बाजूची मांडणी केली. स्वातंत्र्यानंतरचा भारत कसा असावा व कसा असेल यासंबंधी वैचारिक मांडणी केली.

आर्थिक न्यायासाठी स्वातंत्र्य, आर्थिक समतेसाठी स्वातंत्र्य आणि हा न्याय व ही समता यासाठी स्वातंत्र्यसंग्राम अशी त्यांची मुख्यत: मांडणी होती.

१९३१ साली फाशी गेलेल्या भगतसिंगांच्या संघटनेचे नाव 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिक आर्मी' असे होते. या नावात असलेला 'सोशॅलिस्ट' हा शब्द सुरुवातीस नव्हता. भगतसिंगांच्या आग्रहानंतर या शब्दाचा समावेश करून नामविस्तार करण्यात आला. या भगतसिंगांनी स्वातंत्र्य म्हणजे काय आणि स्वातंत्र्य कशासाठी हवे यासंबंधी स्पष्ट मांडणी केली आहे. त्यांनी लिहून ठेवले आहे: "गोऱ्यांचे राज्य घालवून त्या ऐवजी काळ्यांचे राज्य आणणे एवढाच आमचा स्वातंत्र्याचा अर्थ नाही. शोषणमुक्त समाज व समाजवाद आणण्यासाठी स्वातंत्र्य असा आमचा स्वातंत्र्याचा अर्थ आहे."

ही मांडणी सामाजिक न्यायासाठीचीच मांडणी आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीचे मार्ग आणि स्वातंत्र्य कशासाठी हवे यासंबंधीचे काँग्रेस पक्ष आणि इतर प्रवाह यांच्या मांडणीत मतभिन्नता होती. काँग्रेस पक्ष हा स्वातंत्र्य आंदोलनातील सर्वात मोठा प्रवाह होता. पण तो एकमेव प्रवाह नव्हता.

कालांतराने काँग्रेसपासून अलग झालेला कम्युनिस्टांचा व सोशॅलिस्टांचा तसेच सशस्त्र क्रांतिकारकांचा प्रवाह हेही प्रवाह होते. या प्रवाहांनीच स्वातंत्र्य हे न्यायासाठी हवे आणि कुणाला न्याय हवा यासंबंधी स्पष्ट व रोखठोक मांडणी केली. तेवढी

स्पष्टता काँग्रेस पक्षाने केलेली नव्हती. भांडवलदार बिर्ला शेठ यांच्यांपासून कामगार, शेतकरी, शेतमजूर इत्यादी सर्वच जनविभाग काँग्रेस पक्षात होते. आर्थिक व सामाजिक अन्याय करणारे आणि अन्यायाचे भोग भोगणारे असे दोन्ही जनविभाग काँग्रेस पक्षात होते. पारतंत्र्य हाच सर्वांत मोठा अन्याय आहे, हा अन्याय दूर झाल्यानंतर इतर अन्यायाचे पाहता येईल अशी काँग्रेसची मुख्य प्रभावी भूमिका होती. व्यापक जुटीसाठीची रणनीती म्हणून याचे स्पष्टीकरण दिले जाते. तथापि रणनीती सदोष असेल आणि रण जिंकल्यानंतर काय करायचे किंबहुना रण कशासाठी जिंकायचे याची स्पष्टता नसेल, तर रण जिंकूनही अन्यायाचे भोग भोगणारे यांना अन्याय भोगतच राहावा लागतो. सर्वांत मोठा अन्याय दूर करण्यासाठी इतर छोटे-मोठे अन्याय करणारे हे अन्यायग्रस्तांना हुशारीने बरोबर घेतात आणि हा सर्वांत मोठा अन्याय दूर झाला की अन्याय करतच राहतात. स्वत: करीत असलेले अन्याय नाहीसे करीत नाहीत. स्वातंत्र्यानंतर ५८ वर्षे उलटून गेल्यानंतरही भारतात 'सामाजिक अन्याय', 'आर्थिक अन्याय' सुरूच आहेत. याचे कारणच हे आहे. स्वातंत्र्य चळवळीत भागीदार केलेले काँग्रेस पक्षाचे नेतृत्व 'सामाजिक न्याय', 'आर्थिक न्याय' अशी भाषा तरी करीत होते. आता तर 'बळी तोच कान पिळी', 'समर्थ त्यानेच जगावे' अशीच भाषा प्रभावी होत आहे.

१९२० साली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) ही देशव्यापी पहिली कामगार संघटना अस्तित्वात आली. यात अनेक प्रवाह असले तरी जास्त प्रभाव कम्युनिस्टांचा होता. कामगारांना आर्थिक न्याय मिळवून देणे हे या संघटनेचे स्वाभाविकच मुख्य ध्येय होते. १९२५ साली भारतीय कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला. सुरुवातीस आकाराने लहान असलेल्या या प्रवाहावर ब्रिटिशांनी जेवढे खटले भरले, जेवढ्या प्रदीर्घ काळ जितक्या नेत्यांना तुरुंगात डांबले, त्याचा प्रमाण म्हणून विचार करता इतर प्रवाहांना तुलनेने कमी तुरुंगवास भोगावा लागला. ब्रिटिशांनी बेकायदेशीर ठरवलेला हा एकमेव अखिल भारतीय राजकीय पक्ष होता.

कम्युनिस्टांची विचारसरणी व मांडणी ही न्यायासाठीचीच मांडणी होती. सुरुवातीस आर्थिक अन्यायविरोधाच्या मांडणीवर भर असला तरी सामाजिक अन्याय, स्त्री-पुरुष विषमतेमधील अन्याय्य याचे भान कम्युनिस्टांना होते. कम्युनिस्ट चळवळ ही सामुदायिक नेतृत्वाच्या तत्त्वानुसार कार्य करीत आलेली आहे. त्यामुळे या चळवळीचे मूल्यमापन करताना कोणा व्यक्तीच्या विचारांऐवजी पक्षाने वेळोवेळी केलेल्या विस्तृत ठरावांना जास्त महत्त्व देऊन मूल्यमापन करणे योग्य ठरते. इतर प्रवाहांचा व्यक्तीच्या विचारांना प्राधान्य देण्याचा व्यवहार राहिला आहे. ठराव रूपाने मंजूर केलेल्या भूमिकांऐवजी कुणातरी व्यक्तीने व्यक्त केलेले प्रासंगिक लिखाण वा

भाषण यांवरून एकूण कम्युनिस्ट चळवळीचे आकलन मांडल्यामुळे या आकलनात दोष उद्भवतात.

सामाजिक न्यायासाठीच्या आपल्या भूमिकेची मांडणी १९३० सालीच भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केली आहे. या ठरावात भारतातील अस्पृश्यता हा एक खास प्रश्न आहे आणि तो प्रश्न सोडविण्यासाठी खास प्रयत्नांची गरज आहे याची मांडणी केली आहे.

'आर्थिक प्रश्न सुटले की अस्पृश्यता आणि सामाजिक मागासलेपणाचे प्रश्न 'आपसूक' किंवा 'आपोआप' सुटतील अशी कम्युनिस्ट पक्षाची पक्ष म्हणून केव्हाही भूमिका नव्हती. असा आक्षेप घेणाऱ्यांनीच पक्षाचे ठराव वाचून, अभ्यासून मग साधार आक्षेप घ्यावेत. अंदाजाने व्यवहार करू नयेत.

## तेलंगणातील भूमिहीनांचे सशस्त्र आंदोलन

आंध्र प्रदेशातील तेलंगण भागात भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली भूमिहीनांचा जमीनदारांविरुद्ध जमिनीसाठी सशस्त्र उठाव झाला. आंदोलन चिरडून टाकण्यासाठी पोलीस व सशस्त्र दलांचा वापर करण्यात आला. हजारो भूमिहीनांचे बळी गेले. शेकडो कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी या आंदोलनात रक्त सांडले.

भूमिहीनांचा हा उठाव हा सामाजिक न्यायासाठीचाच उठाव होता. श्रमिक, दलित, भूमिहीनांची आंदोलने ही सामाजिक न्यायाची अधिक महत्त्वाची आंदोलने होती व आहेत. राखीव जागांसाठीची आंदोलने, सोयी-सवलतीसाठींची आंदोलने, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या नावाभोवतालची भावनात्मक आंदोलने ही जशी सामाजिक न्यायासाठीची आंदोलने आहेत तशीच भूमिहीनांची जमिनीसाठीची आंदोलने व उठाव हीसुद्धा सामाजिक न्यायासाठीचीच आंदोलने आहेत. किंबहुना ती जास्त महत्त्वाची आहेत. कारण त्यांचे संभाव्य लाभधारक संख्येने कितीतरी जास्त आहेत. आणि सामाजिक न्यायाची त्यांना अधिक गरज आहे.

ज्या भागात कम्युनिस्टांनी जमिनीसाठी सशस्त्र उठाव केला त्याच भागातून विनोबा भावे यांचे 'भूदान आंदोलन' सुरू झाले. यातील मर्म ध्यानात ठेवायला हवे. कम्युनिस्टांचे आंदोलन हे भूमिहीनांचे आंदोलन होते. या आंदोलनाने भूमिहीनांना सामाजिक न्यायासाठी लढाई करायला सांगितले. आंदोलनाचे आवाहन भूमिहीन अन्यायग्रस्तांना होते. विनोबा भावे यांचे 'भूदान' आंदोलन हे जमीनदारांना आवाहन करीत होते. 'दान द्या' असे विनवीत होते. ते कोण होते व आहेत? ज्यांनी कधी स्वत: जमीन कसली नाही, हजारो एकर जमीन बळकावून बसलेले, भूमिहीन श्रमिक दलितांवर अन्याय करणारे, त्यांना भूदान चळवळीचे आवाहन होते.

ज्यांच्यावर अन्याय झाला त्या अन्यायग्रस्तांच्या आंदोलनाला हा पर्याय होता.

अन्यायग्रस्तांनी संघटित होऊन, संघर्ष करून न्याय मिळवा हे कम्युनिस्टांचे रण होते व आहे. अन्याय करणाऱ्यांच्या न्यायबुद्धीला आवाहन करून न्याय मिळावा ही भूदान व तत्सम आंदोलनांची रीत होती व आहे.

अन्याय करणारे व त्या अन्यायाचे लाभ उपभोगणारे न्याय करीत नसतात. ज्यांच्यावर अन्याय होतो त्यांनीच न्यायासाठी संघर्ष करावा लागतो. संघर्षाला पर्याय नसतोच. ज्यांना हा संघर्ष करावा लागतो, त्यांना स्वत:च न्याय म्हणजे काय हे ठरवावे लागते. स्वत:च जाणते-शहाणे व्हावे लागते आणि संघर्षासाठी संघटित व्हावे लागते.

उदाहरण म्हणून तेलंगणातील भूमिहीनांचा कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील सशस्त्र उठाव आणि भूदान चळवळ यांची ही मांडणी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक न्यायासाठीच्या सर्व संघर्षाचे मूल्यमापन हा बराच मोठा व स्वतंत्र विषय होईल.

## भारतीय राज्यघटना

स्वातंत्र्य आंदोलनातील विचारप्रवाहांचे स्पष्ट प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेत दिसते. म. गांधींच्या नेंतृत्वाखालील कॉंग्रेस पक्ष हा स्वातंत्र्य चळवळीतील सर्वात मोठा व प्रभावी प्रवाह होता. एकमेव प्रवाह मात्र नव्हता.

इंग्लंडच्या पार्लमेंटने भारताला स्वातंत्र्य द्यावे असा ठराव केला व मग भारत स्वतंत्र झाला. असा ठराव करायला स्वातंत्र्य चळवळच कारणीभूत होती हे तर स्पष्टच आहे. पण स्वातंत्र्याच्या वाटाघाटी झाल्या. स्वातंत्र्य कसे द्यावे, कधी द्यावे, काय काय द्यावे व काय काय न द्यावे हे ठरले. भारत व पाकिस्तान असे तुकडे करावेत हे ठरले. सर्व संस्थाने स्वतंत्र ठेवावीत हे ठरले. ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारताने पेन्शन देत राहावी हे ठरले. अनेक बाबी वाटाघाटींनी ठरल्या. म्हणून तर लाल किल्ल्यावर भारताच्या स्वातंत्र्याचे प्रतीक असलेला तिरंगा फडकवण्यापूर्वी ब्रिटिशांचा युनियन जॅक सन्मानाने व सलाम करून उतरवण्यात आला.

जगातल्या अनेक देशांनी स्वातंत्र्य मिळविले ते साम्राज्यवाद्यांचे झेंडे पायदळी तुडवून मिळवले. दीडशे वर्षांच्या स्वातंत्र्य चळवळीचे अवमूल्यन मुळीच होता कामा नये. तथापि स्वातंत्र्य आंदोलनाच्या मर्यादाही दुर्लक्षित करता कामा नयेत.

भारतीय राज्य घटनेतही कॉंग्रेस पक्षाचा विचार प्रतिबिंबित झालेला आहे. घटना समितीत कॉंग्रेस पक्षाचेच बहुमत होते. शिवाय ही घटना समिती काही प्रौढ मतदानावर आधारलेल्या मतदानातून निवडून आलेली नव्हती. मिळकतधारक

मर्यादित मतदारांनी निवडलेली घटना समिती होती. त्यामुळे तर भारतीय राज्यघटनेत संपत्ती धारण करण्याच्या अधिकारांचे संरक्षण स्पष्टपणे जागोजागी दिसते. अन्यायाने मिळविलेली संपत्ती ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांना देण्याचे ठरविले तर त्यासाठी अन्याय करणाऱ्यांना नुकसान भरपाई द्यायलाच हवी हेही घटनेत दिसते. ज्या जमीनदारांनी अन्याय करून जमिनी बळकावल्या, ज्या त्यांनी स्वत: कधीच कसल्या नाहीत, भूमिहीनांकडून जुलमाने कसून घेतल्या व त्यातून त्यांची संपत्ती जमविली, त्या जमीनदारांची जमीन भूमिहीन कुळांना देताना जमीनदारांचे नुकसान करतो आहोत म्हणून त्यांना नुकसान भरपाई द्यावी लागेल ही घटनेतील तरतूद हे एक उदाहरण आहे. या बाजूनेही घटनेचे मूल्यमापन व्हायला हवे. तथापि घटनेने 'सामाजिक न्याया'चीही तरतूद केली आहे. अर्थात घटनेचे संपूर्ण मूल्यमापन करणे हा आणखी एक स्वतंत्र व मोठा विषय होईल.

भारतीय राज्यघटनेत सरकारी धोरणांना मार्गदर्शन केलेले आहे. घटनेत धोरणांची मार्गदर्शक सूत्रे नमूद केलेली आहेत. समाजात पूर्वपरंपरागत आर्थिक विषमता आहे. जातिवर्णव्यवस्थेने निर्माण केलेली सामाजिक विषमता आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने निर्माण केलेली लैंगिक विषमता आहे. साम्राज्यवादी राजवटीने जो वारसा दिला तो प्रादेशिक विषमतेचा आहे. आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, लैंगिक विषमता, प्रादेशिक विषमता इत्यादी अनेक विषमतांनी भारतीय समाज विषमताग्रस्त आहे. अशा या अनेक प्रकारच्या विषमताग्रस्त भारतीय जनतेने निवडून दिलेल्या सरकारांनी देशाचा कारभार कसा करावा याचे मार्गदर्शन भारतीय राज्यघटनेने केले आहे. या मार्गदर्शनाचे महत्त्वही घटनेने नमूद केले आहे.

यासंबंधीचे घटनेचे कलम ३७ स्पष्टपणे आदेश देते की, "मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीसाठी जरी कोणत्याही कोर्टात दाद मागता येणार नसली तरी हे मार्गदर्शन राज्य चालविण्याच्या कामी मूलभूत (फंडामेंटल) आहे आणि कायदे करताना, कारभार करताना, धोरणे ठरवताना या मूलभूत मार्गदर्शनानुसार व्यवहार करणे हे सरकारचे कर्तव्य आहे.

कलम ३८ चे पोटकलम २ सांगते की, "सर्व जनतेचे कल्याण करण्याची जी जबाबदारी सरकारवर आहे ते करताना विशेष करून व्यक्ती-व्यक्तींमधील तसेच वेगवेगळे समाजविभाग यांच्यामधील दर्जातील, सुविधांमधील, संधींमधील विषमता दूर होईल असा व्यवहार सरकार करील."

घटनेचे कलम ३९ (क) अधिक स्पष्ट करते की आपली आर्थिक धोरणे निश्चित करताना आणि अर्थव्यवस्था चालविताना "संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही, उत्पादनसाधनांचे केंद्रीकरण होणार नाही" याची दक्षता सरकार घेईल.

घटनेच्या या मार्गदर्शनाचा अर्थ स्पष्ट आहे. संपूर्ण मार्गदर्शक सूत्रांचा आशय अगदी स्पष्ट आहे. सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप केला पाहिजे असे घटनेचे मार्गदर्शन आहे आणि ते मार्गदर्शन समता प्रस्थापित होईल अशासाठी केले पाहिजे असे ते मार्गदर्शन आहे. घटनेच्या या स्पष्ट तरतुदीनुसार आजवरचा केंद्र व राज्य सरकारांचा व्यवहार झाला की नाही, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या हेतूने व्यवहार झाला की नाही हे तपासले पाहिजे.

विषमता असलेल्या समाजात सरकारने सर्वांना सारखे वागवले किंवा काहीच केले नाही तर दुबळे हे दुबळेच राहतील सबळ सबळच राहतील. इतकेच नव्हे तर दुर्बल अधिक दुर्बल होतील. सबळ अधिक सबळ होतील. दोघांच्यातील अंतर वाढेल. विषमता वाढेल, संपत्तीचे केंद्रीकरण होईल. घटनेच्या अंमलबजावणीच्या ५५ वर्षांनंतर देशातील विषमता वाढली आहे. विकासही मोठा झाला आहे, पण विषमताही वाढली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शनानुसार सामाजिक न्याय आणण्यासाठी जे कायदे केले ते अपुरे आहेत, सदोष आहेत, त्यात धरसोड दिसते, असंख्य पळवाटा आहेत. या कायद्यांची अंमलबजावणी तर अधिकच सदोष आहे. अनेक कायद्यांच्या बाबतीत असे म्हणता येईल की ते कायदे फक्त कागदावरच राहिले.

'सामाजिक न्याय' म्हणून जमीनसुधारणा कायदे आले, कूळ कायदे आले. कमाल जमीनधारणेचे कायदे आले. तथापि त्यातून घटनेला अभिप्रेत असलेला सामाजिक न्याय अभावानेच प्रस्थापित झाला.

कामगारांना संरक्षण देणारे कायदे आले. किमान वेतनाचे कायदे आले. तथापि त्यांची फारशी अंमलबजावणी झाली नाही. किमान वेतनाचा कायदा येऊन जवळ जवळ ६० वर्षे होत आली. किमान वेतन न देणाऱ्या मालकाला तुरुंगवासाची शिक्षा या कायद्याने सांगितली आहे. गेल्या ६० वर्षांत संपूर्ण देशात एका तरी मालकाला शिक्षा झाली काय हे सूक्ष्मदर्शक यंत्र घेऊन शोधावे लागेल. ज्या क्षेत्रात कामगार संघटित झाले त्यांनी मात्र बऱ्या प्रमाणात न्याय मिळविला.

ज्यांच्यावर अन्याय होतो ते जर संघटित झाले, जाणते झाले आणि त्यांनी संघर्ष केला तर थोडाफार न्याय मिळतो हे याही क्षेत्रात अनुभवास आले. देशातील एकूण कामगारांपैकी जेमतेम १०-१५% कामगार संघटित आहेत. त्यांनी थोडाफार न्याय मिळविला आहे. उरलेले ८५% आजही अन्यायग्रस्तच आहेत. ज्यांच्यावर सामाजिक अन्याय होतो त्यांनी न्याय मिळविला तर थोडाफार मिळतो. न्याय कुणी देत नसतो, न्याय मिळवावा लागतो.

घटनेच्या तरतुदीनुसार सार्वजनिक क्षेत्रात नोकऱ्यांत व शिक्षणात राखीव जागा आल्या. त्यांच्या अंमलबजावणीचे काय झाले? घटनेची पन्नास वर्षे कधीच संपून गेली तरी कायद्याने देऊ केलेल्या राखीव जागा पूर्णपणे भरल्याच गेल्या नाहीत. ज्यांचा राखीव जागांना कसून विरोध आहे ती प्रशासन यंत्रणाच अंमलबजावी यंत्रणा आहे. ते त्यांच्या विचारानुसारच व्यवहार करणार. अनंत युक्त्या-प्रयुक्त्या करतात आणि राखीव जागा भरल्या जाणार नाहीत याची पुरेपूर काळजी घेतात. सामाजिक न्यायाचा हा प्रकार बराचसा कागदावरच राहतो. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या नावाच्या संस्था, यांचे पुतळे बसवणाऱ्या संस्था, फोटो लावणाऱ्या संस्था, त्यांच्या जयंत्या व मयंत्या साजऱ्या करणाऱ्या संस्थांतसुद्धा राखीव जागांचा अनुषेश सतत राहतो. नाव घेणे वेगळे, पुतळे व प्रतिमा पुजणे वेगळे व विचार स्वीकारून त्यानुसार व्यवहार करणे वेगळे.

सामाजिक न्यायाचा पुरस्कार करणारे व भाषणे करणारेच अन्याय करताना दिसतात. अन्यायग्रस्तांनी संघटित होऊन संघर्ष करण्याला पर्याय नाही.

**बाजारीकरण व सामाजिक न्याय**

गेली पंधराहून जास्त वर्षे आपल्या देशात 'बाजारावर आधारलेली अर्थव्यवस्था' आणली गेली आहे. या व्यवस्थेला तर 'सामाजिक न्याय' हे तत्त्वच मान्य नाही. कुणी कुणासाठीच काहीच करू नये. ज्याने त्याने स्पर्धेत उतरावे आणि जे मिळेल ते घ्यावे. दुबळ्यांची, दुर्बलांची खास सोय करू नये. (सर्व्हायवल ऑफ फिटेस्ट) 'बळी तो कान पिळी' हे या व्यवस्थेचे तत्त्व आहे. सर्व्हायवल ऑफ फिटेस्ट हा जंगलचा कायदा आहे, माणसांचा नाही. सुसंस्कृत समाजाचा तर नाहीच नाही. आपल्यातल्या दुर्बलांची जो काळजी घेतो त्या समाजाला सुसंस्कृत समाज म्हणतात. भारतीय समाजाला दिवसेंदिवस असंस्कृत बनवण्यात येत आहे.

शिक्षणव्यवस्थेचे झपाट्याने बाजारीकरण झाले आहे. ज्यांच्या बापांच्या खिशात पैसे असतील त्या मुलांनी शिकावे. इतरांनी त्यांची सेवा करावी. अशी व्यवस्था आली आहे. आरोग्यव्यवस्था आताच गरिबांच्या आवाक्याबाहेर गेली आहे.

रोजगार कमी होत आहे. नवा रोजगार निर्माण होत नाही. जुना टिकत नाही. 'विना रोजगार विकास', 'जॉबलेस ग्रोथ' असे तत्त्व प्रचारले जात आहे. ज्यांना रोजगार मिळणार नाही व ज्यांचा असलेला रोजगार जाईल त्यांचा विकास कसा होणार हा प्रश्न उपस्थितसुद्धा केला जात नाही.

'विना उत्पादन नफा', 'प्रॉफीट विदाऊट प्रॉडक्शन' हा नवा मंत्र आला आहे.

काहीही उत्पादन न करता शेअर बाजारात आणि क्रिकेटसह असंख्य क्षेत्रांत जुगार खेळून नफा कमावणारेच अधिकाधिक श्रीमंत होत आहेत. उद्योगक्षेत्र व सेवाक्षेत्राच्या तुलनेत शेतीक्षेत्र दुबळे आहे. या दुर्बल शेतीक्षेत्रातील सरकारी व बिगरसरकारी गुंतवणूक कमी होत आहे. शेतीक्षेत्रातील उत्पादन कमी होत आहे. रोजगार कमी होतो आहे. उत्पादकता कमी होत आहे. शेतीक्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण मात्र फारसे कमी होत नाही. परिणामी शेतकरी गरीब होतो आहे. कर्जबाजारी होत आहे व आत्महत्या करीत आहे. त्यांना न्याय मिळत नाही.

स्त्रिया आजही दुर्बलच आहेत. त्यांची खास काळजी घेण्याची भूमिका सोडून देण्यात येत आहे. ज्यांना सामाजिक न्याय देण्याची गरज आहे, त्यांच्यावर सामाजिक अन्याय लादला जातोय.

जेव्हा रोजगार कमी होतो तेव्हा सर्वांत जास्त परिणाम महिलांच्या रोजगारावर होतो. जेव्हा शिक्षणव्यवस्था बाजारी बनते, तेव्हा महिलांनाच शिक्षणापासून वंचित राहावे लागते. आरोग्याचेही असेच होते.

स्वत:चे सौंदर्य व शरीर विकणे एवढाच उपजीविकेचा मार्ग स्त्रियांसमोर उरला आहे.

## सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी काय करावे?

गौतम बुद्धांच्या प्रयत्नांपासून आजपर्यंतच्या प्रयत्नांचा आढावा घेतला तर काय दिसते? अजून सामाजिक न्याय प्रस्थापित झालेला नाही. प्रयत्न तर खूप झाले. या प्रयत्नांचे थोडेबहुत परिणामही झाले. सामाजिक अन्यायाची तीव्रता कमी झाल्यासारखे वाटते. पण सामाजिक अन्याय नष्ट होत नाहीत. विषमता नाहीशी होत नाही. आर्थिक, सामाजिक, लैंगिक इत्यादी सर्व प्रकारच्या विषमता आहेतच. अगदी अलीकडच्या काळात तर या विषमता वाढतानाही दिसतात. असे का व्हावे?

मानवी समाजाच्या ज्ञात इतिहासातून काही बाबी स्पष्ट दिसतात.

आदिम किंवा प्राथमिक शोधही लागले नव्हते. निसर्गाने निर्माण केलेली फळे व कंदमुळे खाऊन मनुष्य जगत होता. शिकारीची फारशी साधने नसताना प्राण्यांची शिकार करीत होता. कधी कधी प्राणीच मानवाची शिकार करीत होते. अशा प्राथमिक अवस्थेत केवळ जगण्यासाठीसुद्धा सर्वांनाच झटावे लागत होते. जेमतेम जगण्याइतके फक्त निसर्गातून काहीबाही मिळत होते. उरत काहीच नव्हते. जे मिळत होते ते सर्वजण मिळून खात होते. कसेतरी जगत होते. अशा टोळी समाजात समता होती. सर्वांनीच कष्ट करावे व मिळेल ते सर्वांनी खावे असे होते. कसलीच विषमता नव्हती. असणे शक्य नव्हते. पण ती दारिद्र्यात समता होती.

पुढे निसर्गावर श्रम करता करता त्या श्रमातूनच जुजबी शोध लागत गेले. मनुष्य शेती करू लागला. उत्पादनाची प्राथमिक साधने तयार झाली. श्रमाने उत्पन्न करणाऱ्याच्या गरजा भागूनही काही शिल्लक उरू लागले. श्रम न करता काही जणांना काही अल्प काळ जगता येईल अशी व्यवस्था आली. या उरलेल्या उत्पन्नातून विषमता आली. दुसऱ्या माणसाला श्रम करायला भाग पाडून त्याच्या कष्टातून जे निर्माण होईल त्यातले जगण्यापुरते त्याला देऊन उरलेल्यांवर जगणाऱ्यांचा एक वर्ग आकार घेऊ लागला.

टोळ्या टोळ्यांचे आपसात संघर्ष होत. सुरुवातीला एक टोळी दुसऱ्या टोळीतील सर्वांनाच ठार करीत असे. त्यांना जिवंत ठेवण्यात जिंकणाऱ्यांचा काहीच फायदा नव्हता. ते जेवढे निर्माण करीत त्यातून काहीच उरत नव्हते. पुढे उत्पादनाची साधने सुधारली. ठार मारण्याऐवजी त्यांना कष्ट करायला लावणे फायद्याचे दिसू लागले. श्रम करणारे गुलाम निर्माण करणे लाभदायक दिसू लागले. त्यांना श्रम करायला लावून त्यांच्या श्रमावर जगणारे निर्माण झाले. उत्पन्न करणारा गुलाम आणि त्यांच्या श्रमावर जगणारा गुलामांचा मालक असे वर्ग तयार झाले. गुलामगिरीची अवस्था निर्माण झाली. विषमता तयार झाली. वरिष्ठ व कनिष्ठवर्ग तयार झाले. ऐतखाऊंचा एक वर्ग अस्तित्वात आला. तो गुलामांना राबवू लागला. राबण्यासाठी जगावेत एवढे त्यांना देऊन उरलेले सारे बळकावू लागला. राबणारा गरीब आणि आयते खाणारा श्रीमंत असा स्पष्ट वर्ग तयार झाला. वर्गसमाज तयार झाला.

तेव्हापासून आजपर्यंत समाजात वर्ग आहेत. कष्ट करणाऱ्यांचा एक वर्ग आणि ऐतखाऊंचा दुसरा वर्ग असे वर्ग आहेत. उत्पादनसाधनांचा मालक असलेला एक वर्ग आणि उत्पादन करणारा दुसरा वर्ग असे वर्ग अस्तित्वात आहेत. विषमता अस्तित्वात आहे.

सर्व प्रकारच्या विषमतांचे कारण हा वर्गसमाज आहे. प्रत्येक देशात सर्व ठिकाणी वर्ग अस्तित्वात येण्याची प्रक्रिया एकाच तऱ्हेने घडली नाही, एकाच वेळी घडली नाही. तथापि सर्व ठिकाणी क्रम व प्रक्रिया तीच आणि तशीच होती. गुलामगिरी, सरंजामशाही किंवा जमीनदारी, भांडवलशाही, साम्राज्यशाही या अवस्थेतून जगातले समाज गेले आहेत, जात आहेत. या सर्व अवस्थांत भिन्न भिन्न व एकमेकांच्या विरुद्ध असे हितसंबंध तयार झाले आहेत. संपूर्ण समाजाचा एक हितसंबंध अस्तित्वातच नाही. वर्गाचे परस्परविरोधी हितसंबंध अस्तित्वात होते व आहेत.

परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या वर्गसमाजातच 'जात' तयार झाली. जिंकलेल्या टोळीने हरलेल्या टोळीला कायमस्वरूपी कष्टाचे काम करायला भाग

पाडून त्यांच्या जाती बनवल्या असाव्यात असे अनेक संशोधकांचे मत आहे. जाती कशा निर्माण झाल्या असाव्यात यासंबंधी भिन्न मते आहेत. पण कनिष्ठ जाती म्हणजे राबणाऱ्या जाती आणि वरिष्ठ जाती म्हणजे न राबता ऐतखाऊंच्या जाती हे वास्तव तर स्पष्टच आहे.

इतरांना गुलाम करण्याची साधने व प्रकार बदलले. आजचा कामगार हा 'वेतनाचा गुलाम'च आहे. अगोदरच्या गुलामगिरीतील गुलामाला मालकाची गुलामगिरी झटकून निघून जाण्याचे स्वातंत्र्य नव्हते. आताच्या कामगाराला काम सोडून निघून जाण्याचे स्वातंत्र्य आहे. पण त्याने तसे केले तर मग त्याला जगताच येणार नाही. वेतन नाही तर जगणे नाही. दुसरे जगायचे साधन नाही. या वेतनाचा तो गुलाम आहे. रीत बदलली असली तरी गुलामी चालू आहे.

या वेतनी गुलामांनी बंड करू नये म्हणून तर कायदे आले. त्यांना शासन करता यावे म्हणूनच तर 'शासन संस्था' आहे. या संस्थेच्या नावातच शासन आहे. शासन करते ती शासनसंस्था. हे शासन कोण कोणाला करते? प्रस्थापित, ऐतखाऊ वर्ग राबवणाऱ्यांना शासन करतो. त्यासाठी शासनसंस्था तयार करतो, कायदे करतो, पोलीस तयार करतो, तुरुंग तयार करतो, शस्त्रे तयार करतो. या सर्व साधनांचा वापर करतो आणि जुलूम चालू ठेवतो. वर्गसमाजाचे म्हणजे प्रस्थापित वर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण करतो.

सर्व प्रकारच्या विषमता टिकवण्यासाठी दंडशक्तीचा वापर केला जातो. शासनाच्या अनेक अधिकाऱ्यांना 'दंडाधिकारी' म्हणण्याची पद्धत आहे. जसे 'जिल्हा दंडाधिकारी', 'न्याय दंडाधिकारी', 'तालुका दंडाधिकारी' इत्यादी.

तथापि नुसत्या बळाच्या आणि दंडशक्तीच्या आधारावर कोणतीच समाजरचना दीर्घकाळ टिकून राहत नाही. बळाचा आणि दंडशक्तीचा वापर असतोच. पण त्याच्या जोडीला आणि त्याहून शक्तिमान असे एक हत्यार असते. एक विचारसरणी असते. एक तत्त्वज्ञान असते. हे तत्त्वज्ञान समाजमानसात रुजवलेले असते. एक जाणीव निर्माण केलेली असते. हे तत्त्वज्ञान आणि त्या आधारे तयार केलेली जाणीव ही हत्यारे असतात आणि ही हत्यारे बळापेक्षा आणि दंडशक्तीपेक्षाही अधिक सामर्थ्यवान असतात.

ज्यांच्यावर अन्याय होतो, जुलूम-जबरदस्ती होते. ज्यांना गुलाम केलेले असते. ज्यांचे शोषण केले जाते. त्यांनासुद्धा ही जुलूम-जबरदस्ती आणि हे शोषण बरोबरच आहे असे वाटेल अशी जाणीव त्यांच्यातसुद्धा रुजवली जाते आणि त्यामुळेच प्रदीर्घकाळ शोषण चालू राहते.

विश्वातला कोणताही बदल संघर्षाखेरीज होत नाही. आपसूक काहीच बदलत नाही. मानवी समाजात होणारा बदलही संघर्षाखेरीज होऊ शकत नाही. क्रांती संघर्षाविना होत नाही.

बदल हा जसा विश्वाचा नियम आहे, तसाच संघर्षाखेरीज बदल होत नसतो. हासुद्धा विश्वाचा नियमच आहे. बदलासाठी तत्त्वज्ञान असावे लागते. हासुद्धा नियमच आहे. तत्त्वज्ञानाखेरीज क्रांती होऊच शकत नाही. बदल होऊच शकत नाही. समाज बदलायचा तर त्यासाठी तत्त्वज्ञान असावेच लागते. कोणतेही तत्त्वज्ञान न स्वीकारता जे कुणी जग बदलायचे म्हणतात ते एकतर मतलबी असतात किंवा भाबडे असतात. भोंदू असतात किंवा भोळे असतात. तत्त्वज्ञान नको असे जे म्हणतात त्यांचे म्हणणे हेच त्यांचे तत्त्वज्ञान असते. ते प्रस्थापितांचे तत्त्वज्ञान असते. जग न बदलण्याचे तत्त्वज्ञान असते. समाज न बदलण्याचे तत्त्वज्ञान असते. समाजबदलाला, परिवर्तनाला, क्रांतीला विरोध करणाऱ्यांचे हे एक तत्त्वज्ञान असते.

समाज आहे तसा राहू द्या. त्यात मोडतोड करू नका. नवा समाज आणू नका. आहे त्यात काही दोष आले असतील तर तेवढे दोष फार तर दूर करा. चौकट मोडू नका. चौकट उद्ध्वस्त करू नका, इमारत मोडू नका, पाडू नका, फार तर डागडुजी करा, रंगसफेदी करा, हे तत्त्वज्ञान म्हणजे 'जैसे थे वादी' तत्त्वज्ञान असते.

वर्गसमाजात सामाजिक न्याय मिळेल काय? अन्यायग्रस्तांपैकी मूठभरांना कदाचित थोडाफार न्याय मिळेलही पण सर्वांना मिळेल काय? वर्णजात समाजात सामाजिक न्याय मिळेल काय? वर्ग-वर्ण-जात नष्ट न करता सामाजिक न्याय मिळेल काय?

स्वत:चा जुलूम चालू रहावा म्हणून शोषकवर्ग शोषितांमधील मूठभरांना काही थोडेफार देत असतो. या मूठभरांचा एक थर बनतो. वर्ग बनतो. जातही बनते. निदान जातीत थर बनतात. जातीत वर्ग बनत आहेत. शोषित जातीत मध्यमवर्ग तर बनलाच आहे. हा मध्यमवर्ग फक्त सामाजिक न्यायाची भाषा बोलतो. समाज बदलण्याची भाषा करत नाही.

सामाजिक न्यायाची ही भाषा व व्यवहार हा मतलबी असतो. हा असा सामाजिक न्याय म्हणजे शोषण चालू ठेवण्याचेच एक साधन असते. त्यालाच जर 'सामाजिक न्याय' म्हटले तर मग शोषण चालू ठेवण्याच्या साधनालाच सामाजिक न्याय म्हटल्यासारखे होईल.

वर्ग नाहीसे करून वर्गविहीन समाज निर्माण करणे हे अंतिम ध्येय असावे की वर्ग समाज तसाच राहू देऊन सामाजिक न्याय तेवढा मिळवावा हे अंतिम ध्येय

असावे? वर्णजात समाज उद्ध्वस्त करून जातवर्णहीन समाज निर्माण करावा हे ध्येय अंतिम असावे, की तो समाज तसाच राहू देऊन त्यातच मिळेल तेवढा सामाजिक न्याय मिळवावा हे अंतिम ध्येय असावे?

शोषितांपैकी मूठभरांचे शोषण कमी करणे एवढेच करीत राहावे, की शोषणमुक्त समाज निर्माण करण्याचे ध्येय न विसरता हे कार्य करावे? वर्गउद्धार हे ध्येय असावे की वर्गअंत हे ध्येय असावे? जातिउद्धार हे ध्येय असावे की जातिअंत हे ध्येय असावे?

जातिअंतासाठी जातिउद्धार असा पवित्रा असावा. वर्गविहीन समाजनिर्मितीसाठी वर्गसंघटन व वर्गसंघर्ष असा पवित्रा असावा.

समाज मुळातून बदलण्याच्या तयारीचा भाग म्हणून सामाजिक न्यायाच्या संघर्षाकडे पाहावे. नुसताच 'सामाजिक न्याय' म्हणत बसून समाज बदलण्याच्या कार्याकडे दुर्लक्ष करू नये. समाज बदलण्याच्या कार्याची व ध्येयाची हानी होता कामा नये. हे डोळ्यात तेल घालून पाहावे.

एका प्रसिद्ध कवीने म्हटले आहे :

*हम मेहनतकश जब जगवालों से*
*अपना हिस्सा मांगेंगे*
*एक खेत नहीं, एक देश नहीं*
*हम सारी दुनिया मांगेंगे*

124264
31.3.08

अन्यायी व विषमताग्रस्त समाज आहे तसाच ठेवून जे कुणी फक्त 'सामाजिक न्यायाची' आंदोलने फक्त करीत राहतील, ते स्वत:पुरता आणि तोही कदाचितच न्याय मिळवतील आणि मग समाजक्रांतीच्या मार्गात अडसरही बनतील.

सामाजिक न्यायाची आंदोलने आणि समाजक्रांतीची आंदोलने यांची सांगड घालायला हवी. वर्गउद्धाराची आंदोलने व वर्गविहीन समाज निर्माण करण्याची आंदोलने यांची सांगड घालायला हवी. त्यासाठी योग्य प्रबोधन लागेल. योग्य रणनीती लागेल. योग्य प्रकारचे संघर्ष लागतील.

ते निर्माण करण्याचे आव्हान आपणा सर्वांसमोर उभे ठाकले आहे.

आपली भूमिका जात्यंताची असावी की जात्युद्धारापुरती मर्यादित असावी? जन्मजात ब्राह्मण्याखेरीज ब्राह्मण्याचे आणखी काही आविष्कार अस्तित्वात असू शकतात की नाही? मागास जातींनी जातीच्या आधारे केलेले राजकारण स्वभावत:च पुरोगामी आणि परिवर्तनाग्रही असते काय? मागासलेपणाच्या आधारावर अखिल भारतीय ओबीसी आत्मभानाची उभारणी करणे शक्य होईल काय? राज्याराज्यात सुरू असलेले एकजातीय राजकारण आणि तमाम ओबीसींना सामावून घेऊ पाहणारा बहुजनवादाचा तत्त्वविचार, यात अंगभूत अंतर्विरोध नाही काय? बहुजनसंज्ञेची कोणती व्याख्या ग्राह्य ठरवता येईल? बहुजनवादाच्या शक्यता आणि मर्यादा कोणत्या आहेत? असे जातिप्रश्नाच्या अनुषंगाने जे अनेक प्रश्न परिवर्तनवादी चळवळींच्या कार्यकर्त्यांना प्रत्यही पडत असतात त्यांची उत्तरे शोधण्याच्या कामी त्यांना उपयुक्त ठरू शकेल असे महत्त्वपूर्ण विवेचन कॉ. पानसरे यांनी प्रस्तुत पुस्तिकेत केले आहे.

फुले-आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या बहुजन संकल्पनेचा आशय जातीय नव्हता. शेटजी-भटजी किंवा भांडवलशाही व ब्राह्मणशाही यांच्या विरोधात ज्यांनी लढा पुकारायचा त्यांचा मनसुबा होता, ते जातींच्या नव्हे तर हितसंबंधांच्या आधारे एकत्र येणेच त्यांना अपेक्षित होते. ब्राह्मण परभू व शेणवी सोडून इतर सर्वांना बहुजन मानणारे शाहूमहाराज त्यांच्या काळानुरूप जातीय परिभाषेत मांडणी करत असले तरी तिचाही आशय वर्गीयच होता. विठ्ठल रामजी शिंदे यांनी तर बहुजनवादाची स्पष्टच जातवर्गीय संकल्पना मांडली असून सर्व जातींमधील बलविद्यासत्तावंचित समस्तांचा समावेश बहुजन या संज्ञेखाली केला आहे. या पूर्वसुरीं
संज्ञांचा आशय आज स्वीकारताना, आपण
समानार्थी शब्द वापरून विचार करायला हवा अ
त्यातल्या त्यात पूर्वसूरींपैकी महर्षी शिंद्यांची
आज मांडणी करण्याच्या कामी सर्वांत उपयुक्त वाटते.

**- भा. ल. भोळे**

प्रस्तावनेतून

Library IIAS, Shimla
MR 200 P 191 D
00124264

**किंमत : ७५ रुपये**

ISBN 81-88284-73-4